# ज्ञान प्रबोधिनी

## वार्षिक वृत्त

(न्यास नोंदणी क्र. एफ-२५४/पुणे)

## २०१२-१३

**दि.१ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१३**

**(सौर शके १९३४-३५)**



| | | |
|---|---|---|
| **पत्ता** | : | ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३० |
| **दूरभाष क्र.** | : | (०२०)२४२०७००० |
| **फॅक्स** | : | (९१)(२०)२४४९१८०६ |
| **संकेत स्थळ** | : | www.jnanaprabodhini.org |
| **ई-मेल** | : | contact@jnanaprabodhini.org |

# ज्ञान प्रबोधिनी, पुणे

## सन्माननीय सदस्य

**डॉ. वसंतराव गोवारीकर** - माजी कुलगुरु, पुणे विद्यापीठ

**श्री. अण्णा हजारे** - सामाजिक कार्यकर्ते

**श्रीमती अनु आगा** - उद्योजिका

**डॉ. रघुनाथ माशेलकर** - माजी संचालक, CSIR नवी दिल्ली

**डॉ. जयंत नारळीकर** - माजी संचालक, आयुका, पुणे

**डॉ. बी. एम्. उद्गावकर** - माजी शास्त्रज्ञ, TIFR मुंबई

## पदाधिकारी २०१२-२०१५

**अध्यक्ष** - वा. वसंतराव गोवारीकर

**उपाध्यक्ष** - श्री. अण्णा हजारे

**कार्याध्यक्ष** - वा. प्र. ल. गावडे

**उपकार्याध्यक्ष** - वा. पद्माकर दुभाषी

**संचालक** - वा. गिरीश श्री. बापट

**कार्यवाह** - श्री. वि.शं. /सुभाष देशपांडे

**सहकार्यवाह** - श्री. वि. ध. गुर्जर

---

## ◆ *ज्ञान प्रबोधिनी कार्यकारी मंडळ* ◆

### निर्वाचित सदस्य

१. वा. प्र. ल. गावडे
२. वा. प. रा. दुभाषी
३. वा. गि. श्री. बापट
४. प्रा. वि.शं. /सुभाष देशपांडे
५. प्रा. वि. ध. गुर्जर
६. प्रा. वा. ना. अभ्यंकर
७. वा. उषाताई खिरे
८. श्री. मोहन चि. गुजराथी
९. श्री. विवेक द. पोंक्षे
१०. वा. सुधाताई कोठारी
११. श्री. महेश आठवले
१२. वा. वि. बा. कुलकर्णी
१३. वा. स्वर्णलता भिशीकर
१४. श्री. रामकुमार राठी
१५. प्रा. महेंद्र सेठिया

### नियुक्त सदस्य

१६. श्री. मनोज देवळेकर
१७. वा. अनघाताई लवळेकर
१८. श्री. आशुतोष बारमुख
१९. प्रा. हर्षाताई किर्वे
२०. प्रा. मिलिंद नाईक

---

- **मुख्य केंद्रे** : पुणे, निगडी, सोलापूर, हराळी (उस्मानाबाद जिल्हा)
- **उपकेंद्रे** : शिवापूर, वेल्हे, साळुंब्रे (पुणे जिल्हा) शिरवळ (सातारा जिल्हा)
- **विस्तार केंद्रे** : डोंबिवली, बोरीवली, अंबाजोगाई (बीड जिल्हा), सांगली

---

- १) ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्था २) ज्ञान प्रबोधिनी शिवप्रदेश ३) ज्ञान प्रबोधिनी सोलापूर व ४) ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान संस्था या न्यासांचे वृत्तांत स्वतंत्रपणे प्रसिद्ध केले जातात.

# अनुक्रमणिका


✡ *शिक्षण प्रभाग*

ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५–८
शैक्षणिक उपक्रम संशोधिका ९–११
छात्र प्रबोधन १२–१३
स्पर्धा परीक्षा केंद्र १४–१८
नवनगर विद्यालय, निगडी १९–२३

✡ *संघटन प्रभाग*

युवक विभाग २४–२६
युवती विभाग २७–२८
जिजामाता दल २८
स्त्री शक्ती प्रबोधन २९–३१
अंबाजोगाई विस्तारकेंद्र ३१–३२
बोरीवली विस्तार केंद्र ३३
डोंबिवली विस्तार केंद्र ३३–३४
नागरी वस्ती अभ्यास गट ३५–३६

✡ *संशोधन प्रभाग*

प्रज्ञा मानस संशोधिका ३७–३८
संस्कृत–संस्कृति–संशोधिका ३९–४०

✡ *ग्रामविकसन प्रभाग*

नैसर्गिक संसाधने ४१–४२
स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण) ४२–४५

✡ *मध्यवर्ती कार्यक्रम*

आसाम अभ्यास सहल ४६

सुवर्ण महोत्सवी उपक्रम ४६

✡ *सन्माननीय देणगीदार* **४७–५२**


---

# ज्ञान प्रबोधिनी

स्वामी विवेकानंदांच्या विचारांना मूर्तरूप देणारी अभिनव संस्था ।
देशातील सुप्त मनुष्यशक्तीचा आत्मसन्मान वाढवणारी गतिशील संघटना ।
प्रत्येकाच्या बुद्धिमत्तेला विकासाची, नेतृत्वाची व सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा देणारी चळवळ ।

कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये – समग्रता, सर्जनशीलता, सहविचार, स्वावलंबन

## सहविचार

सहविचार प्रक्रियेत एखादा प्रश्न सोडविणे, महत्त्वाच्या विषयावरील धोरण ठरवणे, आधीच्या धोरणांचे पुनरावलोकन करणे, प्राधान्यक्रम ठरवणे, अशा प्रत्येकवेळी गटात साधक-बाधक चर्चा होते. गटातील सर्वजण आपापली मते मोकळेपणाने नोंदवतात. परस्परांची मते समजून घेतात व आपली मते पटवून देतात. त्याआधारे प्रमुख/नेता निर्णय घेतो. सर्वजण मतभेद विसरून तो निर्णय स्वीकारतात व सर्वशक्तीनिशी त्याची कार्यवाही करतात. या प्रक्रियेवर आधारित नेतृत्वाला सहविचारात्मक नेतृत्वपद्धती म्हणतात. गटातील प्रत्येक व्यक्तीच्या विचारांची, अनुभवांची, तज्ज्ञतेची जोड मिळून सामूहिक प्रज्ञेतून निर्णय विकसित होण्यासाठी सहविचार अत्यंत महत्त्वाचा आहे. वाद-प्रतिवाद, शंका-समाधान, सूचना-प्रतिसाद, अशा विविध पद्धतींनी होणाऱ्या सहविचारातून प्रत्येक विषयाच्या विविध बाजू समोर येतात, स्पष्ट होतात व त्यामुळे निर्णय सर्वांगीण व समग्र होतो.

### ज्ञान प्रबोधिनीतील सहविचारात्मक नेतृत्वपद्धतीचे काही आविष्कार

- प्रबोधिनीच्या घटनेमध्ये प्रबोधिनीचे संचालक सहविचारात्मक नेतृत्वपद्धतीचा अवलंब करतील असे नमूद केले आहे. गेली ५० वर्षे वापरून उपयुक्त ठरलेली ही कार्यपद्धती आहे.
- सर्व महत्त्वाच्या विषयांवर विभाग व केंद्रांच्या स्तरावर सहविचार होतो. प्रबोधिनीच्या स्तरावरही सर्व केंद्रांवरील विशेष जबाबदार सदस्य सहविचारासाठी नियमितपणे एकत्र जमतात. तसेच सर्व केंद्रांवरील प्रमुख कार्यकर्त्यांच्या मध्यवर्ती सहविचार समितीत धोरणात्मक निर्णय घेतले जातात.
- पुढील १० वर्षांच्या भवितव्य लेखाची निर्मिती हा सहविचारात्मक नेतृत्वपद्धतीचा एक विशेष नमुना.

संस्थात्मक व संघटनात्मक कामाची क्षेत्रे

शिक्षण । संशोधन । ग्रामविकसन । आरोग्य । नेतृत्व विकसन । स्त्री शक्ती प्रबोधन । राष्ट्रीय एकात्मता

मुख्य कार्यालय : ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे४११०३०, ०२०-२४२०७००० www.jnanaprabodhini.org

## ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

### शैक्षणिक प्रयोग आढावा

**१.गतिमान प्रभुत्व अध्ययन-अध्यापन पद्धती :** इ. ५वी ते ८वी साठी इंग्रजी व गणित या दोन विषयांसाठी दोन वर्षांपूर्वी सुरू केलेला प्रयोग या ही वर्षी राबवला. इ. ८वी पर्यंतच्या अभ्यासक्रमाची आठ स्तरांत विभागणी असून विद्यार्थ्यांनी स्वक्षमतेनुसार अध्ययन करून पुढील स्तरात पोचण्याचा प्रयत्न केला. मागे पडणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुनर्भरण (Remedial) या नवीन स्तराची भर घातली.

**२. विशेष उद्दिष्ट गट :** समाजापुढील प्रश्न सोडविण्यासाठी एकात्मिक विचार कसा करायचा हे समजावे यासाठी इ. ९वी व १०वी साठी केलेली ही रचना. ऊर्जा, ग्रामविकसन, अर्थशास्त्र, पत्रकारिता, पर्यावरण व राष्ट्रीय एकात्मता या सहा प्रश्न गटांमध्ये विद्यार्थ्यांनी स्वतःच्या रुचीनुसार गट निवडून काम केले. त्यांना अनेक ज्येष्ठ कार्यकर्ते व तज्ज्ञ यांचे मार्गदर्शन लाभले.

**३. दृक-श्राव्य साधनांच्या साहाय्याने व प्रकल्प पद्धतीतून अध्ययन :** अध्ययन-अध्यापनात दृक्-श्राव्य साधनांचा उपयोग प्रयत्नपूर्वक वाढवला. तसेच वस्तूसंग्रह, माहिती संग्रह, प्रतिकृती, साहित्य-निर्मिती, संशोधन आणि भविष्यवेध अशा प्रकल्पांतून विद्यार्थी निरीक्षण, वर्गीकरण इ. विविध प्रक्रिया शिकले. सौर फाल्गुन ९ (२८ फेब्रु.) ला या प्रकल्पांचे प्रदर्शन भरवले होते.

**४. गुणविकास-योजना इ. ७वी शिष्यवृत्ती :** हॉवर्ड गार्डनरच्या बहुजिनसी व बहुविध बुद्धिमत्तेच्या सिद्धांतावर आधारित हा उपक्रम इ. ७वी च्या विद्यार्थ्यांसाठी घेतला गेला. सौर श्रावण २४ (१५ ऑगस्ट) रोजी शिष्यवृत्ती व अन्य पारितोषिकांचे वितरण झाले.

**५. अभिव्यक्ती विकसन :** नृत्य, नाट्य, चित्र, शिल्प, गायन, वादन, लेखन व वक्तृत्व या मूलभूत माध्यमांतून विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होता यावे या उद्देशाने वर्षभर आठवड्यातून एका तासाची योजना केली होती. या तासिका व एप्रिलमध्ये झालेले दहा दिवसांचे शिबिर यात विद्यार्थ्यांनी विविध कौशल्ये आत्मसात केली व त्यांचे सादरीकरण सौर वैशाख ६ (२६ एप्रिल) रोजी विविध कार्यक्रमांतून केले.

### विशेष उपक्रम

वर्षभरासाठी विद्यार्थ्यांकरिता विविध उपक्रमांचे नियोजन केले होते. या उपक्रमांतून विद्यार्थ्यांची बौद्धिक प्रगल्भता वाढेल, सामाजिक जाणिवेचे भान निर्माण होईल; त्यांचे मन, भावनाकोष समृद्ध होईल; शारीरिक क्षमता व कौशल्ये विकसित होतील आणि त्यांच्यातील नेतृत्वगुणही वाढीस लागतील असा विचार केला होता.

**महत्त्वाचा शैक्षणिक संस्कार - विद्याव्रत**

इ. ८वी च्या विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांसाठी हा संस्कार योजला जातो. याच्याअंतर्गत डिसेंबर-जानेवारी महिन्यात व्याख्यानमाला व गटचर्चा आयोजित केली होती. त्यात मुख्यतः विद्याव्रताची भूमिका-प्रस्तावना, शारीरिक, मानसिक, बौद्धिक, आत्मिक विकासन आणि संकल्प व राष्ट्रअर्चना या विषयांचा समावेश होता. जानेवारीत 'सज्जनगड' येथे तीन दिवसांचे शिबिर झाले. या शिबिरात चार पथकाधिपतींची चरित्रे विद्यार्थ्यांनी समजून घेतली. त्यांचे साहित्य अभ्यासले तसेच विद्याव्रत पोथीचेही अध्ययन केले. सौर माघ १३ (२ फेब्रु.) रोजी मुलांचा विद्याव्रत संस्कार संपन्न झाला. त्यावेळी ज्येष्ठ इतिहास तज्ज्ञ श्री. पांडुरंगजी बलकवडे यांनी मुलांना मार्गदर्शन केले. सौर माघ १४ (३ फेब्रु.) रोजी मुलींच्या विद्याव्रत संस्कार प्रसंगी प्रसिद्ध अनुवादकर्त्या सौ. उमाताई कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

**बौद्धिक प्रगल्भता वाढावी यासाठी उपक्रम**

१. श्री गणेशोत्सवाच्या काळात इ. ५वी ते ७ वीच्या गटासाठी पत्रलेखन, निबंधलेखन, चित्रकला, शुभेच्छापत्रे तयार करणे अशा स्पर्धांचे आयोजन केले होते. विशेष व्याख्याने -

६वी श्री. राजीव पंडित - जैव विविधता

७वी श्री. विवेक पोंक्षे - मुलाखत व निरीक्षण कौशल्य

८वी श्री. श्री. द. महाजन - प्रकाश संश्लेषण

**बुद्धिबळ -** इ. ६वीच्या विद्यार्थ्यांना श्री. अभिषेक केळकर यांनी वर्षभर आठवड्यातून एक तास बुद्धिबळातील विविध कौशल्ये शिकवली. सौर पौष ४ (२४ जाने.) रोजी सौम्या स्वामीनाथन या राष्ट्रीय बुद्धिबळपटूबरोबर खेळण्याची संधी मुलामुलींना मिळाली.

**वाचन-लेखनासाठी प्रेरक उपक्रम : लेखक तुमच्या भेटीला**

सौर फाल्गुन १७ (८मार्च) रोजी वा. वीणा देव यांनी इ. ८वी च्या विद्यार्थ्यांशी 'गो. नि. दां'चे साहित्य या विषयावर संवाद साधला.

**पुस्तक प्रदर्शन**

ऑक्टोबर महिन्यात श्री. तपस्वी यांनी मराठी, इंग्रजी व हिंदी भाषेतील पुस्तकाचे प्रदर्शन लावले होते.

**सरस्वती पूजन**

सौर कार्तिक ८ व ९ (३० व ३१ ऑक्टो.) रोजी इ. १० वी च्या अग्रणींनी नियोजन केलेला सरस्वती पूजनाचा कार्यक्रम झाला. त्यात इ. ५वी ते ७ वी च्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विविध बौद्धिक खेळ खेळण्याचा आनंद घेतला.

## अभ्यास-शिबिर

सौर पौष ३ ते ८ (२४ ते २९ डिसें.) या कालावधीत इ. १०वी साठी अभ्यास शिबिरांचे आयोजन केले होते. त्यात स्वयंअध्ययन, अभ्यास-तंत्रे, मार्गदर्शक व्याख्याने, गटकार्य अशी विविध सत्रे योजलेली होती.

## सामाजिक जाणीव निर्माण व्हावी यासाठी उपक्रम

देशप्रश्नांची जाणीव व्हावी या उद्देशाने सौर आश्विन २ ते ५ (२४ ते २७ सप्टें.) या गणेशोत्सवकाळात व्याख्यानमाला आयोजित केली होती.

| | | |
|---|---|---|
| २४ | महाराष्ट्राचा समतोल विकास | श्री. अभय टिळक |
| २५ | बांगलादेशी घुसखोरी | ले. जनरल डी. बी. शेकटकर |
| २६ | खोरे विकास संकल्पना | श्री. सुभाषराव देशपांडे |
| २७ | जनलोकपाल विधेयक | डॉ. विश्वंभर चौधरी |

दि. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने इ. ८वी ते १०वी साठी 'भारत-चीन युद्धाची ५० वर्षे' या विषयावर श्री. श्रीनिवास देशमुख यांचे व्याख्यान झाले.

दि. २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त इ. ८वी ते १०वी साठी 'भारतीय व्यापारनीती' या विषयावर श्री. पराग कुलकर्णी यांचे व्याख्यान झाले. इ. ५वी ते ८वीचे विद्यार्थी व पालक यांच्यासाठी श्री. सदानंद शानभाग यांच्या उपस्थितीत मातृभूमीपूजनाचा कार्यक्रम झाला.

**पालखीत सहभाग :** समाजातील विविध घटकांचे दर्शन व्हावे तसेच भारतीय संस्कृतीची व परंपरेची ओळख व्हावी या उद्देशाने इ. ८वी ते १०वी च्या विद्यार्थिनी प्रत्यक्ष वारीत सहभागी झाल्या. काही अंतर वारकऱ्यांबरोबर चालणे, त्यांच्याशी गप्पा, मुलाखती, अभंग, गायन इ. चा यात अंर्तभाव होता.

**सहाध्यायदिन व सहली :** वर्गाच्या चौकटीबाहेर जाऊन समाजात समाजासाठी काम करणाऱ्या विविध व्यक्ती, संस्था, वेगवेगळे प्रकल्प यांचे दर्शन विद्यार्थ्यांना घडवणे, नवनवीन अनुभव घेता यावेत या उद्देशाने सहाध्याय दिन व सहलींची योजना केली जाते. या वर्षी प्रत्येक वर्गाचा सहाध्याय दिन वेगवेगळ्या ठिकाणी योजला होता.

इ. ५वी मुली सौर आषाढ २२ (१३ जुलै) व इ. ५वी मुले सौर आषाढ २३ (१४ जुलै)ला विश्रामबागवाडा, पुणे येथे पुनवडी ते पुणे हे संग्रहालय पाहण्यासाठी गेली होती.

सौर माघ २२ (१२ फेब्रु.) ६वी मुली : राजा केळकर संग्रहालय
सौर फाल्गुन २८ (१९ मार्च) ६ वी मुली : स्मृतिवन
सौर माघ २३ (१२ फेब्रु.) ८ वी मुली : वैदिक संशोधन मंडळ
सौर फाल्गुन २७ (१८ मार्च) ८वी मुले : रामकृष्ण मठ श्रमदान व सेवाकार्य
सौर अग्रहायण २९ (२० डिसें.) १० वी मुले : साळुंब्रे येथील शाळा पाहून पवनामाई उत्सवात सहभाग घेतला.
सौर अग्रहायण ३० (२१ डिसें.) १०वी मुले : डेक्कन कॉलेजातील पुरातत्त्व विभागाची माहिती घेतली.

## सहली

सौर १३ ते १५ कार्तिक (४ ते ६ नोव्हें.) इ. ९वी मुलींची पुणे-वेल्हे अशी सायकल सहली आयोजित केली होती.

सौर आश्विन २२ ते २६ (१४ ते १८ ऑक्टो.) दरम्यान इ. ९वी मुलांची अभ्याससहल सोलापूर, हराळी, यमगरवाडी, अंकोली येथे आयोजित केली होती. या सहलीत विद्यार्थ्यांनी हराळी येथील शेळी-मेंढी पालन, शेती-फळबाग प्रकल्प, फलप्रक्रिया तसेच सौर ऊर्जा प्रकल्प पाहिले. यमगरवाडी येथे भटके-विमुक्त-पारधी यांच्या मुलांसाठी चालवलेली शाळा व त्यांचे उपक्रम पाहिले.

अंकोली येथील श्री. अरुण देशपांडे यांचे विज्ञान प्रयोग पाहिले. या सहलीत तेथील मुलांच्या गटांपुढे इ. ९वी च्या विद्यार्थ्यांनी पथनाट्यांचे सादरीकरण केले.

## संस्कार कार्यक्रम

संस्कार कार्यक्रमांच्या अंतर्गत साप्ताहिक उपासना होत असते. दर शनिवारी इ. ५वी ते ८वी च्या गटात एकात्मता स्तोत्र पठण व त्यातील व्यक्तींचे चरित्रकथन झाले. इ. ९वी व १०वी च्या मोठ्या गटात वृत्तीघडण व कार्य बांधिलकी या विषयावर ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी विचार मांडले.

सौर आषाढ २ (२३ जून) रोजी वर्षारंभ उपासनेच्या कार्यक्रमात छोट्या गटाला ग्रँड मास्टर अभिजित कुंटे यांनी तर मोठ्या गटाला एव्हरेस्ट मोहीम नेते श्री. उमेश झिरपे यांनी मार्गदर्शन कले.

सौर आषाढ ९ (३० जून) रोजी आषाढी एकादशीनिमित्त अभंग गायनाचा कार्यक्रम झाला. त्यात प्रबोधिनीच्या सर्व सदस्यांचा समावेश होता.

सौर आषाढ १६ ते २२ (७ ते १९ जुलै) या काळात गुरुपौर्णिमा विविध कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत वर्गशः साजरी केली. याचे नियोजन इ. १० वी च्या अग्रणींनी केले होते.

ऑगस्ट महिन्यात श्रद्धाताई व्यास यांची इ.९वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'स्वामी विवेकानंद' या विषयावर तीन तसेच श्री. रामभाऊ डिंबळे यांची 'श्रीकृष्णोत्तरी' या व्याख्यानमालेच्या अंतर्गत इ. ८वी साठी श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील विचारांची मांडणी करणारी चार व्याख्याने झाली.

## शारीरिक कौशल्यांचे विकसन

यासाठी दैनंदिन दलांबरोबरच सौर पौष ४ ते ८ (२५ ते २९ डिसें.) या काळात क्रीडाशिबिरांचे आयोजन केले होते. त्यात इ. ५वी ते ७ वी साठी तंबूतील शिबिर, सांगवी, नसरापूर येथे झाले. तर इ. ९वी मुलांचे तंबूतील शिबिर केळद येथे झाले. या क्रीडाशिबिरात मैदानी खेळ, स्पर्धा, कार्यानुभव, श्रमदान इ. विविध अनुभव मुलांनी घेतले.

## अग्रणी योजना

संघटनेत काम करण्यासाठी नेतृत्व गुणांचे विकसन होणे आवश्यक असते. त्यात अग्रणी योजना इ. १० वी साठी राबवून प्रत्येक मुलास नेतृत्व करण्याची संधी दिली गेली. नेतृत्व गुण संवर्धन शिबिर घेण्यात आले.

वक्तृत्व कौशल्याचा क्रमशः विकास व्हावा या उद्देशाने रोज

प्रार्थनेनंतर नेमून दिलेल्या विषयावर विद्यार्थ्यांनी वक्तृत्व सादर केले. त्यात मुख्यतः उद्योजकता, पुण्याचा इतिहास, साहित्यिक व त्यांचे साहित्य, कथाकथन, उतारे, कवितापठण असे विषय होते.

### विक्री कौशल्य

सामाजिक कौशल्यांमध्ये विक्री कौशल्य हे अत्यंत महत्त्वाचे कौशल्य आहे. त्याअंतर्गत छात्र प्रबोधन मासिकाच्या दिवाळी अंकाची नोंदणी इ. ५वी ते ७ वी च्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी केली. एकूण ८०७१ अंकांची विक्री विद्यार्थ्यांनी केली. इ. ७वी मुलांच्या वर्गाने २२१५ अंकांची सर्वाधिक नोंदणी केली.

इ. ५वी ते ९वी च्या विद्यार्थिनींनी तिळगूळ विक्रीच्या उपक्रमातून विक्री कौशल्याचा अजून एक अनुभव घेतला. एकूण तिळगूळ विक्री ९९५ किलो झाली. इ. ८वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी फटाके विक्रीचा अनुभव घेतला. इ. ९वी च्या मुलांच्या वर्गाने सर्वाधिक फटाके विकले.

### दूरचित्रवाणी (टी. व्ही.) वर चित्रीकरण

**मधली सुट्टी** या मालिकेसाठी 'झी मराठी'तर्फे सौर ज्येष्ठ २६(१६ जून) रोजी प्रशालेत चित्रीकरण झाले. यात विद्यार्थ्यांचे अनुभवकथन, मुलाखती, बर्चीनृत्य, मल्लखांब, तबला जुगलबंदी इ. कार्यक्रम होते. या चित्रीकरणात प्रशालेतील १५६ विद्यार्थी सहभागी होते. कार्यक्रमाचे प्रक्षेपण दि. २९ जून रोजी रात्री ९.३० ते १०.३० या वेळात झाले.

### अध्यापक प्रशिक्षण

प्रशालेत नव्याने आलेल्या अध्यापकांसाठी सौर ज्येष्ठ ९ (३० मे) रोजी शिबिर झाले. त्यात मुख्यतः मा. गिरीशराव बापट यांनी प्रबोधिनीची शैक्षणिक भूमिका स्पष्ट केली. प्राचार्य मिलिंद नाईक यांनी प्रबोधिनीच्या कार्यसंस्कृतीबद्दल मार्गदर्शन केले. ज्ञान प्रबोधिनीच्या शिक्षण प्रणालीचा परिचय व्हावा या उद्देशाने दर बुधवारी प्रशिक्षण योजना केली हाती. त्यात कल्पकता, बुद्धिमान विद्यार्थ्यांची वैशिष्ट्ये, नियोजन कौशल्य या विषयांचे प्रा. मिलिंद नाईक यांनी मार्गदर्शन केले.

सौर आषाढ १६ (७ जुलै) रोजी छात्र प्रबोधन आयोजित प्रबोधन तासिका कार्यशाळेत प्रा. अश्विनी जोशी, प्रा. अंजली कर्वे, प्रा. अभिजित कुलकर्णी हे अध्यापक सहभागी झाले होते.

सौर आषाढ २९ ते ३१ (२०, २१, २२ ) जुलै रोजी झालेल्या प्रभागशः प्रशिक्षण वर्गात प्रशालेतील १३ अध्यापक व ३ अन्य सदस्य सहभागी झाले होते.

**अध्यापक बैठकी :** दर मंगळवारी अध्यापक बैठकीची योजना असते. त्यात पुढील मान्यवरांनी अध्यापकांना मार्गदर्शन केले.

| दिनांक | वक्ते | विषय |
|---|---|---|
| ३ जुलै | मा. वामनराव अभ्यंकर | पंचकोष विकसनातून शिक्षण |
| १० जुलै | श्री. गौरव मराठे | ऋषिव्हॅली शिबिरातील अनुभव कथन |
| ७ ऑगस्ट | जीन पियाजें फिल्म चर्चा | बुद्धिविकासाची संकल्पना |
| १५ सप्टें. | वा. अनघाताई लवळेकर | संशोधन निबंध लेखन |
| २ ऑक्टो. | प्रा. प्रशांत दिवेकर | सहाध्यायदिन |
| १६ ऑक्टो. | सौ. स्वाती केळकर | बुद्धिमान मुलांच्या समस्या |
| ९ एप्रिल | मा. गिरीशराव बापट | वर्षान्त उपासना |

यावर्षीच्या अनेक बैठका नव्याने तयार केलेल्या संगणक प्रणाली वापराच्या प्रशिक्षणासाठी झाल्या. त्यात प्रा. रोहिणी ढवळे, प्रा. मुकुलिका थत्ते, श्री. हरीश उंडे यांनी मार्गदर्शन केले.

### प्रतिज्ञाग्रहण

सौर चैत्र १२ (१ एप्रिल) रोजी झालेल्या प्रतिज्ञाग्रहण कार्यक्रमात प्रशालेतील प्रा. अश्विनी जोशी, प्रा. रोहिणी ढवळे यांनी प्रथम प्रतिज्ञा घेतली. प्रा. मृदुला पाठक व प्रा. मुकुलिका थत्ते यांनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली व प्रा. रागिणी नाईक यांनी तृतीय प्रतिज्ञा घेतली. सौर पौष ७ (२७ जाने.) रोजी कार्यप्रात्यक्षिकांच्या कार्यक्रमात प्रा. शांतला कुलकर्णी यांनी प्रथम प्रतिज्ञा घेतली.

**पालक-बैठक :** इ. ५वी ते १०वी च्या पालकांसाठी पालकसभा जून व जुलै या महिन्यात झाल्या. त्यात मुख्यतः वर्षभराचे नियोजन, अभ्यासक्रम, परीक्षांचे स्वरुप, विशेष उपक्रम इ. गोष्टींची निवेदने करण्यात आली.

**पालक-शिक्षक संघ बैठकी :** वर्षारंभी पालक-शिक्षक संघाची पुनर्रचना करण्यात आली. उपाध्यक्ष पदाची जबाबदारी श्री. आनंद आगाशे यांनी स्वीकारली. या सभेत ४ शिक्षक व १२ पालकांसह अशी १८ जणांची समिती कार्यरत आहे. दर दोन महिन्यांच्या अंतराने वर्षभरात चार बैठकी झाल्या. त्यात शाळेची रचना, व्यवस्था, बदल, नवीन उपक्रम व योजना, समस्या व उपाय यांविषयी मनमोकळा संवाद झाला.

### विशेष भेटी

ज्ञान प्रबोधिनीचा शैक्षणिक प्रयोग पाहण्यासाठी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अनेक गटांनी प्रशालेस भेट देऊन येथील सर्व उपक्रम समजून घेतले. त्यात बेळगाव-रोटरी क्लब सदस्य, नांदेड विद्यालय; सरस्वती विद्या मंदिर, कराड; समर्थ माध्यमिक विद्यालय, कर्जत; टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे येथील शिक्षकांचे गट होते तसेच अचलपूर-अमरावतीच्या समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, मांडवी येथील SKRKV ज्ञान गंगा पॉलिटेक्निकल कॉलेज, मुंबईचे आय आय टी, बोरीवलीच्या गोपाल्स गार्डन आणि वाड्याचे गुरुकुल येथील सदस्यांनी प्रशालेला भेट दिली.

**मनुष्यबळ** : अध्यापक संचात यावर्षी नवीन सात अध्यापिकांची भर पडली. श्री. नंदकुमार रावडे हे कर्मचारी सदस्य सेवानिवृत्त झाले व श्री. मंगश गायकवाड हे प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून सेवेत रुजू झाले. प्रशालेच्या शैक्षणिक व व्यवस्थापकीय कामासाठी आवश्यक अशा सॉफ्टवेअरची निर्मिती प्रशालेचा माजी विद्यार्थी श्री. सागर देशमुख व त्यांचे सहकारी सौ. स्नेहा, हरीश, अमोघ, स्मिता व अजिंक्य यांनी केली.

**स्मरण :** सौर आषाढ ५ (२६ जून) रोजी प्रशालेतील गणित विषयाचे अध्यापक श्री. रमेश गोंधळेकर यांचे दुःखद निधन झाले.

## अभ्यास व परीक्षांमधील यश

इ. ७वी गुणविकास योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती पुढील विद्यार्थ्यांना मिळाली

विद्यार्थी : साहिल दीक्षित, आलोक साठे, सुशांत एलभोर, तन्मय चिंचणीकर, मयुरेश भट्ट
विद्यार्थिनी : देविका गुमास्ते, स्वर्णिमा बेल्हे, सई दिवेकर, संपदा पेटकर, मैत्रयी बर्वे

राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेत राष्ट्रीय स्तरावर इ. ९वी च्या यश लेले, प्रणव बापट व वरद देशपांडे यांना शिष्यवृत्ती मिळाली. इ. १०वी च्या अभिषेक देढे व नचिकेत पानसे यांची राष्ट्रीय स्तर परीक्षेसाठी निवड झाली.

इस्कॉन या संस्थेने घेतलेल्या गीता प्रज्ञा बोध परीक्षेत इ. ९वी तील यश लेले यास ९७% गुण मिळून तो राज्यात तिसरा आला.

**विविध स्पर्धांतील यश – संख्यात्मक पारितोषिके ५८**

| क्रमांक | वक्तृत्व | पाठांतर | गायन/वादन | नाट्य/नृत्य | चित्रकला | प्रकल्प | बौद्धिक स्पर्धा | खेळ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रथम | ३ | १० | २ | ९ | १ | ४ | ३ | १ | ३३ |
| द्वितीय | २ | ३ | – | १ | ३ | – | २ | – | ११ |
| तृतीय | – | २ | ३ | ३ | – | १ | – | – | ९ |
| उत्तेजनार्थ | – | १ | २ | १ | – | – | १ | – | ५ |
| **एकूण** | **६** | **१७** | **६** | **१३** | **४** | **६** | **५** | **१** | **५८** |

### ♦ सुवर्ण महोत्सवी वर्षात झालेली प्रकाशने ♦

- From Formal Education To Man-Making
- विशेष प्रबोधिनीपण
- Why Gifted Education
- छात्र प्रबोधन - सुवर्ण महोत्सवी विशेषांक
- समतोल - विशेषांक - तत्त्वसप्तक
- ज्ञान प्रबोधिनी एक अभिनव शैक्षणिक प्रयोग
  खंड ४ - भाग २ - संशोधन
  भाग ३ - ग्रामविकसन
- चित्ररूप ज्ञान प्रबोधिनी
- आयुर्वेद औषधि संशोधिका कार्यवृत्त (१९७६-२०११)
- पत्रसंवाद
- झालिया दर्शन : माणूस होण्याचा एक प्रयत्न
- कथा स्वामी रामानंदतीर्थांच्या

**वा. गिरीश श्री. बापट यांची आगामी प्रकाशने**

- स्वतःला घडविण्यासाठी उपासना
- राष्ट्रघडणीसाठी मनुष्यघडण
- मनुष्यघडणीसाठी आवाहन

# शैक्षणिक उपक्रम संशोधिका

## ★ वा. ना. दांडेकर शिक्षक प्रशिक्षण केंद्र ★

सौर वैशाख १६ ते २१ शके १९३४ (६ ते ११ मे२०१२) या कालावधीत ज्ञान प्रबोधिनीच्या प्रदीर्घ अनुभवातून प्रयोगसिद्ध झालेल्या शिक्षण पद्धतींवर आधारित 'रूप पालटू शिक्षणाचे' या निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. विवेक पोंक्षे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक प्रशिक्षण केंद्रातील साधन व्यक्तींनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. शिबिराकरिता जळगाव, मालेगाव, बारामती, इचलकरंजी व मुंबई बांद्रा व पुणे येथून आलेल्या एकूण २२ शिक्षकांचा सहभाग होता.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण केंद्र परिषद, पुणे यांनी सौर वैशाख २७ ते २९ (१७ ते १९ एप्रिल) या कालावधीत आयोजित केलेल्या वयानुरूप समकक्ष वर्गात प्रवेश घेतलेल्या मुलांच्या शिक्षणासाठी साहित्य निर्मिती कार्यशाळेत प्रकाश रणनवरे सहभागी होते.

भारतीय जैन संघटनेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त झालेल्या कार्यक्रमात २०० जणांच्या शिक्षक गटाला प्रा. विवेक पोंक्षे यांनी 'शिक्षक प्रशिक्षण' या विषयावर मार्गदर्शन केले.

**धुळे शिक्षण संस्था, धुळे यांच्यासाठी चालू असलेला शालेय गुणवत्ता विकास कार्यक्रम**

१. सौर आषाढ १८ (९ जुलै) रोजी वर्षारंभ कार्यक्रमाने वार्षिक प्रशिक्षणाच्या दुसऱ्या टप्प्याची सुरुवात झाली. सहभागी तीन शाळांच्या वार्षिक संकल्पनांची निवेदने झाली. कार्यक्रमाला धुळे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. चितळे उपस्थित होते. प्रबोधिनी मार्फत श्री. प्रशांत दिवेकर, प्रा. आदित्य शिंदे, नितिश नरखेडकर यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले.

२. सौर श्रावण १३ ते १५ (४ ते ६ ऑगस्ट) या कालावधीत विज्ञान खेळणी या विषयी प्रा. उल्हास टुमणे व स्वयंअध्ययन कौशल्य या विषयी प्रा. प्रशांत दिवेकर यांनी मार्गदर्शन केले.

३. अग्रणी अध्यापक प्रशिक्षण शिबिर सौर भाद्रपद १७ ते १९ (८ ते १० सप्टें.)या कालावधीत पुणे येथे झाले. डॉ. विवेकराव कुलकर्णी व डॉ. अनघाताई लवळेकर, प्रा. मनोजराव देवळेकर, प्रा. प्रशांत दिवेकर यांनी अध्यापकांना मार्गदर्शन केले. मुलाखत सत्रासाठी उपक्रमशील शिक्षक प्रा. राजीव दिक्षित व प्रा. मोहन शेटे आले होते. या प्रशिक्षण काळात अध्यापकांनी पुणे शहरातील उपक्रमशील शाळांना भेटी दिल्या व तेथे चालू असलेल्या उपक्रमांची माहिती घेतली. एकूण २४ अध्यापकांचा सहभाग होता.

४. सौर आश्विन १३ ते १६ (५ ते ८ ऑक्टो.) या कालावधीत भूगोल अध्यापन याविषयी प्रा. मनोज देवणे, गणित अध्यापन प्रा. महेंद्रभाई सेठिया, इतिहास अध्यापन प्रा. प्रशांत दिवेकर, व्यवसाय मार्गदर्शन प्रा. आचार्य विनयकुमार व मनोशारीरिक विकसन याविषयी संवादिनी गटाच्या साधन व्यक्ती म्हणून प्रा. अंजली राईलकर व प्रा. मेधा परांजपे यांनी तीन शाळांच्या अध्यापकांना मार्गदर्शन केले.

५. सौर ७ ते ९ पौष (२८ ते ३० डिसें.) गुणवत्ता विकास वर्ग झाला. भाषा-प्रा. अविनाश बिनीवाले, नेतृत्वगट-प्रा. प्रशांत दिवेकर, हस्ताक्षर लेखन- श्री. विनायक माळी, बर्चीनृत्य-श्री. सारराज मारवर यांनी मार्गदर्शन केले.

**ISCON गुरुकुल संचलित गोवर्धन कृषीक्षेत्र, गावतरे, पो. हमरापूर, ता. वाडा, जि. ठाणे**

१. सौर आश्विन ४ व ५ (२६ व २७ सप्टें.) विद्यार्थ्यांसाठी स्वयंअध्ययन कौशल्य, अभ्यास पायऱ्या भाग १ व मासिक खेळ याविषयी प्रा. प्रशांत दिवेकर व श्री. प्रकाश रणनवरे यांनी ५५ विद्यार्थी व ८ अध्यापक स्वयंसेवक यांना दोन दिवस मार्गदर्शन केले.

२. सौर भाद्रपद २८ व २९ (२८ ते २९ सप्टेंबर) 'वाचन संस्कार'याविषयी ५० विद्यार्थी व १० अध्यापकांना प्रा. प्रशांत दिवेकर यांनी मार्गदर्शन केले.

३. सौर २९, ३० अग्रहायण(२० ते २१ डिसें.) या कालावधीत तेथील इ. ५वी ते ९वी तील विद्यार्थ्यांसाठी व दहा अध्यापकांसाठी विज्ञान खेळणी निर्मिती व त्यामागील वैज्ञानिक तत्त्वे याविषयी कार्यशाळा प्रा. उल्हास टुमणे व सौ. सुनिता टुमणे यांनी घेतली.

४. सौर फाल्गुन १० ते १३ (२ ते ४ मार्च) या कालावधीत विद्यार्थी व शिक्षकांसाठी इतिहास अध्यापन, कथाकथन व स्वयंअध्ययन कौशल्ये याविषयी प्रशिक्षण वर्ग झाला. प्रा. राहुल कोकीळ व प्रा. प्रशांत दिवेकर यांनी मार्गदर्शन केले.

**अन्य प्रशिक्षण वर्ग**

सौर आषाढ २२ व २३ (१३ व १४ जुलै) रोजी माहिती तंत्रज्ञान आणि इतिहास अध्यापन याविषयी इतिहास अध्यापकांसाठी कार्यशाळा झाली. एकूण १३ अध्यापकांचा सहभाग होता. प्रा. प्रशांत दिवेकर, सौ. पल्लवी पराडकर, श्री. सौरभ बोडस, श्री. राजीव देवकर यांनी मार्गदर्शन केले.

सौर श्रावण ५ ते ८ (२७ ते ३० जुलै) या कालावधीत आर्ट ऑफ लिव्हिंग संचलित श्री. विद्यामंदी घाटशिला, झारखंड येथील व्यक्तिमत्त्व विकास केंद्राच्या १२ प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या एकूण १६ अध्यापकांचे प्रशिक्षण झाले. साधन व्यक्ती म्हणून प्रा. प्रशांत दिवेकर, मा. शिवराज पिंपुडे व श्री. अनिल गुरव यांनी मार्गदर्शन केले.

सौर आषाढ ३१ रोजी स्वरुपवर्धिनी मध्ये शास्त्र मार्गदर्शकांच्या प्रशिक्षण वर्गात प्रा. आदित्य पोंक्षे यांनी विज्ञान प्रकल्प या विषयावर मार्गदर्शन केले.

सौर २१ पौष (११ जाने.) रोजी पुणे जिल्ह्यातील केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या शिक्षकांची 'समस्या परिहार कौशल्यांचे मूल्यमापन' या विषयी कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेला डॉ. सुजला वाटवे, डॉ. सविता कुलकर्णी, प्रा. विवेक पोंक्षे, प्रा. लक्ष्मी रोशन यांनी मार्गदर्शन केले कार्यशाळेला एकूण २१ शाळांमधून आलेल्या ३९ शिक्षकांची उपस्थिती होती.

पुणे जिल्हा गणित अध्यापक मंडळाने सौर २७ व २८ माघ (१६ ते १७ फेब्रु.) या दोन दिवसीय गणित अध्यापकांच्या अधिवेशनात प्रा. विवेक पोंक्षे यांचे Taxicab Geometry व कु. स्नेहा भन्साळी यांचे Tessellations याविषयी ७० अध्यापकांना मार्गदर्शन झाले.

सौर फाल्गुन ९ (२८ फेब्रु.) रोजी सावरकर प्रतिष्ठान, सांगली तर्फे, विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. प्रशांत दिवेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सायंकाळी त्यांचे विज्ञाननिष्ठ आणि हिंदुत्वनिष्ठ सावरकर याविषयी व्याख्यान झाले. याच दिवशी सांगली येथे पाच शाळांतील ४० शिक्षकांसाठी 'मूल्यमापन पद्धती' याविषयी प्रा. प्रशांत दिवेकर यांनी मार्गदर्शन केले.

गोवा मुख्याध्यापक संघामार्फत सौर कार्तिक १७ ते १९ (८ ते १० नोव्हें.) रोजी मडगाव,पणजी व फोंडा येथे शिक्षकांसाठी 'अध्यापकांची उपक्रमशीलता आणि प्रेरणा' या विषयावर एक दिवसाच्या कार्यशाळा योजल्या गेल्या होत्या. या कार्यशाळेसाठी अनुक्रमे १४०, १३० आणि १५ असे एकूण २८५ अध्यापक गोवा राज्यातून उपस्थित होते.

## ★ बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र ★

राष्ट्रीय प्रज्ञा शोध पूर्व परीक्षेचा निकाल सौर फाल्गुन १९३४ (मार्च २०१३) मध्ये जाहीर करण्यात आला. ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्राद्वारे सौर आषाढ ते सौर कार्तिक या कालावधीत Online मार्गदर्शन घेतलेल्यांपैकी ६ विद्यार्थी आणि अतिजलद (NTSE Revision Crash Course) वर्गात मार्गदर्शन घेतलेला एक विद्यार्थी धरुन एकूण १४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

सौर चैत्र ८ (२८ मार्च २०१२) रोजी के. पी. आय. टी. कंपनीचे अध्यक्ष श्री. रवि पंडित यांची ग्राम प्रबोधिनीला भेट झाली. के. पी. आय. टी. व ज्ञान प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने चालू असलेल्या विज्ञान प्रसार कार्यक्रमांतर्गत त्यांच्या कंपनीच्या अभियंत्यांनी इ. ८वी च्या विद्यार्थ्यांकडून विज्ञान खेळणी तयार करून घेतली व त्याविषययी मार्गदर्शन केले. श्री रवि पंडित यांनी ह्या प्रत्येक विज्ञान खेळण्यामागील विज्ञान सांगितले.

सौर वैशाख ७ ते ११ (२७ एप्रिल ते १ मे) या कालावधीत स्नेह मंदिर, गोवा, येथे राष्ट्रीय प्रज्ञा (NTSE) परीक्षा देणाऱ्या ४० विद्यार्थ्यांसाठी शिबिर झाले.

सौर ज्येष्ठ ८ ते १२ (२९ मे ते २ जून)या कालावधीत जैन पब्लिक स्कूल, झाबुआ, बंडनगर, जि. उज्जैन (म.प्र.) तसेच इंदोर येथील इ. ८वी च्या विद्यार्थ्यांकरिता राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा पूर्वतयारी मार्गदर्शन वर्ग झाले. आयुका, मुक्तांगण विज्ञान संशोधिका व प्राणी संग्रहालय (कात्रज) येथे विद्यार्थ्यांच्या भेटी झाल्या.

सौर श्रावण ३ (२५ जुलै) रोजी के. पी. आय. टी कमिन्स मधील ५८ अभियंत्यांचे विज्ञान खेळणी निर्मिती व त्यामागील विज्ञान तत्त्वे याविषयी मार्गदर्शन प्रा. उल्हास टुमणे यांनी केले. विज्ञान प्रसारच्या कार्यक्रमात पुणे जिल्ह्यातील मुळशी व माण तालुक्यातील २५ शाळा सहभागी झाल्या आहेत. अभियंते कामातील दोन तास काढून या मुलांना विज्ञान खेळणी, प्रयोग, प्रात्यक्षिकांद्वारे विज्ञानतत्त्व समजावून देत आहेत.

सौर कार्तिक १४ ते १९ (५ ते १० नोव्हे.)रोजी राष्ट्रीय प्रज्ञा शोध (NTSE)देणाऱ्या इ. १०वी च्या विद्यार्थ्यांकरिता उजळणी वर्ग झाला. या वर्गामध्ये धुळे जिल्ह्यातील जयहिंद हायस्कूल मधील ३१ विद्यार्थी व पुणे शहरातील १५ विद्यार्थी अशा एकूण ४६ विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

सौर कार्तिक १७ ते १९ (८ ते १० नोव्हे.) रोजी गोवा फोंडा येथे राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेचा (NTSE)प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला.

सौर अग्रहायण २३ ते २६ (१४ ते १७ डिसें.) या कालावधीत श्री. श्री. रविशंकर विद्यालय भूगांव येथे 'स्वयंअध्ययन कौशल्य' याविषयी प्रा. प्रशांत दिवेकर यांनी विद्यार्थ्यांचा वर्ग घेतला. एकूण ३२ विद्यार्थी व तीन अध्यापकांचा सहभाग होता.

सौर अग्रहायण २७ ते २ पौष (१८ ते २३ डिसें.) या कालावधीत छत्तीसगड मधील दंतेवाडा येथील सरकारी शाळांमध्ये शिकणाऱ्या ५३ विद्यार्थ्यांसाठी पुण्यात पाच दिवसांच्या जिज्ञासा विज्ञान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आधुनिक सुविधांपासून वंचित असलेल्या दंतेवाडा जिल्ह्यात शैक्षणिक उपक्रमांना सहकार्य करण्यासाठी 'बचपन बचाओ' हा प्रकल्प सरकारतर्फे राबविण्यात येत आहे. या उपक्रमानुसार पुण्यातील भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था (आयसर) व ज्ञान प्रबोधिनी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांना विज्ञान तसेच शिक्षणाबाबत प्रेरणा मिळावी हा या शिबिराचा उद्देश होता. यामध्ये स्वतः करून पाहण्याचे प्रयोग आणि सिंहगड किल्ला, आयुका विज्ञान आश्रमशाळा पाबळ येथे भेटी दिल्या गेल्या. शिबिराचे उद्घाटन सौर अग्रहायण २७ (१८ डिसें.) रोजी आयसरचे संचालक के. एन्. गणेश यांच्या हस्ते झाले. शिबिराचे संयोजन ज्ञान प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी श्री. कौस्तुभ देशपांडे व त्यांचे सहकारी सुगत दाभोलकर, आदित्य पोंक्षे यांनी केले.

सन २०१२ हे वर्ष राष्ट्रीय स्तरावर गणित वर्ष म्हणून साजरे होत आहे. या वर्षी श्रेष्ठ भारतीय गणिती श्रीनिवास रामानुजन यांच्या जन्मास १२५ वर्षे होत आहेत. यानिमित्ताने ज्ञान प्रबोधिनी बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र आणि पुणे जिल्हा गणित अध्यापक मंडळ यांच्या वतीने 'चला गणिताशी मैत्री करू या' कार्यक्रमांतर्गत व्याख्यानमाला आयोजित केली होती. यामध्ये पुणे शहरांतील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पुढीलप्रमाणे व्याख्याने झाली

| क्र. | दिनांक | विषय | मार्गदर्शक | सहभागी शाळा | विद्यार्थी | अध्यापक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | भाद्रपद १६ | निसर्गातील गणित | प्रा. अभिजीत रांझेकर | ११ | ६३ | १२ |
| २. | भाद्रपद १३ | सर्व संचरित (पाय् $\pi$) | प्रा. विवेक पोंक्षे | १२ | ८३ | १० |
| ३. | भाद्रपद २३ | पायथागोरसचे प्रमेय | प्रा. स्नेहा भन्साळी | ११ | ६७ | ११ |
| ४. | आश्विन २१ | त्रिमितीची किमया | प्रा. स्नेहा भन्साळी | | ६५ | |
| ५. | अग्रहायण २३ | टॅक्सीकॅब भूमिती | प्रा. विवेक पोंक्षे | ५ | २७ | ५ |
| ६. | पौष १४ | विभाज्यतेच्या कसोट्या | प्रा. विनायक गोडबोले | ६ | ५६ | |
| ७. | ११ जाने. | निसर्गातील गणित | प्रा. विवेक पोंक्षे | ६ | ६५ | |
| ८. | माघ १२ | आकडेमोड न करता गणित | डॉ. मंगला नारळीकर | १० | ७० | |
| ९. | १५ फेब्रु. | विज्ञानातील गणित | डॉ. राजेंद्र देवपूरकर | ६ | ७० | |

## ★ शैक्षणिक साधन केंद्र ★

www.erc-pune.org या संकेतस्थळावर मराठी कविता, संस्कृत श्लोक, इ. ८वी ते ९वी च्या अभ्यासक्रमावर आधारित विज्ञानातील प्रयोग आणि स्लाईड शो व भूगोलाचे स्लाईड शो इ. ई-साहित्य तयार आहे.

ज्ञान प्रबोधिनीने कुमारवयीन (इ. ९वी ते १२वी) विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शन (करिअर्सची) ओळख करून देणारा पाच डी. व्ही. डी. चा संच तयार केला आहे. यामध्ये विविध करिअर्स करणाऱ्या ४१ व्यावसायिकांच्या मुलाखती आहेत. ह्या करिअर्स कला, वाणिज्य, अभियांत्रिकी, आरोग्य आणि विज्ञान या विषयांमधील आहेत. तज्ज्ञ व्यावसायिकांनी या करिअर्स निवडण्यासाठीची पात्रता, अभ्यासक्रम, अध्ययनाची तंत्र व पद्धती आणि या करिअर्समधील संधी आणि आव्हाने याविषयी माहिती दिली आहे. त्यांच्या व्यावसायिक जीवनातला एक नेहमीचा दिवस कसा असतो हे ही सांगितले आहे. सर्वच तज्ज्ञांनी त्यांच्या व्यवसायातील अनुभव मोकळेपणाने मांडले आहेत. ह्या सर्व मुलाखती पाहणे आणि ऐकणे हा अतिशय समृद्ध शैक्षणिक अनुभव आहे. मा. विवेकराव पोंक्षे यांच्या मार्गदर्शनाखाली सौ. पल्लवी पराडकर सौ. गीता साठे यांची या कामात मदत झाली.

### छोटे सायंटिस्ट - विज्ञान प्रसार कार्यक्रम

के. पी. आय. टी. कमिन्स व ज्ञान प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने 'छोटे वैज्ञानिक' हा विज्ञान प्रसाराचा कार्यक्रम मावळ व मुळशी तालुक्यातील एकूण २० शाळांमध्ये इ. ८वी च्या एकूण ८०० विद्यार्थ्यांकरिता वर्षभर राबविला गेला. प्रत्येक शाळेतून पाच अशा एकूण १०० प्रयोगांचे एकत्रित प्रदर्शन सौर फाल्गुन ९ (२८ फेब्रु.) विज्ञानदिनानिमित्त के. पी. आय. टी. कमिन्सच्या हिंजवडी येथील कार्यस्थळावर आयोजन केले होते. या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ संशोधक डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते झाले.

### संपर्क : ईशान्य भारत

सौर ज्येष्ठ १ व सौर ज्येष्ठ ४ व ५ (जून २०१२ ) या कालावधीत विवेकानंद केंद्र विद्यालय व संपूर्ण केंद्र विद्यालय, दिब्रुगड-आसाम येथे भौमितिक प्रतिकृती तयार करण्याच्या पाच कार्यशाळा झाल्या. सुमारे २२५ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला. तसेच आसाम मधील चहाच्या मळ्यातील मजुरांच्या मुलांसाठी असलेल्या विवेकानंद केंद्राच्या सहा आनंदालयातील सुमारे २५० विद्यार्थ्यांकरिता आनंद मेळावे घेण्यात आले.

**पूर्वांचल मेळावा :** सौर भाद्रपद ११ (२ सप्टें.) रोजी ज्ञान प्रबोधिनी येथे ईशान्य भारतातील महाराष्ट्रात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा मेळावा जनकल्याण समिती यांच्यामार्फत आयोजित करण्यात आला होता. यामध्ये एकूण ९० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. 'व्यवसाय मार्गदर्शन'याविषयी प्रा. सुभाषराव देशपांडे, प्रा. विवेक वेलणकर, श्री. विश्वास लापालकर व श्री. अरविंद अधिकारी यांनी मार्गदर्शन केले.

सौर २४ अग्रहायण ते २२ पौष (१५ डिसें. ते १२ जाने.)या कालावधीत कु. स्नेहा भन्साळी यांनी हायल्यांग अरुणाचल येथे इ. १०वी ते १२वी मधील ४३ विद्यार्थ्यांकरिता गणित याविषयी मार्गदर्शन केले. सौर २२ ते २५ माघ (११ ते १४ फेब्रुवारी) या कालावधीत रोईंग, अरुणाचल, येथील उच्च माध्यमिक वर्गातील ११३ विद्यार्थ्यांना गणित याविषयी मार्गदर्शन केले. आठ स्वयंसेवकांचा या वर्गात सहभाग होता.

# छात्र प्रबोधन

## १. ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सवानिमित्त छात्र प्रबोधनतर्फे झालेले विविध कार्यक्रम

**१.१. प्रबोधिनी विशेषांक :** सौर श्रावण (ऑगस्ट २०१२) चा अंक 'प्रबोधिनी विशेषांक' म्हणून प्रकाशित करण्यात आला. ८० पानांच्या अंकातून विद्यार्थी-वाचकांना प्रबोधिनीची विविध अंगांनी ओळख करून देण्याचा प्रयत्न झाला. अंक संग्राह्य झाल्याचे अनेकांनी कळवले.

**१.२ संपर्क मेळावे :** वर्षभरात चाळीसगाव, कोल्हापूर, अकोला या तीन ठिकाणी वाचक मेळावे घेतले गेले. त्यातून सुमारे ८०० विद्यार्थी, १०० अध्यापक, संस्थांचे पदाधिकारी, बहुसंख्य पालक यांच्याशी संवाद व संपर्क साधला गेला.

**१.३ छात्र प्रबोधन शिबिरार्थी मेळावे :** छात्र प्रबोधनच्या विविध शिबिरांना यापूर्वी येऊन गेलेल्या पदव्युत्तर युवक-युवतींचा **युवोन्मेष मेळावा** व पदवीपूर्व युवक-युवतींचा **युवा मेळावा** पार पडला. 'बदलत्या परिस्थितीची आव्हाने आणि त्यासाठी आपली पूर्वतयारी', 'प्रबोधिनी आणि मी', 'नेतृत्व कार्यशाळेची संकल्पना' इ. विषयांवर व्याख्याने व चर्चा आयोजित झाली. यानिमित्ताने सुमारे ४५० युवक-युवतींशी संपर्क झाला व त्यांची माहिती संगणकावर अद्ययावत करण्यात आली.

**१.४ परिसंवाद :** प्रबोधिनीच्या सुवर्णमहोत्सवी प्रदर्शनात 'कुमार साहित्य-वास्तव व आव्हाने' या विषयावर परिसंवाद आयोजित केला होता. कुमार साहित्याच्या संदर्भात विषय-आशय-भाषा आणि मांडणी या संदर्भात चर्चा झाली. परिसंवादात वक्ते म्हणून डॉ. नीलिमा गुंडी, डॉ. सदानंद बोरसे, श्री. मल्हार अरणकल्ले यांनी आपले विचार मांडले.

**१.५ निबंध स्पर्धा :** प्रबोधिनीच्या सर्व केंद्रांसाठी **'मला कळलेली प्रबोधिनीची कार्यसंस्कृती'** या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित केली होती. प्रबोधिनीच्या निगडी, सोलापूर व पुणे केंद्रांवरून ३० शिक्षक व १६ शिक्षकेतर सदस्यांनी यामध्ये भाग घेतला. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून मा. यशवंतराव लेले व शैलजाताई देशमुख यांनी काम पाहिले.

**१.६ प्रबोधिनीच्या विभागप्रमुखांचे अनुभवकथन :** प्रबोधिनीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त प्रबोधिनीची अधिक जवळून ओळख व्हावी म्हणून प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांची प्रबोधिनीतील वाटचाल अनुभवकथनाद्वारे व प्रश्नोत्तराद्वारे समजून घेण्याचे ठरविले. त्यानुसार वर्षभरात ७ विभागप्रमुखांची अनुभवकथने झाली.

**१.७ केंद्रप्रमुख बैठक :** स्थानिक वितरण केंद्र चालविणाऱ्या केंद्रप्रमुखांची बैठक ७ माघ (२७ जाने.) रोजी घेण्यात आली. २१ गावांमधून ३२ केंद्रप्रमुख त्याला उपस्थित होते. सातत्यपूर्ण काम करत असलेल्या १५ केंद्रप्रमुखांना मा. संचालकांच्या हस्ते पत्र व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

## २. मासिक- दिवाळी अंक - वितरण केंद्रे

**२.१ विशेषांक व लेखमाला :** यावर्षी 'छात्र प्रबोधन' मासिकाचा, सौर ज्येष्ठचा (जून १२)चा अंक **अनुवाद विशेषांक** होता. प्रादेशिक आणि परदेशी अशा दहा वेगवेगळ्या भाषांमधील भाषांतरित साहित्य या अंकात देण्यात आले होते. तसेच 'विद्याव्रत संस्कारातून व्यक्तिमत्त्व विकसन' यासंदर्भात डॉ. स्वर्णलता भिशीकर यांची **'उजळती वाट'**, चित्रकलेशी निगडित **'चित्रगोष्टी'**, 'निर्णयातील स्वावलंबन म्हणजे काय?' या प्रश्नांची उकल करून देणारी **'निर्णयातील स्वावलंबन'** या लेखमाला प्रकाशित करण्यात आल्या.

**२.२ माझ्या नजरेतून छात्र प्रबोधन- 'प्रतिक्रिया' :** 'छात्र प्रबोधनच्या आत्तापर्यंतच्या वाटचालीबद्दल काय वाटते' याबाबतच्या लेखी प्रतिक्रिया छात्र प्रबोधनशी संबंधित विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून मागविल्या होत्या. त्या प्रतिक्रियांचे संकलन केले गेले.

**२.३ अंक संगणकावर पाहा/ऐका :** छात्र प्रबोधनच्या लेखांना ऑडिओ/व्हिडिओद्वारे पूरक जोड देण्याचा उपक्रम यावर्षी सौर माघ (फेब्रुवारी २०१३) पासून प्रायोगिक स्तरावर सुरू झाला असून आत्तापर्यंत २५ लेखांना ही जोड दिली गेली.

**२.४ दिवाळी अंक :** 'छात्र प्रबोधन' तर्फे यावर्षी कुमार वयोगटातील मुलामुलींसाठी मराठी, इंग्रजी, ग्रामीण व बोलका असे चार स्वतंत्र दिवाळी अंक तर युवक-युवतींसाठी 'युवोन्मेष'हा अंक प्रकाशित करण्यात आला. याशिवाय चारही अंकांची एकत्रित संगणकीय आवृत्तीही (पीडीएफ स्वरूपात सीडी) प्रकाशित करण्यात आली. यात मराठी २५,०००, इंग्रजी ७,०००, ग्रामीण १३,०००, युवोन्मेष ४,००० बोलका अंक ९००, संगणकीय पीडीएफ अंक ६०० असा एकत्रित प्रकाशनपूर्व नोंदणीचा आकडा ५०,००० च्या वर गेला. तसेच अंध मित्रांसाठी यावर्षीही मराठी अंकाचे ब्रेल लिपीतले रूपांतर प्रकाशित करण्यात आले. बोरीवली व औरंगाबाद या ठिकाणी हे ब्रेल लिपीतील अंक पाठविण्यात आले.

**२.५ नोंदणी व वितरण केंद्रे :** महाराष्ट्र व गोवा मिळून यावर्षी ११९ गावांमध्ये स्थानिक केंद्रप्रमुखांनी स्वयंस्फूर्तपणे 'छात्र प्रबोधन' दिवाळी अंकांची नोंदणी व वितरण सांभाळले. दिवाळी अंक प्रचार - नोंदणी - वितरणाची संपूर्ण जबाबदारी श्री. रवींद्र भोसले यांनी सांभाळली. दिवाळी अंकाच्या निमित्ताने सर्व केंद्रांवर मोठ्या प्रमाणावर अंकांची नोंदणी केलेल्या शाळांसाठी पुस्तक भेट योजना राबविली गेली.

## ३. उपक्रम व स्पर्धा :

**३.१. सभासद पालक मेळावा-पुणे :** सौर भाद्रपद ११(२ सप्टें.) रोजी छात्र प्रबोधनच्या पुण्यातील सभासदांसाठी एक मेळावा आयोजित केला गेला. सुमारे ५० सभासद व त्यांचे ५० पालक या मेळाव्यात सहभागी झाले होते. लेखकांशी प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीवरून संवाद हा या मेळाव्याचा महत्त्वाचा भाग होता.

**३.२ मासिकावर आधारित मेळावे :** यंदा ग्रामीण दिवाळी अंकाबरोबरच मराठी व इंग्रजी दिवाळी अंकांवरही २० ठिकाणी मेळावे घेतले व त्यात १२०० विद्यार्थी सहभागी झाले.

**३.३ जोडीकार्य व साहस सहल :** एप्रिल-मे २०१२ या कालावधीत 'जोडीकार्य' हा 'दूरस्थ अनुभव' उपक्रम राबविण्यात आला. त्यात इंदापूर, कर्जत, मुंबई, पुणे येथील सुमारे २५ जोड्यांनी भाग घेतला.

**३.४ हस्तलिखित स्पर्धा :** यंदाच्या वर्षी महाराष्ट्रातून २८ शाळांमधील ५९ संघांनी हस्तलिखित स्पर्धेत भाग घेतला होता. सुमारे ८५० विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदविला. सर्व विजेत्या संघांना (८ संघ) पुस्तके, रोख रक्कम व प्रशस्तिपत्रक बक्षीस म्हणून देण्यात आले.

**३.५ इंग्रजी हस्तलिखित स्पर्धा :** इंग्रजी माध्यमांच्या शाळांसाठी पहिल्यांदाच हस्तलिखित स्पर्धा आयोजित केली गेली. या स्पर्धेमध्ये ७ शाळांमधील १३ संघांनी भाग घेतला होता. यामध्ये ७१ विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

**३.६ प्रबोधिनी परिचय सहल :** ३ व ४ माघ (दि. २२ व २३ फेब्रु.) या दिवसांमध्ये प्रबोधिनी परिचय सहलीचे आयोजन केले होते. त्यात ८ केंद्रावरील २८ जणांचा सहभाग होता. सहलीची जबाबदारी साताऱ्याचे केंद्रप्रमुख श्री. सतीश कुलकर्णी यांनी घेतली होती.

**४. प्रकाशने :** गेल्या वर्षभरात छात्र प्रबोधनतर्फे ६ पुस्तकांची पुढची आवृत्ती / पुनर्मुद्रणे प्रकाशित झाली. तसेच 'हसतखेळत बुद्धिविकास भाग २' या पुस्तकाची इंग्रजी आवृत्ती प्रकाशित झाली. आज अखेर 'छात्र प्रबोधन'ने एकूण **५८ पुस्तके** प्रकाशित केली आहेत. नियमितपणे प्रबोधिनीतील विक्रीकेंद्र व विविध प्रसंगी स्टॉल लावून स्वतंत्र पुस्तक विक्री केली गेली.

**५. विभागातील सदस्यांसाठी उपक्रम :** गणेशोत्सवात गणपती आरती व त्याचा अर्थ समजून घेणे, आषाढी एकादशी अभंग गायन, वर्षारंभ-वर्षान्त उपासना, सरस्वती-लक्ष्मीपूजन उपासना, दिवाळी श्रमपरिहार, संचालक भेट इ. प्रासंगिक कार्यक्रम झाले. स्वामी विवेकानंदांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्ताचे औचित्य साधून विभागातील प्रत्येक सदस्याने 'राष्ट्रद्रष्टे विवेकानंद' या पुस्तकाची प्रत्येकी २-२ प्रकरणे वाचून त्यांचे सार विभागाच्या मासिक बैठकीत विभागातील सर्व सदस्यांसमोर सांगितले. विभागातील सदस्यांचा प्रत्येकी एक लक्ष रुपयांचा आरोग्य विमा उतरवला असून एकूण हप्त्याच्या ऐंशी टक्के रक्कम विभागाद्वारा भरण्यात आली.


## ज्ञान प्रबोधिनीची कुमारांसाठी उपयुक्त पुस्तके

**समृद्ध आशय, तज्ज्ञ लेखक, आकर्षक छपाई, माफक किंमत !**

**✻ कथासंग्रह**
- मृद्गंध, मोहोर (प्रत्येकी) ६०/-
- बहर ५०/-
- कहाणी दोन भावांची ३०/-
- मृदुभाव जागे होता... ३०/-
- प्रेरक कथा ४०/-

**✻ ललित लेखसंग्रह**
- अलगुज ५०/-
- केवड्याचं पान ५०/-
- बकुळफुलं ६०/-

**✻ नामवंत कवींच्या काव्याविषयी रसग्रहणात्मक लेखांचा संग्रह**
- गंध मोहवी काव्याचा - भाग १ व भाग २ प्रत्येकी ७०/-

**✻ अभ्यासविषय/कृतिपर पुस्तक**
- असे घटते सुंदर अक्षर १५/-
- प्रज्ञाबोध - भाग ४ ६०/-
- प्रज्ञाबोध - भाग ५ ७०/-

**✻ कवितासंग्रह**
- अक्षरबोली,कवितेच्या गावा ३०/-
- शब्दांची रत्ने ६०/-

**✻ ज्ञान प्रबोधिनी खंड - ४**
- **भाग १- शिक्षण प्रभाग १००/-**
- **भाग २- संशोधन प्रभाग १००/-**
- **भाग ३- ग्रामविकसन प्रभाग १००/-**

**✻ विचार व कृतिप्रवर्तक लेखसंग्रह**
- स्वीकारशील स्वदेशी ५०/-
- **Green Message 20/-**
- हट्टी व्हा, हट्टी ! ५०/-
- हरित संदेश १५/-

**✻ व्यक्तिविकासाशी निगडित पुस्तके**
- प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास ५०/-
- व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत ७०/-
- कल्पक बनू या ८०/-
- **Be Creative 100/-**
- गीता-गीताई १०/-
- तरंग मनाचे ५०/-

**✻ अनुभवपर, प्रेरणादायी पुस्तके**
- जिद्दीची लोभस रूपं ६०/-
- आयुष्यातील वादळलाटा ७०/-
- कथा इस्रोची ६०/-
- आम्ही असे घडलो ८०/-
- हरिसिंह नलुआ ६०/-

**✻ माहितीपर पुस्तके**
- गिर्यारोहणगाथा ४०/-
- छंद आकाशदर्शनाचा ८०/-
- आपला पाऊस ३०/

**✻ शिक्षक-पालकांसाठी उपयुक्त पुस्तके**
- **बुद्धिवैभव २५**
- **Glory of Intelligence ३०**
- **हसत खेळत बुद्धिविकास भाग-१ १५०**
- **हसत खेळत बुद्धिविकास भाग-२ १५०**
- **Enhancing the Potential through Play -1 & 2 each १५०**
- **गंमत मोठ्ठं होण्यातली १५०**
- **रूप पालटू शिक्षणाचे ३०**
- **सामाजिक जाणीव संवर्धन ८०**
- **आश्वासक पालकत्व ८०**
- **प्रबोधन गीते पुस्तक २०**
- **MP3 Audio CD. ५०**
- **चित्ररूप ज्ञान प्रबोधिनी ७५**

**ज्ञान प्रबोधिनीची चरित्रात्मक व वैचारिक पुस्तके**
- **राष्ट्रद्रष्टे विवेकानंद ...................... १२०**
- **विवेकानंद-कन्या भगिनी निवेदिता ........ ८०**
- **ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक वि. वि. पेंडसे ... १००**
- **विवेकानंदांचा राष्ट्रधर्म ...................... ६०**
- **समर्थ रामदास काय म्हणाले? ............... ६०**
- **राष्ट्रदेवो भव ................................ ५०**
- **स्मृतीतुनी स्फुरो कृती ...................... १५**
- **महात्मा गांधींचा राष्ट्रधर्म .................. ३०**
- **महर्षी दयानंद काय म्हणाले? ............... ३०**
- **स्वत:ला घडविण्यासाठी उपासना .......... ३०**

**★ छात्र प्रबोधन DVD १२ वर्षांमधील १४४ अंक/७५०० पाने, फक्त १५० रु.**

**★ वितरण : छात्र प्रबोधन, पुणे - ३०**

# स्पर्धा परीक्षा केंद्र

**प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या निवडीसाठी होणाऱ्या केंद्र स्तरावरील (UPSC) परीक्षेसाठी ज्ञान प्रबोधिनी स्पर्धा परीक्षा केंद्रामध्ये मार्गदर्शन केले जाते. अधिकाधिक संख्येने प्रशासकीय अधिकाऱ्यांची निवड व्हावी आणि त्यांनी स्वच्छ व कार्यक्षमरित्या काम करावे यासाठी ज्ञान, कौशल्य व वृत्तीघडण यांचे प्रशिक्षण देण्याची रचना तयार करून** Know your Self, Know your System, Know your Society **या सूत्राच्या आधारे संपूर्ण प्रशिक्षणाचे नियोजन केले जाते.**

**वर्षारंभ समारंभ व मातृभूमिपूजन :**

२०१२-१३ या शैक्षणिक वर्षाची सुरुवात वर्षारंभ समारंभ व मातृभूमि पूजनाच्या कार्यक्रमाने झाली. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व अतिथी अतुलचंद्र कुलकर्णी (IPS, संचालक,परराष्ट्र व्यवहार मंत्रालय) व अध्यक्ष प्रबोधिनीचे संचालक मा. गिरीशराव बापट हे होते. वर्षारंभ समारंभ व मातृभूमीपूजनाचे औचित्य साधून MPSC व UPSC २०११ च्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ करण्यात आला.

**केंद्र लोकसेवा आयोग परीक्षा (UPSC) :**

### १) UPSC Mission 1200 वर्ग :

UPSC पूर्वपरीक्षा २०१२ मे महिन्यात पार पडली. ही परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी मुख्य परीक्षा मार्गदर्शन वर्ग झाले. एकूण आठ प्रकारचे वर्ग घेण्यात आले. त्यासाठी एकूण २७३ प्रवेश होते. यामधे सामान्य अध्ययन व पाच वैकल्पिक विषयांचे मार्गदर्शन झाले. त्याचबरोबर लोकप्रशासन या विषयाच्या सराव चाचणीचे वर्ग घेण्यात आले. हे वर्ग जून ते ऑगस्टपर्यंत चालले. ऑगस्टमध्ये पूर्वपरीक्षा निकाल लागल्यानंतर या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी मुख्य परीक्षा सराव चाचण्या झाल्या.

UPSC २०११ च्या परीक्षेत यशस्वी होऊन विविध पदांवर निवड झालेले विद्यार्थी अधिकारी अमृतेश औरंगाबादकर(IAS) विकास सुरळकर (IAS) महेश शिंगटे (IRS) रविंद्र बिनवडे (IAS), समृद्धी हांडे (IRS) तसेच काही ज्येष्ठ विद्यार्थी रविंद्रनाथ पाटील (IPS), कौस्तुभ बोंद्रे, त्याचबरोबर प्रा. डॉ. वसंत नांदेडकर यांनी Mission 1200 च्या वर्गांना मार्गदर्शन केले.

### २) UPSC मुख्य व पूर्वपरीक्षा २०१२ सामान्य अध्ययन मार्गदर्शन वर्ग :

UPSC २०१३ च्या पूर्वपरीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सामान्य अध्ययन वर्गाच्या प्रवेशासाठी ५२५ मुलाखती झाल्या. १४५ विद्यार्थ्यांची प्रवेश चाचणी घेण्यात आली. मुलाखतीतून थेट प्रवेश ९० व प्रवेश चाचणी परीक्षेतून ३० असे १२० विद्यार्थी या वर्गासाठी निवडण्यात आले.

या वर्गाचा कालावधी जून २०१२ ते मार्च २०१३ असा एक वर्षाचा असतो. लोकप्रशासन, भूगोल, इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, पाली या वैकल्पिक विषयांचे मार्गदर्शन वर्ग झाले. सर्व मिळून या वर्गांना एकूण २२४ विद्यार्थी होते. वैकल्पिक विषयांसाठी प्रा. डॉ. वसंत नांदेडकर, अमृतेश औरंगाबादकर (IAS), विकास सुरळकर (IAS), हृषिकेश सोनवणे (IRS), तेजश्री कांबळे, सागर डोईफोडे यांनी मार्गदर्शन केले.

**सेमिनार सादरीकरण** - अभ्यासक्रमातील social issue मधील विविध विषय घेऊन सेमिनार घेतले गेले. 'सेमिनार' कसा द्यावा याचे मार्गदर्शन प्रा. सविताताई कुलकर्णी यांनी दिले. विद्यार्थ्यांच्या सेमिनारचे मूल्यमापन प्रा. सविताताई कुलकर्णी, तेजश्री कांबळे, सागर डोईफोडे यांनी केले. सेमिनार झाल्यानंतर विद्यार्थ्यांना तोंडी व लेखी मूल्यमापनाचा अहवाल दिला गेला. याच विद्यार्थ्यांना दुसऱ्या सत्रामध्ये पूर्वपरीक्षा मार्गदर्शन झाले.

**गटश: अभ्यास मार्गदर्शन :** प्रा. सविताताई कुलकर्णी व विकास सुरळकर(IAS) यांनी विद्यार्थ्यांना गटश: अभ्यास पद्धतीचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या सराव चाचण्या घेऊन त्यातील गुणांप्रमाणे गटश: मार्गदर्शन प्रा. डॉ. विवेक कुलकर्णी सरांनी घेतले.

### ३) पूर्वपरीक्षा २०१२ सामान्य अध्ययन मार्गदर्शन वर्ग :

UPSC २०१३ च्या पूर्वपरीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सामान्य अध्ययनाचा आणखी एक वर्ग डिसेंबरमध्ये सुरू करण्यात आला. त्यासाठी १७० विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या गेल्या व ९० विद्यार्थ्यांची प्रवेश चाचणी घेण्यात आली. मुलाखतीमधून थेट ६० व प्रवेश चाचणी मधून ३० असे ९० विद्यार्थी वर्गासाठी निवडण्यात आले. या वर्गाचा कालावधी डिसेंबर २०१२ ते मार्च २०१३ असा चार महिन्यांचा होता.

सामान्य अध्ययनासाठी प्रा. डॉ. विवेक कुलकर्णी, प्रा. सविताताई कुलकर्णी, ऋषिकेश सोनवणे (IRS), सागर डोईफोडे, तेजश्री कांबळे, नेहा देशपांडे, महेश शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

### ४) साप्ताहिक वर्ग (Special Weekend Batch) :

मागील वर्षी पूर्व परीक्षा देऊन यशस्वी न झालेल्या विद्यार्थ्यांसाठी पुढील पूर्व परीक्षेसाठी विशेष मार्गदर्शन वर्ग आठवड्याच्या प्रत्येक शनिवार, रविवारी डिसेंबर महिन्यात सुरू करण्यात आला. अभ्यासक्रम पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन व 'Risk Management' ची तयारी करून घेणे हा या वर्गाचा मुख्य उद्देश होता. अभ्यासक्रमानुसार

न शिकवता फक्त सराव चाचण्या व विश्लेषण यांचा समावेश या वर्गात होता. सागर डोईफोडे यांनी २०११ व २०१२ या वर्षांच्या पूर्व परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे ‘विश्लेषण सत्र’ या विद्यार्थ्यांसाठी घेतले.

**५) UPSC मुलाखत प्रशिक्षण वर्ग (प्रेरणा) :**

UPSC २०१२ ची मुख्य परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी डिसेंबर महिन्यात मुलाखत प्रशिक्षण वर्ग सुरू होतो. एकूण ७० विद्यार्थ्यांनी या वर्गाला प्रवेश घेतला. या वर्गाचा कालावधी डिसेंबर २०१२ ते मार्च २०१३ असा चार महिन्यांचा होता.

यावर्षी UPSC मुलाखत वर्गामधे विविध गटउपक्रमांवर भर देण्यात आला. त्यात गट-अभ्यासाची सात सत्रे व गट वादविवाद (debate) चे एक सत्र तसेच गट मुलाखतीची चार सत्रे घेण्यात आली. गट अभ्यासासाठी प्रत्येक गटाला महत्त्वाच्या विषयांवरचे लेख देण्यात आले होते.

* ‘How to prepare for an Interview’ अंतर्गत डॉ. राजीव रानडे (आयुक्त, आयकर), श्री. रविंद्रनाथ पाटील (Ex. IPS), प्रा. डॉ. विवेक कुलकर्णी यांची मार्गदर्शन सत्रे झाली.
* डॉ. निलम ओसवाल यांचे 'Stress Management' वर व्याख्यान झाले.
* डॉ. श्रीकर परदेशी (आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका) यांनी 'How India differs from Developed Countries' या विषयावर मार्गदशनपर व्याख्यान दिले.
* 'Communication Microlab & Personality' यावर प्रा. डॉ. विवेक कुलकर्णी यांचे विशेष सत्र झाले. परिचय खेळ घेऊन त्यांनी विद्यार्थ्यांशी सविस्तर चर्चा केली.

**६) अनुभव कथन :** मुलाखत प्रशिक्षण वर्गामध्ये ज्येष्ठ विद्यार्थ्यांच्या दिल्लीमधील अंतिम मुलाखतीचा अनुभव नवीन विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयुक्त ठरतो. म्हणून चिन्मया औरंगाबादकर (सहाय्यक विक्रीकर आयुक्त), विशाल देसाई (IAAS, मुंबई), राजीव पांडे (IPS, जम्मू कश्मीर), अमृतेश औरंगाबादकर (IAS, गुजरात) यांनी आपल्या मुलाखतीचा अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले.

**७) जिल्हा अभ्यास दौरे :** ‘प्रशासन व विकासातील असमतोल’ हे सूत्र घेऊन विविध जिल्ह्यांचा अभ्यास करण्यासाठी जानेवारीमधे प्रत्येकी १० ते १५ दिवस छत्तीसगड (९), गडचिरोली (१४), अमरावती (११), ठाणे (१०), तामिळनाडू (५), अरुणाचल प्रदेश (१७) या जिल्ह्यांमध्ये विद्यार्थी अभ्यास दौऱ्यासाठी गेले होते. दौऱ्याच्या प्रत्येक ठिकाणी आपल्या केंद्राचे ज्येष्ठ अधिकारी, संवादक व प्रबोधिनी परिवारातील अनेक व्यक्ती यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन तसेच त्यांच्या अनेक तांत्रिक व्यवस्था केल्या.

दौऱ्यावरून परतल्यानंतर आपापल्या दौऱ्यांचे वृत्तांत powerpoint presentation तयार करून सर्व विद्यार्थ्यांसमोर सादर केले. यावेळी दौऱ्यांचे अनुभवकथन Education, Health, Agriculture, Infrastructure, Law इत्यादि १२ विषयांवर panel discussions स्वरूपात झाली. त्यामुळे सर्व जिल्ह्यांची व राज्यांची तुलनात्मक माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली.

**५) जिल्हा संपर्क - गडचिरोली :** ज्ञान प्रबोधिनीच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यांमध्ये संपर्क शिबिरे घेतली गेली. निगडी केंद्राचा युवक विभाग व स्पर्धा परीक्षा केंद्र असे संयुक्त विद्यमाने गडचिरोलीला ३ दिवसांचे प्रशासकीय नेतृत्व प्रशिक्षण ३ ते ५ नोव्हेंबरला पार पडले. ९० विद्यार्थ्यांनी या शिबिरात MPSC Orientation व अभ्यास कौशल्ये, गट बांधणी, समस्या परिहार या विषयांचे मार्गदर्शन घेतले. केंद्रातर्फे तेजश्री कांबळे व दिलराज दाभोळे यांनी सत्रे घेतली. या काळातच सर्च (डॉ. अभय व डॉ. राणी बंग), मेंढा लेखा (श्री. देवजी तोफा) व हेमलकसा (डॉ. प्रकाश व डॉ. मंदाताई आमटे)यांच्या भेटी झाल्या. गडचिरोलीतील आपल्या उपजिल्हाधिकारी सौ. किरण कुलकर्णी व वनहक्क कार्यकर्ते श्री. सुबोध कुलकर्णी यांची खूपच मदत झाली व मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

**अधिकारी मेळावा - सातारा (ऑक्टोबर २०१२) :** साताऱ्याच्या जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी असलेल्या अभिजीत बांगरच्या घरी साताऱ्यात सध्या विविध पदांवर कार्यरत असलेले दहा अधिकारी मित्र-मैत्रिणी जमले होते.

या सर्वच अधिकारी मित्रांची आपापल्या पदांवर, सेवेमध्ये पाचदहा वर्षे अनुभवून झाली आहेत. खालील मुद्द्यांवर त्यांनी आपले अनुभव मांडले —

१) मूल्यशिक्षण, २) प्रशिक्षणातील फोलपणा , ३) व्यवस्थेतली नकारात्मकता, ४) कार्यक्षमतेमधील अडचणी ५) परस्परविसंगत धोरणे, ७) परस्पर सहकार्याची गरज, ८) प्रशासनाच्या सक्षमीकरणासाठी नागरिकांकडून, समाजातील व्यावसायिकांकडून सहाय्य, ९) सामान्य नागरिकांसाठी सहज उपलब्ध होणं, १०)वरिष्ठांकडून शिकणं , ११) मित्रांबरोबर शेअरिंग बैठकीतली चर्चा ऐकताना वाटत राहिलं की सत्प्रेरणा घेऊन प्रशासनात गेलेल्या या मित्रांनी चांगलेपणा टिकवून ठेवला आहे. कामाचा प्रत्यक्ष अनुभव आणि समस्यांची नेमकी जाण यामुळे त्यांची व्यक्तिमत्त्वंही अधिक प्रगल्भ झाली आहेत. ते व्यक्तीश: ही चांगलं काम करत असतील. पण त्यांच्या समस्या लक्षात घेता व्यवस्थेत मोठं परिवर्तन होण्यासाठी अधिक वरिष्ठ पातळीवरून धोरणात्मक बदल व्हावे लागतील. यासाठी याच एका मेळाव्यात भेटलेल्या नव्हे तर अशा अनेक प्रसंगी सत्प्रेरणा टिकवून असलेल्या अनुभवी अधिकाऱ्यांच्या मतांचं, सूचनांचं संकलन अधिक प्रमाणावर व्हायला हवं, असे या चर्चेत मांडले गेलेले काही उल्लेखनीय मुद्दे होते.

**ग्रामअभ्यास भेट :**

जिल्हा अभ्यास दौऱ्यावरून परतल्यानंतर मुलाखत वर्गाचे विद्यार्थी तीन दिवसांकरिता ग्राम अभ्यास भेटीसाठी गेले होते. खोपी, वेल्हा, चिरमोडी, मांगदरी, वीरवाडी, वरोती इ. गावांना विद्यार्थ्यांनी भेटी दिल्या व ग्रामसभांना उपस्थित राहिले. तसेच हे विद्यार्थी गावातील

महिलांच्या सभांना उपस्थित राहिले. या अनुभवांच्या आधारे ग्रामभेटींची निवेदने सादर केली.

मुलाखत वर्गाच्या दुसऱ्या टप्प्यात Mini-mock Interview, Panel Discussion, TED films व मागील यशस्वी विद्यार्थ्यांचे सराव मुलाखतींच्या चित्रफीती पाहणे झाले. सराव मुलाखतीसाठी प्रा. डॉ. विवेक कुलकर्णी, प्रा. डॉ. वसंत नांदेडकर, सागर डोईफोडे, महेश शिंगटे, अभिजीत राऊत यांनी पॅनेल सदस्य म्हणून काम केले.

**निवासी शिबीर :** मुलाखत वर्गातील विद्यार्थ्यांचे रांझे येथे दि. २१ व २२ डिसेंबर २०१२ रोजी निवासी शिबिर आयोजित करण्यात आले. एकूण ५५ विद्यार्थी या शिबिरात सहभागी झाले.

या शिबिरामधे श्री. सुभाषराव देशपांडे यांचे प्रबोधिनीचे ग्राम विकसनातील प्रयत्न (खोरे विकसन) या विषयीचे व्याख्यान झाले. तसेच श्री. शरदराव सुंकर यांचे Transactional Analysis या विषयावर कार्यशाळा स्वरूपात मार्गदर्शन झाले.

### ६)UPSC मुख्य परीक्षा निकाल व सराव मुलाखती :

UPSC मुख्य परीक्षा २०१२ चा निकाल फेब्रुवारी महिन्यात लागला. स्पर्धा परीक्षा केंद्रामधे पूर्व-मुख्य-मुलाखत यापैकी एक किंवा त्यापेक्षा अधिक टप्प्यांना मार्गदर्शन घेतलेले ८० विद्यार्थी मुलाखतीसाठी पात्र ठरले. मार्च-एप्रिल मध्ये दिल्लीत अंतिम मुलाखती झाल्या. मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांसाठी सराव मुलाखतीचे आयोजन करण्यात आले. मुलाखत समितीवर श्री. आनंद आगाशे, डॉ. अजित कानिटकर, श्री. अभय टिळक व श्री. रवि पाटील यांनी काम केले.

दिल्ली येथे श्री. संतोष वैद्य (IAS, स्वीय सहाय्यक, कृषिमंत्री) यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र सदनमध्ये सरावमुलाखती झाल्या. तसेच श्री. अजित कानिटकर यांच्या घरी विद्यार्थ्यांना अनौपचारिक मार्गदर्शन चर्चा झाली.

### अन्य

**१) नियमित सराव परीक्षा व मार्गदर्शन :**

UPSC मुख्य परीक्षा, पूर्व परीक्षा सामान्य अध्ययन व वैकल्पिक विषयांच्या साप्ताहिक तसेच सत्रांत परीक्षा झाल्या. नियमितपणे परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांच्या गुणांचे अवलोकन करून त्यांना पुढील तयारीविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

**२) वैयक्तिक अभ्यास समुपदेशन :**

UPSC च्या सामान्य अध्ययन व वैकल्पिक विषयांच्या वर्गांच्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी मार्गदर्शन व वैयक्तिक समुपदेशन झाले. यामध्ये अभ्यासपद्धती, अभ्यासाचे नियोजन याविषयीची चर्चा झाली. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक अडचणी, आत्मविश्वास वाढविणे, एकाग्रता वाढ याविषयीही चर्चा झाली. प्रा. सविता कुलकर्णी, विषय शिक्षक व समन्वयक हे मार्गदर्शक म्हणून काम पहात होते.

**३) कौशल्य प्रशिक्षण :**

UPSC वर्गांसाठी अभ्यासपद्धती, नियोजन, सेमिनार, गटचर्चा, निबंध लेखन इत्यादि कौशल्यांचे प्रशिक्षण वर्ग झाले. तसेच या कौशल्यांचा वापर विद्यार्थ्यांनी करावा म्हणून प्रत्येकाची सराव सत्रे झाली आणि त्याचा पाठपुरावा करण्यात आला.

**४) वृत्तीघडण उपक्रम :**

नियमित विद्यार्थी संपर्क, वैयक्तिक समुपदेशन, ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सहवास अशा अनेक गोष्टींमधून विद्यार्थ्यांची सकारात्मक वृत्ती तयार होण्यास मदत होते. विविध अधिकाऱ्यांशी भेटी, जिल्हा अभ्यासदौरे, ग्राम क्षेत्रभेटी यातून कामाविषयीची प्रेरणा वाढते. नियमित प्रार्थना, साप्ताहिक उपासना व त्यावेळचे चिंतन-मार्गदर्शन यातून एकाग्र चित्ताने ध्येयाचा विचार होतो.

**५) साधन सुविधा :**

**अ) वर्ग खोल्या :** जिज्ञासा व संकल्प अनुक्रमे १२० व ६० विद्यार्थी क्षमतेच्या खोल्या LCD, ध्वनीवर्धक यंत्रणा या साधनांनी सुसज्ज केल्या आहेत.

**ब) ग्रंथालय :** स्पर्धा परीक्षांना उपयुक्त पाठ्यपुस्तके, संदर्भग्रंथ इत्यादिंचा उत्तम संग्रह, इंग्रजी व मराठी नियतकालिके व वर्तमानपत्रे असे अभ्यास साहित्य विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहे.

**क) अभ्यासिका** : एकूण ३३० विद्यार्थी क्षमतेच्या ज्ञानदा, संकल्प, विश्वास, प्रेरणा, साधना, आकांक्षा, चेतना या सात अभ्यासिका विद्यार्थ्यांसाठी सकाळी ७ ते रात्री ११ या वेळात उपलब्ध आहेत.

### विद्यार्थी अधिकारी यांच्या भेटी :

१) श्री. श्रावण हर्डीकर (मुख्य कार्यकारी अधिकारी, राष्ट्रीय ग्रामीण उपजिविका अभियान) व श्री. अभिजीत बांगर (मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा, जिल्हापरिषद) आणि त्यांच्या पत्नी,

२) श्री. परीस देशमुख (IPS, ओरिसा), श्री. मैत्रेय कुलकर्णी (IFS, स्पेन) व कु. तपस्या चौधरी (DANICS),

३) श्री. ऋषिकेश मोडक (जिल्हाधिकारी, मणिपूर) हे कुटुंबियांसह,

४) श्री. विशाल मकवाने (सहा. आयुक्त, आयकर, मुंबई ),

५) श्री. सतिश जाधव (भारतीय नागरी वित्तसेवा, दिल्ली),

६) श्री. आशिष ठाकरे (IAS-ओरिसा), श्री. विशाल देसाई (IAAS).

### नागपूर दौरा

डॉ. विवेक कुलकर्णी, सौ. सविता कुलकणी व डॉ. वसंत नांदेडकर त्यांच्या नागपूर भेटी दरम्यान National Academy of Direct Taxes या आयकर अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षण संस्थेत दोन दिवस होते. प्रबोधिनी परिवारातील श्री. राजीव रानडे (आयकर आयुक्त) हे या अकादमीमध्ये प्रशिक्षणार्थी तुकडीचे प्रशिक्षण संचालक होते.

याठिकाणी आपल्या केंद्राचे दहा विद्यार्थी आयआरएस म्हणून

निवड होऊन प्रशिक्षणार्थी होते. त्यांच्याही भेटी झाल्या. तसेच संस्थाही पाहता आली. नागपूरमध्ये आपल्या परिवारातील अनेक अधिकारी कार्यरत आहेत. त्यापैकी श्री. संजय दराडे (DCP, Zone II), श्री. कृष्णाथ पाटील (IRTS), सौ. माधवी खोडे (IAS) व सौ. पौर्णिमा खंदारे (उपायुक्त, राज्य अन्वेषण विभाग) यांच्या घरी जाऊन कुटुंबियांसह भेटी झाल्या. तसेच स्वच्छंद चव्हाण (Asst.Comm.CRPF), प्रियांका तेलमासरे (ACST), अभय ननावरे (आयकर, सहा. आयुक्त) यांच्या भेटी झाल्या.

**विशेष व्याख्याने :**

१) श्री. निलेश क्षीरसागर (IAS, छत्तीसगड) यांनी राज्यशास्त्र व सामान्य अध्ययन मधील 'भारत व आंतरराष्ट्रीय संबंध',

२) कु. सोनल सोनकवडे (सहा.आयुक्त, आयकर, बंगलोर ) यांनी इतिहास,

३) श्री. आयुष ओक (IAS, गुजरात) यांनी लोकप्रशासन,

४) श्री. रविंद्र बिनवडे (IAS) यांनी भूगोल व लोकप्रशासन,

५) श्री. विवेक वाडेकर (संचालक, पर्यावरण मंत्रालय) यांनी रिओ येथील परिषदेचे अनुभव कथन,

६) छत्तीसगड राज्यातील दंतेवाडा या दुर्गम जिल्ह्यामध्ये काम करणारे आयसर महाविद्यालयाचे विद्यार्थी श्री. प्रणित सिंह हे पुण्यात आले असताना त्यांनी उपासनेच्या वेळेस ध्वनिचित्रफितीच्या आधारे दंतेवाड्यातील शालेय वातावरण व स्थिती यांची मांडणी केली.

७) श्री. अभिजीत सप्तर्षी (पोलीस अधीक्षक, त्रिपुरा) यांचे 'ईशान्य भारतातील आव्हाने',

८) श्री. विश्वास पांढरे (उपायुक्त वाहतूक शाखा, पुणे शहर) यांनी वाहतूक सप्ताहानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना वाहतूक नियंत्रण, समस्या व उपाय, चित्रपटसृष्टीतील अभिनेते डॉ.निलेश साबळे हेही वाहतुकीच्या नियमांसंदर्भात विद्यार्थ्यांशी बोलले.

९) पर्यावरण तज्ज्ञ डॉ. माधवराव गाडगीळ व विदर्भातील पत्रकार श्री. देवेंद्र गावंडे तसेच दंतेवाड्याचे श्री. निरजकुमार बनसोड (IAS, मुख्य कार्यकारी अधिकारी , दंतेवाडा, छत्तीसगड) यांनी नक्षलवादी भागातील विकास कार्य यावरील परिसंवादात आपले विचार मांडले. परिसंवादाला सुमारे ६०० विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला.

**पुस्तक प्रदर्शन :**

UPSC पूर्व परीक्षा व मुलाखत यासाठी उपयुक्त अशा पुस्तकांचे व साहित्यांचे प्रदर्शन आयोजित केले. ग्रंथालयातील उपलब्ध पुस्तकांची व साहित्याची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी. असा या प्रदर्शनाचा मूळ उद्देश होता. केंद्रातील २०० विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घेतला. प्रबोधिनीतीलच नव्हे तर बाहेरील पण स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचादेखील प्रदर्शनास उस्फूर्त प्रतिसाद दिला.

**विशेष उपक्रम :**

**१) ईशान्य भारतात मार्गदर्शन वर्ग –** ज्ञान प्रबोधिनी परिवारातील डॉ. सचिन शिंदे, कलेक्टर, तिराप-अरुणाचल प्रदेश यांच्या पुढाकाराने JEE-Mains परीक्षेसाठी १५ दिवसांचा प्रशिक्षण वर्ग ज्ञान प्रबोधिनीने आयोजित केला होता. या वर्गात १२वीच्या सुमारे २० विद्यार्थ्यांना प्रा. उदय लिमये, श्री. सुगत दाभोळकर, श्री. श्रीजित कुंजीर व दिव्यांगना काकडे यांनी मार्गदर्शन केले. नागालँड-म्यानमारच्या वळचणीला असलेला तिराप जिल्हा दहशतवाद, धर्मांतर या प्रश्नांनी ग्रस्त आहे. या मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांना खूपच लाभ झाला. जाण्यापूर्वी सुमारे ५ ते ६ बैठकांमध्ये वरील मार्गदर्शन वर्गाचे नियोजन, वेळापत्रक व साहित्यपूर्व तयारी यासाठी डॉ. विवेक कुलकर्णी सरांबरोबर सर्व गटांसमवेत बैठका झाल्या.

या प्रशिक्षण वर्गाचे अनुभव कथन गुरुवार दि. १८ एप्रिल रोजी झाले.

**३) ''बचपन बनाओ'' :**

छत्तीसगड, दंतेवाडा येथे प्रबोधिनी परिवारातील अधिकारी श्री. नीरजकुमार बनसोड (मुख्य कार्यकारी अधिकारी, दंतेवाडा) यांच्या सहकार्याने ''बचपन बनाओ'' हा उपक्रम सुरू आहे. स्पर्धा परीक्षा केंद्राचे विद्यार्थी स्वयंसेवक म्हणून तिथे कार्यरत होते. हे स्वयंसेवक दंतेवाडा येथील 'पोटा केबिन स्कूल' मधेच तेथील विद्यार्थ्यांसोबत राहत होते.

छत्तीसगड मधील शाळांमधून इयत्ता ९वी चे ५३ विद्यार्थी 'जिज्ञासा' विज्ञान शिबिरासाठी प्रबोधिनीत आले होते. या शिबिरात स्वयंसेवक म्हणून स्पर्धा परीक्षा केंद्राचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

**४)** ICDS प्रकल्पांतर्गत वेल्हा तालुका कुपोषण मुक्त करण्याच्या योजनेमध्ये आंगणवाडी सेविकांचे योगदान काय होते, या विषयीचे निवेदन ऐकण्यासाठी २५ विविध गावांमध्ये नियमित वर्गाचे व काही ज्येष्ठ विद्यार्थी गेले होते. त्याचबरोबर गावाचा विकास व त्यातील अडचणी आणि उपाययोजना या विषयी विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांशी गप्पा मारल्या व काही गावांमधील ग्रामसभांना विद्यार्थी उपस्थित राहिले. या उपक्रमांसाठी मा. सुवर्णाताई यांनी मार्गदर्शन दिले.

**५)** मेळघाट मध्ये घेतल्या जाणाऱ्या १०० दिवसांच्या मैत्री शाळेबद्दलचे अनुभव सौ. अश्विनी धर्माधिकारी यांनी उपासना मंदिरात विद्यार्थ्यांसमोर कथन केले. या १०० दिवसांच्या मैत्री शाळेत स्पर्धा परीक्षा केंद्राचे विद्यार्थी काही दिवसांकरिता प्रशिक्षक सहभागी झाले होते.

**६)** स्वामी विवेकानंद जयंती निमित्त उपासनेच्या वेळेस पद्य गायन व मार्गदर्शनाचा कार्यक्रम झाला.

**७)** श्री. राहुल शाहपूरवाड (IPS) यांनी पुणे-मसूरी असा प्रवास सायकलने केला. या सायकल स्वारीचा प्रारंभ प्रबोधिनीतून झाला.

**अध्यापक बैठका व प्रशिक्षण :**

केंद्राच्या विविध वर्गांचे अध्यापक बदलत असतात, कारण नवीन अभ्यासक्रम येतो व सद्य घटना अद्ययावत ठेवणे आवश्यक असते.

काही स्थिर ज्येष्ठ प्राध्यापकांबरोबरच ज्येष्ठ विद्यार्थीही अध्यापनाचे काम करतात.

प्रा. सविताताईंनी वर्ग सुरू होण्यापूर्वी सर्व अध्यापकांचे पाठनिरीक्षण केले व त्यावर चर्चा होऊन आवश्यक ते बदल अध्यापकांनी केले.

**मानवी संसाधन :**

कार्यालयातील सदस्यांची रोज दु. ४ वाजता प्रार्थना होते. तसेच प्रत्येक सोमवारी बैठक व शनिवारी विद्यार्थ्यांबरोबर कार्यालयीन सदस्यांची उपासना होते. विविध वर्गांच्या व्यवस्थापनासाठी प्रत्येक सत्रामध्ये चार समन्वयक होते. चार ज्येष्ठ अध्यापक व १० विद्यार्थी अध्यापक, त्याचप्रमाणे १५ ज्येष्ठ अधिकारी 'प्रशिक्षक' तसेच तज्ज्ञ पॅनेल सदस्यांनी विविध विषय तसेच मुलाखतींना मार्गदर्शन केले. कार्यालय सदस्यांच्या नियमित साप्ताहिक बैठका झाल्या.

**सदस्य सहल :**

कार्यालय सदस्य, वर्गांचे समन्वयक व शिक्षक अशा गटाची दोन दिवसांची सहल सातारा, सज्जनगड, औंधचे कलादालन या ठिकाणी दि. २७ व २८ नोव्हेंबर रोजी गेली होती. सज्जनगडावर मुक्काम करून चाळकेवाडीतील पवनचक्की प्रकल्प व साताऱ्यातील श्री. कोरडे सर यांची सेंद्रिय शेती सर्वांनी पाहिली.सहलीमध्ये प्रबोधिनीचे साताऱ्यामधील श्री. विक्रम वाळिंबे सर, सतीश कुलकर्णी काका हेही सहभागी झाले होते.

**शिष्यवृत्ती :**

आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी ज्येष्ठ IPS अधिकारी श्री. सदानंद दाते यांनी काही रक्कम स्पर्धा परीक्षा केंद्राकडे सुपूर्त केली होती. त्यातून गरजू विद्यार्थी, विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती देऊ केली.

**व्याख्याने :**

विभागप्रमुख प्रा. सविता कुलकर्णी यांनी अन्य संस्थांमध्ये खालील व्याख्याने दिली —

१) 'स्पर्धा परीक्षांची ओळख व तयारीची पद्धत' याविषयी एस्.पी. महाविद्यालयात,

२) केंद्रिय माध्यमिक शालेय मंडळाने इ. ९वी साठी नवीनच अंर्तभूत केलेल्या Problem Solving या पेपरसाठी पुणे जिल्ह्यातील शिक्षकांसाठी झालेल्या कार्यशाळेत 'बहुपर्यायी प्रश्न प्रकार' या विषयावर, व

३) धोंडूमामा साठे होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज मध्ये प्रथम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'अभ्यासाची पद्धत' या विषयावर व्याख्यान दिले.

**निकाल :**

१) UPSC २०१२ च्या परीक्षेत केंद्रातील ३१ विद्यार्थी यशस्वी झाले. IAS, IPS, IFS, ICES, IRS व अन्य सेवांमध्ये विद्यार्थ्यांची निवड झाली.

२) UPSC बरोबरच अनेक विद्यार्थ्यांनी MPSC ची परीक्षा दिली. त्यातून MPSC २०१२ च्या परीक्षेतून केंद्रातील ४६ विद्यार्थी यशस्वी झाले. यामध्ये उपजिल्हाधिकारी, पोलीस उपअधीक्षक, गटविकास अधिकारी, विक्रीकर अधिकारी यांसारख्या पदांवर विद्यार्थ्यांची निवड झाली.

UPSC ची परीक्षा देत MPSC करणाऱ्या काही विद्यार्थ्यांनी २०१२ च्या परीक्षेमध्ये UPSC व MPSC दोन्हीकडे यश संपादन केले. केंद्र व राज्य शासनाची पदे प्राप्त केली.

## *Jnana Prabodhini Competitive Examinations Centre 2012-13*

| | General Studies | Pub.Ad. | Pol.Sci. | Geog. | Psycho | History | Sociology | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) Mission 1200 (UPSC Seniors) | 87 | 57+41 | 0 | 71+35 | 17 | 23 | 45 | **376** |
| 2) UPSC Regular | 120 | 18 | 12+12 | 12+9 | Pali-11 | 20 | 42 | **256** |
| 3) UPSC Prelims | 99 | | | | | | | 99 |
| 4) MPSC Mains | - | - | - | - | - | - | - | - |
| 5) UPSC Personality Test (Interview) | 72 | | | | | | | **72** |
| 6) MPSC Interview | - | - | - | - | - | - | - | - |
| **Total Students** | **378** | **116** | **24** | **127** | **28** | **43** | **87** | **803** |

# नवनगर विद्यालय, निगडी

*वृत्तांत वर्ष हे मातृमंदिर विश्वस्त संस्थेचे रौप्य महोत्सवी तर ज्ञान प्रबोधिनीचे सुवर्ण महोत्सवी वर्ष होते. या 'रूपेरी-सोनेरी' महोत्सवी वर्षात निगडी केंद्रातील विविध विभागांनी मिळून एकूण दहा ठिकाणी संपर्क कार्यक्रम घेतले. माजी विद्यार्थी, माजी अग्रणी, आजी पालक, हितचिंतक यांचे एकूण आठ मेळावे घेण्यात आले. निगडी केंद्रातच झालेल्या राष्ट्रीय शिक्षण परिषदेत निगडीतील १५ सदस्यांनी आपल्या शोधनिबंधांचे वाचन केले. युवकांनी विवेकानंदांच्या जीवनावर आधारित दोन अंकी नाटकाचे पाच ठिकाणी सादरीकरण केले. दि. २६ जानेवारी १३ रोजी झालेल्या कार्यक्रमात १९८ पालक-सदस्यांनी प्रबोधिनीची प्रथम प्रतिज्ञा घेतली. या सर्व कार्यक्रमांतून प्रबोधिनीचा विचार अनेकांपर्यंत पोहचवता आला व अनेकांना प्रबोधिनीशी जोडून घेता आले.*

*गेल्या ३२ वर्षांत निगडी केंद्राचा मोठाच विस्तार झाला आहे. प्रामुख्याने प्रबोधिनीच्या तीन प्रभागांचे काम निगडी केंद्रात चालू आहे. सदरच्या वृत्तात या तीन प्रभागांतर्गत येणाऱ्या विभागांचे/प्रकल्पांचे कामकाज थोडक्यात मांडले आहे. गतवर्षी झालेल्या विशेष, नवीन उपक्रमांवर प्रामुख्याने भर दिला आहे.*

## ♦ शैक्षणिक विभाग

**पूर्व प्राथमिक विभाग :** वृक्षदिंडी, पालक उद्‌बोधन वर्ग, आजी-आजोबा मेळावा इ. नित्याचे उपक्रम उत्साहात पार पडले. यावर्षी खेळगटासाठी प्रथमच पुस्तक हंडीचा उपक्रम घेण्यात आला. मुलांना पुस्तक वाचनाची गोडी लागावी या उद्देशाने या उपक्रमाची सुरुवात केली. पुस्तकांचे महत्त्व विषद करणारी गाणी, गोष्टी मुलांना सांगून सर्वांना प्रसाद म्हणून एक पुस्तक भेट देण्यात आले. खेळगटासाठीच 'पालक-शिक्षक-मुले एक तास एकत्र' असा आणखी एक नवा उपक्रम दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी घेण्यात आला. विभागाच्या स्नेहसंमेलनात महिला पालकांचा विशेष पुढाकार होता. नातेसंबंधांवर आधारित एक भारूड त्यांनी स्नेहसंमेलनात सादर केले. विभागातील सर्व अध्यापकांनी साळुंब्रे येथील ग्राम प्रबोधिनी उपकेंद्रास भेट दिली.

**प्राथमिक विभाग :** पावसाळी सहली, भाजी मंडई, विज्ञान प्रदर्शन तसेच विविध स्पर्धांचे आयोजन दरवर्षी प्रमाणे करण्यात आले. या वर्षी इ. ४थी च्या विद्यार्थ्यांनी पुणे आकाशवाणी केंद्रास भेट देऊन तेथील तांत्रिक बाबी समजून घेतल्या. तसेच तेथे त्यांनी सादर केलेल्या विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमाचे दि. २६ जानेवारी रोजी आकाशवाणी केंद्रावरून प्रक्षेपण करण्यात आले. सर्व मुलांच्या हिमोग्लोबीनची तपासणी करून हिमोग्लोबीन कमी असणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले.

वर्षभरात अध्यापकांसाठी विविध प्रकारच्या कार्यशाळा घेण्यात आल्या. यात इंग्रजी संभाषणाबाबत डॉ. मीनाताई चंदावरकर यांनी, पंचतंत्र कथांबाबत सौ. नीलीमाताई वैशंपायन यांनी तर 'पॉपअप' प्रकारच्या शुभेच्छापत्रांसाठी श्री. संजय विसपुते यांनी मार्गदर्शन केले. तसेच यावर्षी अध्यापकांनी किनारा वृद्धाश्रम, मतिमंद मुलांची शाळा व हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेस भेट दिली.

पालकांसाठी सुंदर हस्ताक्षराची कार्यशाळा मनःशक्ती केंद्राला भेट व हळदी कुंकू या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**माध्यमिक मराठी विभाग :** इ. ७ वी च्या नागरिकशास्त्र विषयातील राज्यशासन हे प्रकरण प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्यासाठी मुंबईला विधानभवन भेटीचे आयोजन करण्यात आले होते. ३० विद्यार्थी यात सहभागी झाले. राज्याचे गृहमंत्री मा. आर. आर. पाटील यांनी विद्यार्थ्यांशी सुमारे ४५ मिनिटे संवाद साधला. तसेच इ. ८वी तील विद्यार्थ्यांनी नागरिकशास्त्रातील मानवी हक्कांना अनुसरुन एका संदेश फेरीचे आयोजन केले. इ. १०वी च्या १३५ विद्यार्थ्यांची सहल गुजरात राज्यात जाऊन आली. तेथील साबरमती आश्रम, सायन्स सिटी, अक्षरधाम मंदिर, जुनागढ किल्ला, गीर अभयारण्य इ. ठिकाणे मुलांनी पाहिली. मुलांचे हिवाळी शिबिर फुलगाव येथील धोत्रे विद्यालयात तर मुलांचे तंबूतील शिबिर शिरवळ येथे झाले.

**विशेष यश :** केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागामार्फत दिला जाणारा 'इन्स्पायर ॲवॉर्ड' इ. १०वी तील विराज गुपचूप यास मिळाला. या स्पर्धेसाठी त्याने सेमी ॲटोमॅटिक वॉटर पंप कंट्रोलर हा प्रकल्प सादर केला होता.

सिंगापूर येथे झालेल्या सांस्कृतिक स्पर्धांमध्ये कु. जान्हवी कामथे कथक वृंद प्रकाशन सुवर्णपदक विजेती ठरली. तसेच यंदाच्या चित्रकलेच्या इंटरमिजिएट परीक्षेतही तिने राज्यस्तरीय पाचवा क्रमांक प्राप्त केला.

बालेवाडी येथे झालेल्या राज्यस्तरीय स्केटींग स्पर्धेत इ. ८वी तील चैतन्य आफळे यास द्वितीय क्रमांक मिळाला.

मातृमंदिर विश्वस्त संस्था आयोजित राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत इ. ९वी तील मृणाल पोफळे हिला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

**इंग्रजी माध्यम विभाग :** इंग्रजी माध्यम हा स्वतंत्र विभाग म्हणून गेल्या दोन वर्षांपासून कार्यरत आहे. इंग्रजी संभाषणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी दैनंदिन कामकाज पूर्ण इंग्रजी भाषेतून झाले.

सलग दुसऱ्यावर्षी इंग्रजीतून निरूपणासह अभंगगायनाचा कार्यक्रम पालकांच्या उपस्थितीत घेतला गेला. दोन तासांचा अतियश भावपूर्ण

असा हा कार्यक्रम झाला. जानेवारी महिन्यात विभागाने प्रथमच स्वतंत्ररित्या क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले होते.

मार्च महिन्यात अभ्यासक्रमाशी संबंधित विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रकल्पांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. उतारा वाचन, एखाद्या पाठाचे सादरीकरण, कविता गायन असे या प्रदर्शनाचे स्वरूप होते. मनोहर सभागृहात झालेल्या या प्रदर्शनास पालकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

**गुरुकुल :** विद्यार्थ्यांच्या पंचकोश विकसनासाठी दरवर्षीप्रमाणे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त सर्व विद्यार्थ्यांनी प्रत्येकी ५०० सूर्यनमस्कार घातले. इ. ६वी ते ९वी तील ५० विद्यार्थी रत्नागिरी ते निगडी या सुमारे ३६० कि. मी. च्या सायकल सहलीत सहभागी झाले. यंदाच्या वर्षी विद्यार्थ्यांनी एकूण रु. १,३२,०४५/- ची राखी विक्री करून गत वर्षीचा उच्चांक मोडीत काढला. या वर्षी मातृभूमी परिचय शिबिरांसाठी विद्यार्थी इ. ५वी - साकुडे जि. पुणे, इ. ६वी - अंबा (जि. कोल्हापूर), इ. ७वी-फोंडा (गोवा), इ.९वी माजुली बेट (आसाम), तर इ. १०वी तवांग (अरुणाचल प्रदेश) या ठिकाणी जाऊन आले. अधिक मासानिमित्त इ. ५वी च्या विद्यार्थ्यांनी स्वामी समर्थ मंदिरात गाथा नाथांची या विषयावर सादरीकरण केले. नेहमीप्रमाणे इ. ९वी च्या विद्यार्थ्यांनी सलग पाच दिवस दासबोध ग्रंथाचे पारायण केले.

**विशेष यश :** नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय स्केटींग स्पर्धेतील विविध प्रकारात सानिका गुळवणी हिने एक सुवर्ण व दोन रौप्य पदकांची कमाई केली. तृतीय क्रमांकाचा चारित्र्य उपासक छात्र पुरस्कार लोकेश भोसले या विद्यार्थ्यास प्राप्त झाला.

'ऐसा घडवू महाराष्ट्र' या झी २४ तास वाहिनीच्या कार्यक्रमात गुरुकुल प्रकल्पाचे प्रसारण करण्यात आले.

**क्रीडाकुल :** १८ विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर तर सहा विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर विविध क्रीडा प्रकारात यश संपादन केले. या वर्षी प्रशिक्षकांनी वर्गात प्रशिक्षण तासिका घेऊन मैदानावर झालेल्या प्रशिक्षणाविषयी चर्चा विद्यार्थ्यांशी केली. क्रीडाकुलच्या आरोग्य विभागाने १५ औषधांची, ७५ लिटर अभ्यंग तेलाची व ६५ किलो बल्यकल्पाची निर्मिती केली. मानस विभागाने वर्षभरात ५५ विद्यार्थ्यांचे अभिक्षमता मापन केले. निगडी केंद्राचे उपप्रमुख श्री. मनोजराव देवळेकर व क्रीडाकुलचे प्रमुख श्री. भगवान सोनवणे यांनी २०१२ च्या ऑलिंपिक स्पर्धा प्रत्यक्ष लंडनला जाऊन अनुभवल्या. क्रीडाकुलाचे ध्येयच मुळी ऑलिंपिक विजेते खेळाडू घडविणे असे आहे. त्यामुळे या मार्गावर असणाऱ्या कार्यकर्त्यांना नवी दृष्टी, नवा विचार मिळण्यासाठी आपल्या मार्गावरील विश्वास पक्का होण्यासाठी आणि प्रयत्नांची गती वाढविण्यासाठी हा दौरा निश्चितच उपयोगी ठरला.

## पूरक शिक्षण प्रकल्प

**ग्रंथालय :** लेखक-वाचक संवाद उपक्रमांतर्गत या वर्षी सौ. संजीवनी बोकील, कै. वि. अ. जोशी यांच्या स्मरणदिनानिमित्त ग्रंथालयातर्फे कथाकथन स्पर्धेचे आयोजन केले होते. ३० विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला.

**तंत्रशिक्षण विभाग :** माध्यमिकच्या इ. ८वी ते १०वी तील १८० विद्यार्थ्यांना Elements of Electrical and Electronics Technology या विषयांचे अध्यापन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या साह्याने विद्यालयातील जैव तंत्रज्ञान प्रकल्पाच्या बागेच्या कुंपणाचे काम पूर्ण करण्यात आले.

**संगणक विभाग :** इंटरनॅशनल इन्फॉरमेटिक्स ऑलिंम्पियाड स्पर्धेत विद्यालयातील ४१ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी नऊ विद्यार्थी दुसऱ्या फेरीसाठी पात्र ठरले. याही वर्षी बुद्धिमत्ता स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यात ५० शाळांतील १३०० विद्यार्थी सहभागी झाले होते.

अध्यापकांसाठी गेल्या सहा वर्षांपासून संगणकाधारित पाठ निर्मिती स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. या वर्षी ६९ अध्यापक या स्पर्धेत सहभागी झाले.

संगणकाधारित विकसन प्रकल्पाचे (CBDP) हे तिसरे वर्ष होते. इ. ७वी साठी या वर्षीच्या अभ्यासक्रमात माहितीपट निर्मिती या विषयाचा समावेश करण्यात आला होता. वर्षभरात विद्यार्थ्यांनी एकूण तीन विषयांवर माहितीपटांचे निर्मिती केली. (CBDP) प्रकल्पातील सर्व विद्यार्थ्यांनी मिळून Know your Computer या विषयावर प्रदर्शनाचे आयोजन केले होते. दैनंदिन व्यवहारामध्ये संगणकाचा वापर कशा पद्धतीने करावा यावर आधारित प्रकल्प विद्यार्थ्यांनी सादर केले.

प्रकल्पात सहभागी मुलांच्या पालकांसाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रज्ञा मानस संशोधिकेच्या सौ. सुजाताताई होनप यांनी पालकांना मार्गदर्शन केले.

**मुक्तिसोपान संगीत वर्ग :** संगीत विद्यालयाच्या वर्षभरात सहा विशेष संगीत सभा झाल्या.

वर्षाची सुरुवात श्रीमती मंजुश्री दिवाण व त्यांच्या शिष्या यांच्या सुगम संगीताने झाली. वर्षारंभाच्या वेळी श्री. शेखर कुंभोजकर यांचे शास्त्रीय गायन झाले. दिवाळी पहाट हा विशेष कार्यक्रम धनत्रयोदशीच्या दिवशी झाला. पं. शौनकजी अभिषेकी यांच्या स्वरांनी तो सजला. कार्यक्रमासाठी पिंपरी-चिंचवड परिसरातून रसिकांची प्रचंड उपस्थिती होती.

राष्ट्रीय शिक्षण परिषदेतही मुक्तिसोपान संगीत विद्यालयाचा चांगला सहभाग होता. परिषदेच्या पहिल्या दिवशीच्या संध्याकाळी सौ. संगीता देशपांडे यांचे गायन योजले होते तर दुसऱ्या दिवशी 'भारत मेरा रंग रंगिला' हा विविध नृत्य प्रकारांचा कार्यक्रम सौ. तेजश्री अडिगे यांच्या विद्यार्थिनींनी सादर केला. यावर्षी प्रथमच मुक्तिसोपानचे स्वतंत्र स्नेहसंमेलनही झाले. त्यात विद्यार्थ्यांचा १००% सहभाग होता. ज्येष्ठ गायिका सौ. माधुरी आंबेकर या प्रमुख अभ्यागत म्हणून उपस्थित होत्या.

अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालयाच्या परीक्षांना (गायन, संवादिनी, वादन) ७८ विद्यार्थी बसले होते. पैकी ६७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

## माध्यमिक जैवतंत्र विभाग

इ. ९वी च्या विद्यार्थ्यांना ऊती संवर्धनाची ओळख प्राथमिक स्तरावर करून देण्यात आली. यामध्ये निर्जंतुकीकरण, स्टॉक सोल्युशन तयार करणे, पोषण माध्यम तयार करणे, निकोप वनस्पतींची निवड करणे,

फुटवे आणून त्याचे सलगीकरण करणे, वनस्पतीला मुळे आणणे इ. पायऱ्यांचे शिक्षण प्रात्यक्षिकातून विद्यार्थ्यांनी घेतले.

इ. ८वी, ते १०वी च्या क तुकडीच्या विद्यार्थ्यांना बागकामाद्वारे सेंद्रिय शेतीची प्राथमिक ओळख करून देण्यात आली. या वर्षी विद्यार्थ्यांनी दोडके, घोसावळे, वांगी, पालक व मेथी या भाज्यांचे उत्पादन घेतले. भाज्यांच्या उत्पादनासोबत नर्सरीत जैविक खत निर्मितीचाही प्रकल्प सुरू आहे.

**कै. भाऊसाहेब नाईक विद्यार्थी भांडार :** शैक्षणिक साहित्यासोबतच हराळी केंद्रातील विविध उत्पादनांची विक्री भांडारातून सुरू केली आहे.

सौर फाल्गुन ९ व १० (२८ फेब्रु. ते १ मार्च) या कालावधीत पुस्तक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यात ८ विविध प्रकाशनांची पुस्तके विक्रीसाठी होती. त्यात रु. ९८,८२५/- ची विक्री झाली.

**संस्कृत पाठशाळा :** संस्कृत दिनानिमित्त इ. ५वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी संस्कृत पद्य गायन, सुभाषित पाठांतर व संस्कृत वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या वर्षी प्रथमच पाठशाळेतर्फे आंतरशालेय संस्कृत नाट्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत दहा शाळांनी सहभाग घेतला. प्रथम क्रमांक आपल्या विद्यालयास तर द्वितीय क्रमांक म्हाळसाकांत विद्यालयास प्राप्त झाला.

अखिल भारतीय संस्कृत स्पर्धेत अमरकोषकण्ठ पाठांतरात इ. ९वी तील अपूर्व सातपुते याने प्रथम क्रमांक मिळवून पुढील फेरीसाठी तो हिमाचल प्रदेशात जाऊन आला.

**जम्मत घर :** ऑक्टोबर २०११ मध्ये विद्यालयात ग्रंथालयाच्या धर्तीवर खेळणीघर - जम्मत घर (Toy Library) सुरू करण्यात आले. विद्यार्थ्यांना अधिकाधिक खेळणी मर्यादित शुल्कात उपलब्ध व्हावीत ही यामागची मुख्य संकल्पना ! सुरुवात अर्थातच खेळण्यांपासून झाली पण तेवढ्यावरच न थांबता पुस्तकं, ध्वनीचित्रफिती, तक्ते या साधनांची भर गतवर्षी घालण्यात आली. आज अखेर जम्मत घरात सुमारे ३०० खेळणी, २०० पुस्तके व ५० सी.डी. व ५० तक्ते आहेत. सभासद संख्या ३०० आहे .

पर्सिस्टंट फौंडेशनकडून जम्मत घरात भरीव स्वरूपाचे आर्थिक सहकार्य मिळाले. या देणगीतून निगडी, चिखली, शिरगाव, बारामती व गोवा याठिकाणच्या पाच शाळांतून खेळणीघरं सुरु करण्यात आली.

जम्मत घराच्या पुढाकारातून गतवर्षी आणखी एक उपक्रम राबविण्यात आला तो म्हणजे 'गंमत विज्ञान खेळण्यांची कार्यशाळा!' दिवाळी व उन्हाळ्याच्या सुटीत सात दिवसांची ही कार्यशाळा इ. ३री व ४थीच्या मुलांसाठी घेण्यात आली. सुमारे ७० मुलांनी याचा लाभ घेतला.

**मुक्तांगण विज्ञानशोधिका :** पुण्यातील विज्ञान मोहिमेची शाखा निगडी केंद्रात सुरू करण्यात आली आहे. सौर अग्रहायण १७ (८डिसें.) रोजी या विज्ञान शोधिकेचे उद्‌घाटन ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ मा. डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते करण्यात आले.

विज्ञानशोधिकेमार्फत दोन दिवसांचा गणित शिक्षक प्रशिक्षण वर्ग योजण्यात आला होता. त्यात ५० शाळांतील १२० शिक्षक सहभागी झाले. तसेच विद्यार्थ्यांसाठी विज्ञान विषयक निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत १२० विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

विज्ञान दिनानिमित्त शास्त्रज्ञ डॉ. वर्षा जोशी यांचे 'दैनंदिन जीवनातील विज्ञान' या विषयावर व्याख्यान योजण्यात आले होते.

**संवेद :** संवेद विभाग समुपदेशन व संशोधन याबाबतीत प्रामुख्याने काम करतो. गतवर्षी विभागामार्फत शिक्षकांसाठी ताणाला सकारात्मक पद्धतीने कसे सामोरे जायचे याबाबत मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थी नेमके कुठे कमी पडतात हे जाणून घेण्यासाठी '5 point scale' पद्धती कशी वापरावी याचेही मार्गदर्शन शिक्षकांना करण्यात आले.

माध्यमिकच्या इ. ८वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांशी वेगवेगळ्या निमित्ताने 'स्व'ची ओळख, संकल्प निश्चिती, अभ्यासकौशल्ये या विषयांबाबत संवेदच्या मानसतज्ज्ञांनी संवाद साधला.

पालकांसाठी मानसोपचारतज्ज्ञ डॉ. संज्योत देशपांडे यांचे 'सुजाण पालकत्व' या विषयावर व्याख्यान योजण्यात आले होते.

## ♦ संघटन प्रभाग

**युवक विभाग :** यावर्षी युवक विभागाचे काम दल रचनेच्या स्वरूपात सुरू झाले. शालेय विद्यार्थ्यांसाठी दोन तर महाविद्यालयीन युवकांसाठी दोन अशी चार दले सुरू करण्यात आली.

**१. नेतृत्व विकास दल :** इ. ८वी व ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी हे दल सुरु करण्यात आले. जुलै ते फेब्रुवारी अखेरपर्यंत दर रविवारी नियमितपणे हे दल झाले. विद्यार्थ्यांची सरासरी उपस्थिती २५ इतकी होती. वर्षभरात गटबांधणी व नियोजन या कौशल्यांच्या प्रशिक्षणाची सत्रे घेण्यात आली. या प्रशिक्षणाच्या प्रत्यक्ष कार्यवाहीचा भाग म्हणून वेल्हे तालुक्यातील चार गावांमध्ये तेथील मुलांसाठी नेतृत्व विकास दलातील विद्यार्थ्यांनी एकदिवसीय शिबिर घेतले.

**२. क्रीडा दल :** गणेशोत्सवात सहभागी झालेले युवक नियमितपणे संपर्कात रहावे यासाठी हे दल ऑक्टोबर महिन्यात सुरु करण्यात आले. दर रविवारी दोन तास खेळ असे या दलाचे स्वरूप होते. वर्षभर सरासरी २० युवकांची उपस्थिती होती.

**कला दले :** वर्षभरात कला दलाने एकूण ३ उपक्रम केले —

**१. कुसुमांजली :** कुसुमाग्रजांच्या साहित्यावर आधारित कुसुमांजली हा कविता वाचनाचा कार्यक्रम करण्यात आला.

**२. पथनाट्य :** गणेशोत्सवात स्त्रीभृण हत्येवर आधारित पथनाट्य बसवण्यात आले.

**३.परिव्राजक नरेंद्र नाटक :** विवेकानंदांच्या १५०व्या जयंतीनिमित्त विवेकानंदांच्या जीवनावर दोन अंकी नाटक युवक विभागाने बसवले. लेखन, दिग्दर्शन व अन्य तांत्रिक जबाबदाऱ्या युवकांनीच सांभाळल्या. नाटकाचे पिंपरी-चिंचवडमध्ये तीन तर पुण्यात दोन असे एकूण पाच प्रयोग झाले. या निमित्ताने २५०० प्रेक्षकांपर्यंत विवेकानंदांचे चरित्र पोहचवता आले.

याशिवाय गणेशोत्सवात युवकांनी १९ ठिकाणी गणेश प्रतिष्ठापना

पूजा सांगितली. इ. ९वीत घेतलेल्या प्रतिज्ञेचे स्मरण व्हावे म्हणून प्रतिज्ञा स्मरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. दुष्काळ निवारण कार्यातही युवकांचा चांगला सहभाग होता.

### युवती विभाग

या वर्षी युवती विभागाने शालेय व महाविद्यालयीन अशा दोन गटात कामाची रचना केली होती.

**शालेय गटाचे उपक्रम : क्रीडापद्य दल :** साप्ताहिक खेळ, पद्यगायन व पद्यांच्या अर्थाविषयी विद्यार्थिनींशी संवाद असे या दलाचे स्वरूप होते. इ. ९वी च्या २५ विद्यार्थिनींचा या दलात सहभाग होता.

**सायकल सहल :** इ. ९वी च्या मुलींसाठी निगडी ते पुणे प्रबोधिनी अशी सायकल सहल योजली होती. १० मुली व ४ युवती या सहलीत सहभागी झाल्या. सहलीच्या निमित्ताने पुणे प्रबोधिनीतील विविध विभागही मुलींना पाहता आले.

**एक दिवसीय शिबिर :** इ. ८वी च्या ६२ विद्यार्थिनींसाठी शाळेतच एकदिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

**पथनाट्य :** शिवजयंतीनिमित्त २० मुलींच्या सहभागातून शिवरायांच्या जीवनावर आधारित पथनाट्य बसवण्यात आले. विद्यालयातच सर्वांसमोर त्याचे सादरीकरण करण्यात आले.

**सरस्वती विद्यालय बर्ची प्रशिक्षण :** सुवर्ण महोत्सवानिमित्त अन्य विद्यालयातील मुलींसाठी बर्ची प्रशिक्षण अशी कल्पना मांडली होती. त्यानुसार सरस्वती विद्यालयातील मुलींसाठी इ. ९वी च्या दोन तुकड्यांसाठी बर्ची प्रशिक्षण घेण्यात आले. विशेष म्हणजे आपल्या शाळेतील गणेश विसर्जन मिरवणुकीत सरस्वती विद्यालयाच्या मुलींचा बर्चीचा गट सहभागी होता.

**ग्रामीण शिबिर :** ग्रामीण समाजजीवनाची ओळख व्हावी यासाठी वेल्हे तालुक्यातील तीन गावांमध्ये स्थानिक मुलींचे शिबिर घेण्यासाठी २५ मुलींचा गट गेला होता. स्थानिक सुमारे १५० मुली या शिबिरातून सहभागी होत्या.

**महाविद्यालयीन गट : क्रीडा दल :** महाविद्यालयीन युवतींसाठी साप्ताहिक क्रीडा दल घेण्यात आले. सरासरी १४ युवतींचा सहभाग दलामध्ये होता.

**गणेशोत्सव :** सौ. अलकाताई शाळू, सौ. पाटील व प्रतिमा वामन यांच्या पुढाकारातून या वर्षी तीन ठिकाणी पौरोहित्य प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले. एकूण ५० नागरिकांचा यात सहभाग होता.

प्रबोधिनीच्या बोरीवली केंद्रातील ६० मुलींच्या बर्ची प्रशिक्षणाची जबाबदारी युवती विभागाने घेतली होती. त्यासाठी चार वेळा २-२ युवती बोरीवली केंद्रावर जाऊन आल्या.

**साद कार्यक्रम :** कला क्षेत्राची आवड असणाऱ्या युवतींनी एकत्र येऊन कला सादरीकरण करावे या हेतूने गेली चार वर्षे साद कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे. यावर्षी २५ युवती या कार्यक्रमत सहभागी होत्या. गायन, नाट्य, नृत्य, कीर्तन इ. कलाविष्कार कार्यक्रमात सादर करण्यात आले.

**विवेकानंद अभ्यास शिबिर :** दोन वर्षापेक्षा अधिक काळ युवती विभागात काम करणाऱ्या युवतींसाठी अभ्यास शिबिराची योजना केली होती. साळुंब्रे येथे झालेल्या या तीन दिवसांच्या शिबिरात आठ युवती सहभागी झाल्या होत्या. अभ्यास शिबिराच्या निमित्ताने मा. संचालक, मा. हर्षाताई, मा. व्यंकटराव भताने यांचे मार्गदर्शन युवतींना लाभले.

युवतींच्या वर्षभरात एकूण १८ बैठकी झाल्या. तसेच नियमित गटातील १३ पैकी ११ जणींनी स्वतंत्रपणे किमान एका उपक्रमाची मुख्य जबाबदारी घेतली.

### उपासना गट

गेली सुमारे २५ वर्षे दर गुरुवारी सकाळी ८.००वा. मातृमंदिरात उपासना होते. आ. भाऊ प्रवासात नसतील तर ते स्वतःच उपासना सांगतात. त्यानंतर १०-१५ मि. एखाद्या आध्यात्मिक ग्रंथावर त्यांचा उपस्थितांशी संवाद होतो. या उपासनेला दोन दशकांपेक्षा अधिक काळ येणाऱ्या ८-१० माजी पालक-नागरिकांचा एक गट तयार झाला आहे. या गटाच्या उपक्रमांविषयी ह्रह्र

**वाचन :** गुरुवारी उपासना व चिंतन झाल्यावर हा गट दरवर्षी एकेक ग्रंथ निवडून त्याचे वाचन करतो. हे वाचन मा. सावंतकाकांच्या कार्यालयात होते. या वर्षी गीतारहस्य या ग्रंथाचे वाचन त्यांनी केले.

**मातृभूमी पूजन :** दहापेक्षा अधिक परिचितांकडे या गटाने मातृभूमी पूजनाचे कार्यक्रम केले.

**परिक्रमा :** श्रावण महिन्यातील एका सोमवारी त्र्यंबकेश्वर येथील ब्रह्मगिरी पर्वताची परिक्रमाही हा गट गेली अनेक वर्षे करत आहे. पहाटे ५ ते दुपारी २ पर्यंत चालणारी परिक्रमा जणू या गटाचा अव्यक्त वार्षिक संकल्पच बनून गेली आहे.

**पायी प्रवास :** राजगुरुनगर ते भीमाशंकर आणि भीमाशंकर ते डिंबे गावापर्यंतचा पायी प्रवास या गटातील ६ जणांनी (श्री. ज्ञानेश्वर सावंत, श्री. यशवंत लिमये, श्री. नारायण देशपांडे, श्री. प्रकाश उपासनी, श्री. विजय काळे व श्री. प्रकाश देशपांडे) पूर्ण केला. सदस्यांचे सरासरी वय लक्षात घेता हा छोटासा पराक्रमही अनेकांना खूप काही शिकवणारा आहे यात शंका नाही.

**विवेकानंद चरित्र कथन :** या गटाचे एक सदस्य श्री. नारायण देशपांडे यांनी विवेकानंदांच्या १५० व्या जयंतीचे निमित्त साधून विवेकानंदांचे चरित्र १०० ठिकाणी सांगण्याचा संकल्प केला. गेल्या वर्षभरात सुमारे ७० ठिकाणी त्यांनी चरित्रकथन केले.

**पालक संघटन :** दि. २६ जानेवारी रोजी पालक, निगडी केंद्राचे सदस्य मिळून एकूण १९८ जणांनी प्रबोधिनीची प्रथम प्रतिज्ञा घेतली. या सर्वांशी ठराविक अंतराने संपर्क होण्याच्या दृष्टीने एप्रिल महिन्यात मा. भाऊंच्या वैचारिकाची योजना केली होती. यात प्रामुख्याने गुढीपाडवा समजून उमजून कसा साजरा करूयात याबाबत मा. भाऊंनी मार्गदर्शन केले.

**पालकांची साहस सहल :** यंदाही पूर्व प्राथमिक विभागाच्या पालक समितीचा क्रीडा महोत्सव साजरा झाला. त्याच्या शोधबोधाच्या बैठकीत एक साहस सहल योजण्याचे ठरले. त्यानुसार एप्रिल मध्ये १५ पालक व दोन अध्यापकांचा गट हरिश्चंद्रगडावर जाण्यासाठी निघाला. रात्रीच्या सुमारे सहा तासांच्या पायी प्रवासानंतर गट गडावर पोहोचला. गंमत

म्हणजे गटातील ९-१० जणांनी दुर्गादेवी टेकडी पण यापूर्वी चढली नव्हती त्यांच्यासाठी तर हा खूपच संस्मरणीय अनुभव होता. पहाटे गडावर केलेली उपासना त्यानंतर मा. मनोजरावांनी व्यक्त केलेले मनोगत, त्यानंतर गटाच्या पुढच्या कार्यक्रमाविषयी झालेली चर्चा यामुळे हा गट प्रबोधिनीशी घट्ट जोडला गेला.

**कन्याकुमारी दौरा :** ज्ञान प्रबोधिनी, निगडी केंद्रात काही ज्येष्ठ नागरिक नियमितपणे योगासनांसाठी येतात. त्यांनी स्वामी विवेकानंदांच्या १५०व्या जयंतीनिमित्त कन्याकुमारी येथे होणाऱ्या अध्यात्म शिबिरात सहभागी होण्याचे ठरवले. त्यानुसार १४ नागरिक कन्याकुमारीला जाऊन आले. वेगवेगळ्या राज्यातून आलेले शिबिरार्थी हे या शिबिराचे खास आकर्षण ठरले. गटाचे प्रमुख म्हणून श्री. अशोक कोलगेकर तर साहाय्यक प्रमुख म्हणून श्री. शामराव खुडे, श्री. सुखदेव तांदळे यांनी जबाबदारीपूर्वक काम केले.

**अध्यापकांचे यश :** माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका सौ. प्रज्ञाताई पाटील व श्री. सुधीर कुलकर्णी यांनी यशवंतराव मुक्त विद्यापीठाची शालेय व्यवस्थापनाची पदवी संपादन केली.

इंग्रजी माध्यमातील अध्यापिका मधुरा लुंकड NET परीक्षा उत्तीर्ण झाल्या.

अखिल भारतीय सांस्कृतिक संघातर्फे सिंगापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक स्पर्धांमध्ये विद्यालयाच्या पूर्व प्राथमिकच्या अध्यापिका वृषाली डेंग्वेकर यांच्या गटाला सुवर्णपदक प्राप्त झाले.

आपटे प्रशाला आयोजित अभिनय गीत स्पर्धेतही वृषाली डेंग्वेकर यांना द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

साईनाथ बालक मंदिर आयोजित प्रकल्प बनवा स्पर्धेत पूर्व प्राथमिकच्या अध्यापिका नीता पाठक यांना प्रथम क्रमांक मिळाला तर सांघिक नृत्य प्रकारातही नीता पाठक, श्रद्धा कुलकर्णी व अस्मिता इनामदार यांच्या गटाला प्रथम क्रमांक मिळाला.

**परिषदेसाठीचे संपर्क दौरे :** शिक्षण परिषद राष्ट्रीय पातळीवर असल्याने परिषदेला विविध राज्यांतून प्रतिनिधी यावेत यासाठी जाणीवपूर्वक काम करण्यात आले. केंद्राचे व्यवस्थापक श्री.यशवंत लिमये गुजरातमध्ये, संपर्क प्रमुख श्री. ज्ञानेश्वर सावंत मध्यप्रदेशमध्ये, श्री. आदित्य शिंदे अरूणाचलमध्ये तर श्री. शिवराज पिंपुडे पं. बंगाल राज्यात संपर्कासाठी जाऊन आले. दौऱ्याच्या निमित्ताने श्री. शिवराज पिंपुडे यांना शांतिनिकेतनमध्ये तीन दिवस राहून तेथील शिक्षण पद्धती अनुभवता आली. वरील सर्व राज्यांतून लक्षणीय प्रतिसाद परिषदेसाठी लाभला.

## निगडी केंद्र

**केंद्रीय समिती प्रदीर्घ बैठक :** निगडी केंद्राची धोरणात्मक निर्णय घेणारी समिती म्हणजे केंद्रीय समिती. केंद्रातील उपक्रमांबाबत, कार्यपद्धतीबाबत या बैठकीत विचार विनिमय केला जातो. आ. भाऊ आणि आ. संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली ही समिती गेली ८-९ वर्षे काम करीत आहे. सामान्यतः तीन महिन्यातून एकदा बैठक होते. तर वर्ष अखेर दिवसभराची एक प्रदीर्घ बैठक होते.

यंदा सौर चैत्र २१ (१० एप्रिल)ला दिवसभरात पुढील वर्षासाठीच्या सहा निवडक विषयांवर चर्चा झाली. सुवर्ण महोत्सवी कार्यक्रम-हेतू/उद्देश, मराठी माध्यमातील इंग्रजी अध्यापन, संगणक वर्ग, प्राथमिक शिक्षण, व्यवस्थापन, विज्ञान शोधिका इ. विषयांबाबत धोरणात्मक चर्चा झाली. मा. विवेकराव पोंक्षे, आ. संचालक बैठकीस उपस्थित होते.

**अध्यापक प्रशिक्षण वर्ग :** सौर ज्येष्ठ ७ व ९ (२८ व ३० मे) रोजी अध्यापकांचे पुढील वर्षाच्या तयारीसाठी शिबिर झाले. यामध्ये महेंद्रभाईंनी शिक्षणातून प्रबोधिनीला अपेक्षित कार्य या विषयावर मार्गदर्शन केले. यामध्ये वाचनवेग विकास, प्रतिभा विकसन, भविष्यवेध, देवनागरी लिपीतून इंग्रजी, शिक्षकांना मुलांच्या भावविश्वासात रस असणे. इ. महत्त्वपूर्ण विषय मांडले. आ. संचालकांनी संघटनात्मक रचना व शिस्त या विषयावर मार्गदर्शन केले. मा. शरदराव सुंकर यांनी सर्व विभाग प्रमुखांसाठी सहविचारात्मक निर्णयपद्धती, सहकाऱ्यांशी संवाद, संपर्क व निवेदन वृत्त लेखनातून संघटनात्मक शिस्त रुजविणे इ. मार्गदर्शन त्यांनी केले.

सौर ज्येष्ठ २१ व २२ (११व १२ जून) रोजी पुन्हा वर्षाच्या सुरुवातीला निगडी केंद्रातील सर्व सदस्यांचे (सुमारे १२५) प्रशिक्षण शिबिर झाले.यामध्ये आ. भाऊ यांनी सर्वांना विद्यार्थ्यांमध्ये सदस्यांची मानसिक गुंतवणूक हवी हा शिक्षणमंत्र विविध उदाहरणांद्वारे समजावून सांगितला. श्री. मनोजरावांनी राज्य शिक्षण आराखडा २०१० बाबत सर्वांचे उद्‌बोधन केले. यामध्ये शिक्षण हक्क कायदा, त्याचे संभाव्य परिणाम व त्यासाठी दृष्टिकोनातील बदल याबाबत मार्गदर्शन केले.

**भविष्यचिंतन बैठक :** निगडी केंद्राच्या परंपरेनुसार विद्यालयाच्या श्री गणेश विसर्जन मिरवणुकीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे २७ सप्टेंबर रोजी सर्व सदस्यांची दिवसभराची भविष्यचिंतन बैठक झाली. यामध्ये आ. संचालकांनी 'भविष्याभिमुखता' या विषयावर मार्गदर्शन केले.

### वार्षिक कामकाजाचा आढावा

गेल्या दोन वर्षांपासून विभागशः वार्षिक कामकाजाचा आढावा घेण्याची पद्धत आपण बसवत आहोत. गेल्या वर्षी चार टप्प्यांमध्ये ही प्रक्रिया पार पडली. आ. भाऊंसोबत सर्व विभागातील सदस्यांच्या बैठकी झाल्या. वर्षभरातील विशेष कामांचे निवेदन बैठकीत करण्यात आले. विभागाच्या सहविचार समित्यांची बैठक मा. संचालकांबरोबर झाली एकूणच सहविचार म्हणजे काय ? तो कसा करायचा ? कोणत्या निर्णयांबाबत करूयात ? सहविचार चांगला होण्यासाठी विभागातील वातावरण कसे हवे ? इ. बाबत मा. संचालकांनी मार्गदर्शन केले. विषय समित्यांच्या बैठकी प्रा. विवेकराव पोंक्षे यांच्याबरोबर झाल्या. वर्षभरात अध्यापनात केलेल्या विशेष प्रयोगांविषयी आलेल्या अडचणींविषयी अध्यापकांनी निवेदन केले. त्याला अनुसरुन विवेकरावांनी विषय समित्या ही रचना कशी उपयुक्त ठरू शकेल, या समित्यांमार्फत काय काय करू शकता येईल अशा प्रकारचे मार्गदर्शन केले. याशिवाय विभागातील खाते सदस्यांच्या बैठकी मा. मनोजरावांबरोबर झाल्या. खात्यांनुसार झालेले उपक्रम, त्यांचे झालेले परिणाम इ. बाबत निवेदन झाल्यानंतर खाते रचना ही प्रभावी कशी करता येईल याबाबत मार्गदर्शन केले.

# संघटन प्रभाग

## युवक विभाग, पुणे

गेली अनेक वर्षे १००- १२०जणांचा मोठा गट गणेशोत्सव मध्ये वाद्य वाजवण्यासाठी दलावर यायचा. पण पुढे वर्षभर सगळं बंद असायचं. आज पर्यंत तिथे झालेले प्रयत्न हे, गणेशोत्सव संपला की आलेल्या युवकांना वर्षभर कसं धरून ठेवायचं यासाठी उपक्रम शोधायला सुरुवात अशा पद्धतीचे होते. त्या उलट गणेशोत्सवाच्या आधीच जर दलाची किमान रचना उभी राहिली तर येणाऱ्या युवकांना सहभागी होण्याचं आवाहन करता येणं जास्त योग्य होतं. युवक दल हे करमणूक केंद्र असून चालणार नाही. इथे युवकांनी केवळ आपली आवड जोपासण्यासाठी येऊ नये. सुरुवातीला आकर्षण म्हणून वाद्य किंवा खेळासारखी साधनं वापरायला हरकत नसावी. पण त्या नंतर प्रयत्नपूर्वक आणि वेगात पुढे सरकणं आणि जमलेल्या गटाला प्रबोधिनीला अपेक्षित उद्दिष्टं दाखवत दलाचं स्वरूप देणं अत्यावश्यक आहे.

त्याच बरोबर युवक दलाला नियमित आणि दीर्घ काळ चालणारा कार्यक्रम द्यावा लागेल असं नक्की जाणवलं. फक्त प्रासंगिक उपक्रम देऊन दल उभं राहणार नाही आणि अशा गटाचा संघटना बांधणी मध्ये फार उपयोग होत नाही हे युवक विभागाच्या गेल्या काही वर्षांच्या एकत्रित अनुभवावरून स्पष्ट होत होतं.

### युवक दले

| दलांची नावे | भाग | संख्या |
|---|---|---|
| चंद्रशेखर आझाद | कोथरूड + कर्वेनगर | २० |
| जमशेदजी टाटा | गोखलेनगर | २० |
| वासुदेव बळवंत फडके | शुक्रवार पेठ | २० |
| लोकमान्य टिळक | सहकारनगर | २० |
| शहीद भगतसिंग | संकीर्ण | ४० |
| नेताजी सुभाषचंद्र बोस | संकीर्ण | १५ |
| | **एकूण** | **१३५** |

२०१०पासून युवक दलं उभारण्यासाठी जे प्रयत्न झाले त्याचं फलित म्हणून मागच्या वर्षभरात युवक दलांची खालील पद्धतीने उभारणी झाली.

**शहीद भगतसिंग दल :** नागरी वस्तीच्या गटात मुले आणि युवकांसाठी काम करणारा युवक गट तयार करावा असे ठरले. दलांचे माजी सदस्य आणि प्रबोधिनीला पूर्ण पणे नवीन असे कोणाकोणाचे मित्र असे सगळे मिळून एकूण ४० जण गोळा झाले. एकूण ६ आठवडे एकत्र भेटून एकमेकांशी ओळख झाल्यावर एक दिवस पहिल्यांदा वडारवाडी-पाण्डवनगर या नागरी वस्तीत युवक गेले. तिथे सगळ्यांनी फिरून भाग बघितला. मुलांना गप्पा मारत मारत गोळा केलं आणि तास भर खेळ घेतले. त्यानंतर आठवड्यातून २ दिवस युवक वस्ती मध्ये जायला लागले.

**नेताजी सुभाषचंद्र दल :** ग्रामीण भागात प्रबोधीच्या युवक संघटनाचे काम सुरु व्हावे या उद्देशाने गेले वर्षभर नेताजी सुभाषचंद्र बोस दलांतर्गत पुण्यातील १५ युवक जमत आहेत. पुण्याहून सुमारे ६० किलोमीटर वर असणाऱ्या विंझर येथील महाविद्यालयाची निवड केली आहे. या महाविद्यालयातील ११ वी च्या मुलांचे गेल्या वर्षभरात सुमारे १५ उपक्रम महाविद्यालयाच्या वेळात घेण्यात आले. याशिवाय २ वेळा त्यांच्याबरोबर गडांवर भ्रमंती झाली. या मुलांच्या गावोगावी त्यांच्या घरी जाणे झाले. विंझर च्या आसपासच्या गावांतून येणाऱ्या साधारण ४५ मुलांपर्यंत आपण पोचलो.

**जमशेदजी टाटा दल :** कुमार क्रीडा दलातून पुढे आलेले युवक असल्याने दलाचे मुख्य स्वरूप क्रीडा दल असेच होते. नवा उपक्रम शोधताना जवळच्या टेकडीवर नियमित वृक्ष संवर्धन केले गेले.दलाने प्रबोधिनीच्या अंबाजोगाई केंद्राचा दौरा केला. तेथील उपासना केंद्रे पाहिली.

**चंद्रशेखर आझाद दल :** कोथरूड आणि कर्वेनगर भागातील युवकांची मन:स्थिती, गरजा साधारणपणे सारख्या असल्याने दोन गटात चालणारी युवक दले एकत्र केली गेली. मुख्यत: आठवड्यातून एकदा तरी खेळ, त्याच दिवशी प्रासंगिक वा वैचारिक आणि एक दिवस अभ्यासिका अशा स्वरूपाचे दल कोथरूडमध्ये गेल्या वर्षभरात चालू झाले. वैचारिकांचे विषय टिळक - आगरकर वाद, सावरकर, आंबेडकर, गांधीजी, विनोबा, शिवाजी महाराज व अन्य राष्ट्रीय नेते यांच्या चरित्रांचा अभ्यास, उत्क्रांती, भौतिकशास्त्रातील घडामोडी, समाजातल्या विविध घटना, अशा विस्तृत प्रकारचे होते.

**लोकमान्य टिळक दल :** मागील २ वर्षे २ वेगळ्या गटांमध्ये चालणारे टिळक दल सुवर्ण महोत्सवी वर्षातील मेळाव्यानंतर ३ वेगळ्या गटांमध्ये विभागले गेले. दलावरील माजी विद्यार्थी जे आज नोकरी/व्यवसायात आहेत ते सर्वजण 'व्यावसायिक गट ' ह्या खाली जमायला लागले आहेत.महिन्यातून एकदा एकत्र येउन आपापल्या व्यवसायाबद्दल माहिती सांगणे असे त्याचे स्वरूप अहे. वाद्य गटामधून येणाऱ्या युवकांचा गट दर शनिवारी एकत्र जमून उपासना व येणाऱ्या उपक्रमांमध्ये ह्या गटाचा सहभाग कसा असावा हे ठरवतो.शिवाजी दलाचे माजी विद्यार्थी जे अजून शिक्षणा मध्ये आहेत ते दर रविवारी सकाळी जमून कोणता तरी खेळ व त्या बरोबर उपासना व काही गटचर्चा असा घडवून आणतात. ह्या वर्षी गणेशोत्सवातील पथनाट्य हा गटाचा महत्वाचा उपक्रम होता.

दसरा व प्रतिज्ञाग्रहणाच्या कार्यक्रमाची घेतलेली जबाबदारी ही गटाने घेतलेली पहिलीच मध्यवर्ती जबाबदारी होती. कंदील विक्री साठीचे अर्थ साहाय्य युवक गटामधून उभे केले गेले.

युवक विभागाच्या कामाला वैचारिक आधार मिळावा, अधिक प्रौढ सदस्यांना युवक विभागाच्या नित्य कामात सहभागी होता यावे यासाठी दोन अभ्यासगट मागील वर्षभरात सुरू झाले आहेत –

**अर्थशास्त्र अभ्यास गट –** भारतीय पद्धतीने अर्थशास्त्राचा काही अभ्यास झालेला आहे का याचा शोध घेताना 'हिंदू इकॉनॉमिक्स' नावाचे एक पुस्तक काही सदस्यांच्या वाचनात आले. या पुस्तकाचे वाचन, त्यातील आशयाचे अर्थशास्त्रीय विश्लेषण, त्यातील सिद्धांतावर साधकबाधक चर्चा करणारा, त्यासाठी नियमितपणे भेटणारा एक अभ्यास गट गेल्या वर्षभरात सुरू झाला आहे.

**तत्त्वज्ञान अभ्यास गट –** भारतीय तत्त्वज्ञानाचे नियमित अनुधावन असेल तर युवक विभागाच्या कामाला ठोस वैचारिक आधार मिळेल म्हणून तत्त्वज्ञान अभ्यास गट युवक विभागात सुरू झाला आहे. गीतारहस्य, उपनिषदे याच जोडीला योगी अरविंदांच्या योगसमन्वय अशा विविध ग्रंथांचे वाचन, त्यातील सिद्धांतांवर साधक बाधक चर्चा होते.

**युवक गटातील सदस्यांसाठी झालेले युवक विभागाचे उपक्रम :**

नियमित कार्यक्रम सुरुवात झाल्यानंतर काही विशेष प्रशिक्षणाच्या संधी म्हणून नवनवीन उपक्रम विचारपूर्वक घेतले गेले.

१. पालखीच्या निवासाच्या दिवसात भोजन व्यवस्था करणे

२. अण्णा हजारेंच्या आंदोलनात सहभाग

३. नवरात्रात मंडळांसमोर पथनाट्य

४. युवक विभागातील मार्गदर्शक गटाबरोबर विस्तार शिबिरे.

**विस्तार शिबिरे :** ज्ञान प्रबोधिनीच्या कामाची माहिती महाराष्ट्रात विविध ठिकाणी व्हावी, अनोळखी ठिकाणी जाऊन, मुले गोळा करून शिबिर घेण्याचे धाडस व तसेच कौशल्यही वाढावे, अशा दुहेरी हेतूने युवक विभागातर्फे विस्तार शिबिरे आयोजिली जातात. वेल्हा, शिवापूर भागातील कामथडी, मांगदरी अशा गावांपासून तर मराठवाड्यातील अनेक गावांमध्ये (माजलगाव, अंबाजोगाई, केज, बीड, लातूर), कोकणातील काही गावांमध्ये अशा प्रकारची विस्तार शिबिरे घेतली गेली आहेत.

**५. व्रिकी उपक्रम :** आझाद दलाने ३ वर्षे दिवाळीमध्ये कंदिलविक्री केली. युवकांचेच गट आकाशकंदिल घाऊक बाजारातून आणणे, ते नीट २–३ स्टॉल्सवर लावणे, त्यासाठीच्या नेण्याआणण्याच्या व्यवस्था लावणे, जाहिरात करणे, आकाशकंदिलांचे दर ठरवणे अशा पद्धतीची कामे करत आहेत. यातून मिळालेला नफा प्रबोधिनीच्याच कामात नंदुरबारच्या आदिवासींसाठी वापरावयाचा असे युवकांचे ठरलेले आहे.

**६. वरील उपक्रमांना खाद्यपदार्थ पुरवणे-** फटाकेविक्री, कंदिलविक्रीच्या काळामध्ये शाळकरी मुले व युवक तासन् तास विक्री करत असतात. त्यामुळे त्यांच्या खाण्यापिण्याचीही व्यवस्था करावी लागते. अनेक वर्षे ही गरज बाहेरून खाद्यपदार्थ विकत आणून भागवली जात होती. दोन वर्षांपासून ही गरज काही युवक एकत्र येऊन, स्वत:च काही खाद्यपदार्थ तयार करून भागवू लागले. गेल्या वर्षी ही जबाबदारी शहीद भगतसिंह दलावरील सदस्यांनी मिळून घेतली होती. पदार्थ चांगले होऊ लागल्यावर विक्रीचाही अनुभव घेणे असे काम गटांनी सुरू केले.

**७. दुष्काळनिवारणासाठी श्रमकार्य :** आझाद दलाचे दहा युवक आणि बोस दलाचे दहा युवक कामात जून२०१२ मध्ये वेल्हे तालुक्यातील वरोती गावात विहीर खोल करण्याच्या सहभागी झाले. ब्लास्टिंग केल्यानंतर डबर बाहेर काढण्यासाठी गावकऱ्यांना श्रमकार्यात मदत करणे असे काम या दलाने केले.बोस दलाचे युवक दुष्काळ निवारणाच्या कामात सहभागी झाले होते.

**८. राष्ट्रीय सणांना ध्वजारोहण :** युवक गट गुढीपाडवा, दसरा, स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिन या महत्त्वाच्या दिवसांना ध्वजारोहणासाठी उपस्थित असतो. हिंदुत्वाबद्दलची मांडणी समजून घेणे, राष्ट्रासमोरील आव्हाने समजून घेणे व त्यावर गटांमध्ये चिंतन करणे अशा स्वरूपाचे कार्यक्रम दर वर्षी चालू आहेत. चारही कार्यक्रमांना युवक गट मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.

**९. प्रतिज्ञा ग्रहण :** प्रबोधिनीच्या कार्यसंचाच्या घडणीचा महत्त्वाचा निर्देशक म्हणजे आजन्म देशसेवेची किंवा आजन्म 'प्रबोधिनीच्या मार्गाने' देशसेवेची, किंवा ठराविक काळ प्रबोधिनीला वाहून घेऊन देशसेवा करण्याची प्रतिज्ञा घेणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या वाढणे.

सौर आषाढ २४ (१५ जुलै २०१२) रोजी ७ जणांनी प्रथम प्रतिज्ञा तर दोन जणांनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली.

सौर माघ ७ (२७ जाने.२०१३) रोजी सुवर्णमहोत्सवानिमित्त झालेल्या कार्यक्रमात युवक सदस्य – ४९, पुरुष व महिला पालक – ५८ व अन्य विभाग सदस्य–३५ यांनी प्रथम प्रतिज्ञा घेतली.

**१०. मंडळाबरोबर गणेशोत्सव :** सहकारनगर मधील एकता मित्र मंडळामधील कार्यकर्त्यां बरोबर वाद्य व बर्ची गट बसवून मिरवणूक केली गेली. मंडळाचे १० कार्यकर्ते संपर्कात असतात .

## शालेय दले

**शालेय दलांवर विविध माध्यमे दलासाठी वापरली गेली.**

**क्रीडा :** एकूण ९ क्रीडा दले वर्षभर पुण्याच्या विविध भागात चालू होती. सावरकर दल व आंबेडकर दलात ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील विद्यार्थी येतात. बाकी सर्व दलांवर अन्य प्रशालांमध्ये शिकणारे विद्यार्थी येतात. हे विद्यार्थी त्यांच्या त्यांच्या शाळा सुटल्यानंतर या दलांवर येतात. नियमित व्यायाम, खेळ, जोशपूर्ण व मधून मधून अर्थासहित पद्य, संचलन, एखाद्या सद्य घटनेवर चर्चा, वैचारिक व प्रासंगिके इत्यादी गोष्टींचा नियमित दलावर समावेश असतो.

**विज्ञान :** विज्ञानाची विशेष आवड असणाऱ्या मुलांसाठी दर शनिवारी व रविवारी ज्ञान प्रबोधिनी भवनातील प्रयोगशाळांचा वापर करणारे विज्ञान दल चालवले जाते. याही दलावर पद्ये, प्रासंगिके व वैचारिके होतातच. या दलात मुले –

१) शाळेमध्ये व अगदी महाविद्यालयांमध्येही शिकायला मिळणारे प्रयोग प्रत्यक्ष करून बघतात.

२) विज्ञानामधील विविध संकल्पना स्पष्ट करणारे छोटे छोटे प्रयोग करून बघतात.

३) स्वत:च नवीन प्रयोग रचतात.

४) संशोधनात्मक प्रकल्प करून बघतात.

५) वैज्ञानिक चित्रपट / माहितीपट बघतात, पुस्तकांचे वाचन करतात.

६) या सर्व गोष्टींवर गटचर्चा करतात.

विज्ञान दलाच्या रचनेविषयी एक शोधनिबंध प्रबोधिनीच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त भरवलेल्या प्रज्ञावंतता परिषदेत सादर केला गेला.

**वरील नियमित उपक्रमांशिवाय दलावर प्रासंगिकरीत्या झालेल्या विशेष गोष्टी –**

**दिंडी / पालखी :** आषाढी एकादशीच्या निमित्ताने गोखलेनगर भागात दिंडीचे आयोजन केले होते.त्यात दलावरील सर्व मुलांबरोबर मुलांचे पालकही सहभागी झाले होते.त्यात विद्यार्थी व पालक मिळून एकूण १५० सदस्य सहभागी झाले होते. कुमार दलांवरील काही मुले पालखी सोहळ्यामध्ये सहभागी झाली व माऊलींच्या वा तुकोबारायांच्या पालखीतील दिंड्यांबरोबर २ टप्पे चालत गेली.

**विक्री उपक्रम :** चाफेकर दलाच्या मुलांनी वर्षभर विक्री उपक्रम केले. एकेका विक्री उपक्रमामध्ये मिळवलेला नफा गुंतवत गुंतवत नवनवीन व्यवसाय मुले करत गेली. लिंबू सरबत. कोल्ड कॉफी, पेप्सीकोले, गणपतीच्या पूजेचे सेट, कॅलेंडर विक्री असे विविध विक्री उपक्रम एकापाठोपाठ एक केले गेले. यावर आधारित शोधनिबंध प्रबोधिनीच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त भरवलेल्या शिक्षणपरिषदेत सादर झाला. दोन दलांनी छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकांची विक्री केली. सुमारे ३०० अंक दलांनी विकले. दीपावलीत संभाजी दल व शिवाजी दलानी पणती विक्री करून दलांसाठी अंदाजे २० सहस्र रुपये कमावले. दीपावलीच्या आधी नेहमी प्रमाणे फटाकेविक्री झाली. त्यामध्ये एकूण ४ दले व त्यावरील २० मार्गदर्शक आणि १५० विद्यार्थ्यांचा समावेश होता. माजी विद्यार्थ्यांनी चालविलेल्या युवक प्रबोधन उद्योगात विक्री कौशल्य प्रशिक्षण या १५० विद्यार्थ्यांना मिळाले.

**गणेशोत्सव :** गणेशोत्सवातील मिरवणुकांमध्ये शिस्तबद्ध नृत्याचे प्रात्यक्षिक करण्यासाठी कुमार गट बर्चीनृत्य करतात. विविध मंडळांसमोर, सुमारे ३० सोसायट्यांमध्ये ही बर्चीनृत्याची प्रात्यक्षिके झाली. अथर्वशीर्ष म्हणण्याची सादरीकरणे किशोरांनी अनेक मंडळांसमोर केली. गणपतीची प्रतिष्ठापना पूजा काही दलांवरील कुमारांनी व त्यांच्या मार्गदर्शकांनी विविध घरांमध्ये व मंडळांमध्ये जाऊन सांगितली.

विज्ञान दलाच्या मार्गदर्शकांनी व मुलांनी दरवर्षीप्रमाणे गणपती उत्सवात विविध वैज्ञानिक संकल्पना स्पष्ट करणाऱ्या छोट्या छोट्या प्रयोगांचे प्रदर्शन भरवले. प्रदर्शनाला सुमारे ५,००० नागरिकांनी भेट दिली. प्रदर्शनात विज्ञान दलातर्फे प्रकाशित सुमारे ३०० पुस्तिकांची विक्रीसुद्धा झाली.

## शालेय दले

### वर्ष २०१२ - १३ मधील दले व पटसंख्या

| क्र. | दलाचे नाव | भाग | वयोगट (इयत्ता) | पट- संख्या | किती शाळांमधील मुले येतात? |
|---|---|---|---|---|---|
| १. | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर दल | सदाशिव पेठ | ९वी व १० वी | ८० | १ |
| २. | स्वातंत्र्यवीर सावरकर दल | सदाशिव पेठ | ५ वी ते ८वी | १६० | १ |
| ३. | डॉ. मेघनाद साहा दल (विज्ञान दल) | सदाशिव पेठ | ८वी ते १० वी | २० | ६ |
| ४. | क्रांतीवीर चाफेकर दल | कर्वेनगर | ५ वी ते १० वी | ३५ | ८ |
| ५. | महाराणा प्रताप दल | कोथरूड | ५ वी ते १० वी | २५ | ५ |
| ६. | छत्रपती शिवाजी दल | सहकारनगर | ५ वी ते १० वी | २० | ५ |
| ७. | धर्मवीर संभाजी दल | शुक्रवार पेठ | ५ वी ते १० वी | ३० | ५ |
| ८. | आर्य चाणक्य दल | गोखलेनगर | ८ वी ते १०वी | ५० | ८ |
| ९. | सरदार वल्लभभाई पटेल दल | गोखलेनगर | ५ वी ते ८ वी | ७० | ९ |
| १०. | धायरीचे दल | धायरी | ५ वी ते १० वी | २० | ४ |
| | | | एकूण | ५१० | ३०* |

* एकाच शाळेतील मुले अनेक दलांवर जातात म्हणून एकूण संख्या बेरजेपेक्षा बरीच कमी आहे.

(दलावरील येणाऱ्या ५वी ते ७ वीतील मुलांना किशोर म्हणतात, तर इ.८ वी ते १० वीतील मुलांना कुमार असे म्हणतात.)

# युवती विभाग, पुणे

*यंदा एकंदरीत चार गटांमध्ये काम करायचा संकल्प केला होता. एकंदरीत गुणवत्तेत वाढ करणे हे यावर्षीचे मुख्य उद्दिष्ट ठरविले होते.*

### प्रशालेय गट

- ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील इयत्ता ५ वी १० ते वी च्या मुलींसाठी दैनंदिन क्रीडादलाची ( सोमवार ते शुक्रवार ) योजना व प्रशिक्षकांची व्यवस्था महाराष्ट्रीय मंडळ येथे करण्यात आली होती. खो-खो, रोप मल्लखांब, तायक्वांदो, गोल खो-खो, योगासने, ॲथलेटिक्स, हँडबॉल,व्हॉलीबॉल, जिम्नॅस्टिक्स या क्रीडाप्रकारांचे प्रशिक्षण विविध गटांत देण्यात आले.
- दलावर प्रशिक्षकांबरोबरच युवती मार्गदर्शिका यांची उपस्थिती अशी रचना होती.
- प्रासंगिकरित्या पथकशः दलाचे व अभ्यास दलाचे देखील आयोजन करण्यात आले.
- इ. १० वी मध्ये गेलेल्या मुलींसाठी 'निरंतर दल' घेण्यात आले.
- पथकशः अभंगगायन स्पर्धा तसेच तीळगूळ विक्री उपक्रम घेण्यात आला.
- **पालखी** - इ. ८ वी ते १० वीच्या मुलींनी आळंदी ते दिवेघाट या मार्गावर विविध टप्प्यांवर जाऊन श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या वारीत सहभागी होण्याचा अनुभव घेतला. इ. ७वी मुलींनी पुण्यात पालखीचा मुक्काम असताना वारकऱ्यांच्या भेटी घेतल्या.
- **वर्षा सहली**- सर्व वर्गांच्या सहली विविध गडांवर जाऊन आल्या.
- **राखीसंच विक्री उपक्रम**- इ. ५ वी ते १० वी च्या मुलींसाठी विक्रीकौशल्य प्रशिक्षणासाठी राख्या तयार करणाऱ्या सामानाच्या संचांची विक्री करण्यात आली. एक प्रयोग म्हणून करण्यात आलेल्या उपक्रमातून एकंदरीत रु. ६,०००/- इतके आधिक्य राहिले.
- **गणेशोत्सव**- इ. ७वी मुली लेझीमनृत्य व इ. ८ वी ते १० वी मुली बर्चीनृत्य पथकाद्वारे सहभागी झाल्या. पुण्यातील विविध भागांत प्रात्यक्षिके- मिरवणुका झाल्या.
- **क्रीडाशिबिर**- इ. ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थिनींचे सौर पौष ५ ते ८ (२६ ते २९ डिसें. २०१२) या कालावधीत क्रीडाशिबिर आयोजित करण्यात आले. क्रीडाप्रकारांचे प्रशिक्षण, पथकश: गटकार्ये याबरोबरच कला- विज्ञान यासंबंधी देखील काही सत्रांची योजना केली होती.
- **तंबू शिबिर**- इ. ८ वी- ९ वी च्या विद्यार्थिनींसाठी सांगवी या गावी सौर पौष ४ ते ८ (२५ ते २९ डिसें.) या कालावधीत तंबूतील शिबिर आयोजित केले होते.
- **अभ्यासशिबिरे**- इ. ९ वी व १० वी साठी पाठ्यक्रमावर आधारित अभ्यास करण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.
- प्रशालेतर्फे आयोजित विविध उपक्रमांमध्ये उदा. सहाध्याय-दिन, विद्याव्रत पूर्वतयारी शिबिर यामध्ये युवतींनी सहभाग घेतला. मुलींच्या वर्गबैठकी, पालक मेळावे घेण्यात आले.

### अन्य प्रशालेय गट

- **गणेशोत्सव बर्चीनृत्य प्रशिक्षण**- दांडेकर वस्ती येथील किशोरी (दैनंदिन सराव), गोळवलकर गुरुजी प्रशाला, पुणे येथील इ.७ वी तील विद्यार्थिनी (दैनंदिन सराव) आणि कन्या शाळा, सातारा येथील इ. ७ वी तील विद्यार्थिनी (साप्ताहिक सराव) यांना बर्चीनृत्य प्रशिक्षण दिले.
- **विज्ञान तासिका**- ना. दा. ठाकरसी कन्याशाळा येथे इ. ७ वीच्या विद्यार्थिनींकरिता छोट्या छोट्या प्रयोगांतून विज्ञानाची आवड निर्माण व्हावी म्हणून पाक्षिक विज्ञानतासिकांचे आयोजन करण्यात आले होते.
- **विज्ञान शिबिर**- पुण्यात गोळवलकर गुरुजी प्रशाला व सिंहगड- कल्याण गावी विज्ञान शिबिरे घेण्यात आली.

### महाविद्यालयीन गट

- महाविद्यालयीन युवतींसाठी मासिक उपक्रमांचे आयोजन करायचे ठरवले होते. त्यानुसार काही उपक्रम झाले. जांभळी या गावी भातलावणी उपक्रम, कोजागरी पौर्णिमा साजरी करणे व त्यानिमित्त चित्रपट प्रदर्शन, कोथरूड येथील अंधशाळेत तीन तासांची कार्यशाळा व संस्था भेट, दीपोत्सव असे उपक्रम पार पडले.
- **इ. १० वी ठाणे अभ्यास दौरा**- सौर वैशाख २६ ते ३०) १६ ते २० मे या कालावधीत शालांत परीक्षा दिलेल्या मुलींसाठी ठाणे जिल्हाचा अभ्यास दौरा आयोजित केला होता. विविध प्रश्न व परिसर समजून घेण्यासाठी संस्था भेटी इ.चे आयोजन केले होते.
- सूर्यनमस्कार प्रचारार्थ आयोजित परिषदेतर्फे आयोजित केलेल्या मिरवणुकीत फेब्रुवारी मध्ये महाविद्यालयीन गट व मध्ये वेल्हे येथे मेंगाई देवीच्या जत्रेत प्रशालेय- महाविद्यालयीन गट बर्चीनृत्याद्वारे सहभागी झाले. बर्चीनृत्याचा व युवती-शक्तीचा यानिमित्त प्रसार व्हावा हा यामागील हेतू होता.

### मध्यवर्ती व अन्य उपक्रम -

- **बैठक रचना**- विभागातील युवतींचे विविध वैचारिक बैठकींसाठी एकूण तीन गट होते.

१) नियमित जबाबदार युवती गट- मा. संचालकांबरोबर साप्ताहिक बैठक,

२) प्रासंगिक जबाबदार युवती गट- मा. विवेकराव पोंक्षे आणि मा. हर्षाताईंबरोबर साप्ताहिक बैठक

३) नियमित सहभागी युवती गट- मेधाविनीताई वाटवे यांसह साप्ताहिक बैठक.

- विविध विभागांत/ केंद्रांवर युवतींनी घेतलेला जबाबदारीपूर्वक सहभाग- सुवर्ण महोत्सव कार्यालय, संचालक कार्यालय व युवती

विभाग येथे एक वर्ष पूर्ण वेळ काम (मेधाविनी वाटवे), छात्र प्रबोधन कार्यालय (मीरा शेटे), ज्ञान प्रबोधिनी प्रशाला येथे मूल्यमापन व संकलन विभाग (जुई केमकर), नृत्य अभिव्यक्ती अध्यापन (श्रुती गोसावी, मंजिरी फाटक), संगणक अध्यापन (प्रज्ञा प्रभुदेसाई), सोलापूर येथे ८वी विद्याव्रत पूर्वतयारी, ९ वी विद्याव्रत स्मरण व १० वी अग्रणी प्रशिक्षण या शिबिरांसाठी मार्गदर्शन (संयोगिता दाते). याशिवाय अनेक मध्यवर्ती कार्यक्रमांमध्ये युवतींचा सहभाग होता.

- **ग्रामीण मार्गदर्शिका प्रशिक्षण शिबिर**– सौर वैशाख ३ व ४ मे या दिवशी कल्याण या गावी वेल्हे– शिवापूर या भागातील सहा गावांमधील १४ युवती आणि ६ मार्गदर्शिका यांच्या उपस्थितीत शिबिर झाले. सुट्टीमध्ये या गावांमध्ये दैनंदिन दले चालवण्यात आली.
- विभागाच्या आर्थिक स्वयंपूर्णतेसाठी तीळगूळ विक्री उपक्रम करण्यात आला. या उपक्रमातून एकूण रु. ८७,०००/– इतके आधिक्य राहिले.
- **प्रतिज्ञाग्रहण समारंभ**– वर्षभरात झालेल्या विविध कार्यक्रमांत मिळून एकुणात ८३ युवती कार्यकर्त्यांनी व सदस्यांनी प्रथम प्रतिज्ञा, पाच युवती कार्यकर्त्यांनी द्वितीय, दोघींनी तृतीय तर प्रा. हर्षाताई किर्वे यांनी चतुर्थ प्रतिज्ञा घेतली. यापैकी युवती विभागात काम करणाऱ्यांपैकी १७ जणींनी प्रथम तर दोन जणींनी द्वितीय प्रतिज्ञा घेतली.

# जिजामाता दल

प्रबोधिनीतील प्रज्ञा मानस संशोधिका विभागप्रमुख मा. उषाताई खिरे यांनी युवती विभागातर्फे प्रौढ महिलांसाठी काही तरी सुरू करावे या हेतूने जिजामाता दल सुरु करुन दिले. दलाचे उपक्रम सोमवार, बुधवार ४ ते ५।। यावेळात असतात. यावर्षी दलाचे ३०वे वर्ष आहे. आता येथे पालिकांखेरीज इतर इच्छुक महिलाही सामील झाल्या आहेत.

जिजामाता दलावर वेगवेगळे कार्यक्रम सुरु असतात. १) विरजा मंत्रासह उपासना, २) श्वासाचे व्यायाम, ३) गीतापठण व अभ्यास, संस्कृत स्तोत्र पठण ४) पुस्तक वाचन व त्यावर चर्चा, ५) शारदोत्सव – स्पर्धा, भोंडला, व्याख्यान ६) संक्रांत – गुप्तदान, गरजू संस्थांना मदत/ वेगवेगळे मेळावे, ७) स्फुट लेखन, ८) प्रकल्प – त्यासाठी अवांतर वाचन करावे लागते. दरवर्षी गीतेचा एक अध्याय वाचून त्याचा समजलेला अर्थ लिहून दलावर वाचून दाखवितो. त्यामुळे अडलेल्या अर्थासाठी इतर संदर्भ पुस्तके वाचायची सवय लागते. वेगवेगळी पुस्तके वाचून त्यावर चर्चा केली जाते. त्यामुळे विचारांना चालना मिळून आपले मत मांडण्याचा प्रयत्न केला जातो. सर्वानुमते काही वेगळे विषय ठरवून त्यावर उलट सुलट चर्चा करून मते नोंदविली जातात. वर्तमानपत्रातील काही विशेष वाचनीय लेख एकत्र वाचून त्यावर चर्चा केली जाते. त्यामुळेही माहिती व ज्ञानात भर पडते. शारदोत्सवात महिलांच्या आवडीच्या स्पर्धा ठेवतो व प्रश्नमंजुषेसारखे सामान्य ज्ञानावर आधारित कार्यक्रम ठेवतो. वर्षातून एकदा सहलीचा आनंद लुटून बालपण अनुभवून घेतो.

दरवर्षी एक प्रकल्पविषय ठरवून तो प्रकल्प पुरा केला जातो. दरवर्षीच्या प्रकल्पाचे वेगवेगळे विषय असतात उदा. पक्षी जगत, घर, प्रवास, स्त्री संत चरित्रे, स्त्री लेखिकांची चरित्रे, शांता शेळके यांच्या वाङ्मयाचा अभ्यास. त्यात पुण्यातील प्रार्थना स्थळाचा अभ्यास केला. त्यातील काही लेख तरुण भारत दैनिकात छापून आले होते.

**स्नेहमेळावे** : सदस्यांच्या मुली–सुना, प्रत्येकीच्या दोन मैत्रिणी, युवक व युवती विभागात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पालिका, शाळेतील शिक्षक व शिक्षिकांचे घरातील जोडीदार, निगडी येथे महिलांचा मेळावा, शिवापूर येथील महिला बचत गटाच्या स्त्रिया यांचे स्नेह मेळावे झाले.

या वर्षीचा वर्षारंभ मा. सुजलताई वाटवे यांच्या उपस्थितीत झाला. हॉवर्ड गार्डनर या मानस शास्त्रज्ञाने जे 'सेव्हन इंटेलिजन्स' मॉडेल तयार केले आहे, त्याचा अर्थ व त्यात त्याने काय नमूद केले आहे या विषयाची सविस्तर ओळख सुजलताईंनी करून दिली. त्यातील प्रमुख म्हणजे मेंदूवर आघात किंवा अपघात झाल्याने काही पेशी मृत होतात त्यामुळे कौशल्ये मागे पडतात पण जाणीवपूर्वक प्रयत्नाअंती कालांतराने ती परत येतात. शरीर व मन यांचा सुयोग्य वापर न केल्याने त्यावर गंज चढतो म्हणून त्यांचा वारंवार योग्य उपयोग करायलाच हवा.

संत्रिका विभागातील आर्याताई जोशी यांनी 'श्राद्ध'या धार्मिक विधीविषयी वेदकालापासूनची माहिती सांगितली व टप्प्याटप्प्याने त्यात कसा फरक पडत गेला ते कळले.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे सर्व भगिनी ६५ वयापेक्षा अधिक असल्यामुळे प्रत्येकीने स्वतःची आहे ती शारीरिक व मानसिक क्षमता टिकविण्यासाठी वेगवेगळे खेळ सुरु केले. मराठी शब्दकोडी सोडविणे, छोटी छोटी गणिती कोडी सोडविणे, मेंदू व शरीराची हालचाल यांचा समन्वय कायम राखण्यासाठी सागरगोटे, क्रेझी बॉल इ. चे खेळ खेळणे साध्या चेंडूचे टप्पे व त्यातील प्रकार करून बघणे वगैरे.

शारदोत्सवात डॉ. सुप्रिया अत्रे यांना बोलावले होते. त्यांनी भारतातील पहिल्या महिला डॉ. आनंदीबाई जोशी यांचे जीवन चरित्र उलगडून सांगितले. त्यात त्यांना असलेली शिक्षणाची ओढ, तळमळ, त्यांचा जीवनविषयक दृष्टीकोन व स्त्रीचे विचार हे कळले. सौ. कल्पनाताई रायरीकर यांचे 'स्त्री देवता' या विषयावर अभ्यासपूर्ण भाषण झाले.

# स्त्री शक्ती प्रबोधन

- ज्ञान प्रबोधिनी पुणे येथे काम करणाऱ्या नियुक्त सदस्य आणि स्त्री-कार्यकर्त्या यांचे सामाईक दोन वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम या वर्षी झाले.
- ज्ञान प्रबोधिनीच्या गणेशोत्सव मिरवणुकीत स्त्री शक्ती प्रबोधनच्या गटातर्फे पथक होते. त्यात ढोल, ताशा याबरोबर काही प्रमाणात बर्चीनृत्य व ग्रामीण गटाचे पाऊल भजन होते.
- दुसरा उपक्रम म्हणजे नवरात्रीतला भोंडला. यातसुद्धा वास्तूत काम करणाऱ्या महिलांनी उत्साहाने सहभाग घेतला होता.
- ज्ञान प्रबोधिनीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामुळे मध्यवर्ती कार्यक्रम आणि संवादिनीचे नियमित उपक्रम यामुळे वर्षभरात खूप काम झाले.

या वर्षीच्या उपक्रमांची सुरवात सौर १६ व १७ (५ व ६ एप्रिल) रोजी झालेल्या निवासी अभ्यासशिबिराने झाली. योगी अरविंद आणि स्वामी दयानंद या ज्ञान प्रबोधिनीच्या पथकाधिपतींचे चरित्र व त्यांनी मांडलेले तत्त्वज्ञान असा शिबिरातील अभ्यासाचा विषय होता. मा. गिरीशरावांनी योगी अरविंदांचे चरित्र तर मा. विसुभाऊंनी अरविंदांचे तत्त्वज्ञान याची मांडणी केली. डॉ. सीमाताई दाबक यांनी योगी अरविंदांच्या ''सावित्री'' या दीर्घकाव्यावर विवेचन केले. स्वामी दयानंदांचे चरित्र मा. मृदुलाताई पाठक यांनी सांगितले तर दयानंदांचे विचार मांडायला आर्य समाजाचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. धर्मवीर आर्य आले होते.

**मासिक बैठक**

संवादिनीतर्फे अनेक उपक्रम चालवले जातात. त्या उपक्रमांसाठी उपयोगी ठरावे आणि संवादिनी सदस्यांचे विविध क्षेत्रातील ज्ञान वाढावे यासाठी दर महिन्याच्या तिसऱ्या शुक्रवारी माहितीपर व्याख्याने आयोजित केली जातात. व्यक्तिमत्त्व विकास, आरोग्य, सामाजिक बांधिलकी आणि व्यवहार कौशल्ये या चार सूत्रांना धरून ही व्याख्याने आयोजित केली जातात. या वर्षीच्या मासिक बैठकींचे विषय व वक्ते पुढील प्रमाणे आहेत.

| महिना | विषय | वक्ते | उपस्थिती |
|---|---|---|---|
| जून २०१२ | स्व-जाणीव | वा. अनघाताई लवळेकर | ८० |
| जुलै | एव्हरेस्ट मोहीम | श्री. उमेश झिरपे | ७० |
| ऑगस्ट | मेळावा | संवादिनीत येऊन गेलेले वक्ते आणि समतोल मधील लेखक | ११० |
| सप्टेंबर | प्रबोधिनीतील संस्कार पोथ्यांची माहिती | प्रा. आर्याताई जोशी | ४० |
| ऑक्टोबर | दिवाळी अंक 'समतोल' : प्रकाशन | डॉ. माधवराव गाडगीळ (ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ) | ९० |
| नोव्हेंबर | चल बैठक : चित्ररुप प्रदर्शन | अनघाताई लवळेकर | २२ |
| डिसेंबर | निसर्गोपचार - एक जीवनशैली | डॉ. रविंद्र निसळ | ४५ |
| जाने. २०१३ | संक्रांत मेळावा | कृतिशिल संवादिनी पुरस्कार हस्ते : वा. सुजला वाटवे | ८० |
| फेब्रुवारी | विवाह संस्था कालची व आजची भाग - १ | मा. मंगला सामंत | ५८ |
| मार्च | विवाह संस्था कालची व आजची भाग - २ | वा. अनघा लवळेकर,वा. संज्योत देशपांडे वा. अंजली जोशी | ३५ |

**कृतिशिल संवादिनी पुरस्कार २०१२-१३**

कै. विद्याताई करंबळेकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. यावर्षी पहिल्यांदाच पुण्याबाहेरील संवादिनीना हा पुरस्कार दिला गेला.

१. *संगीता हांडे* *(संवादिनी : पुणे)*

२. *रश्मी जोशी* *(संवादिनी : पुणे)*

३. *स्मिता चावरे* *(संवादिनी : डोंबिवली)*

४. *शुभदा केळकर* *(संवादिनी : बोरीवली)*

**प्रदीर्घ बैठक :** दरवर्षी प्रदीर्घ बैठकीद्वारे मागील वर्षाचा आढावा, पुढील वर्षाचे नियोजन आणि काही कौशल्य प्रशिक्षण घेतले जाते. यावर्षीची बैठक सौर ज्येष्ठ १३ व १४ (३ व ४ जून) रोजी 'गिरीवन' येथे झाली. डोंबिवली, बोरीवली, औरंगाबाद येथून आलेल्या ३८ जणी या बैठकीला उपस्थित होत्या. मा. संचालकांचे वर्षारंभ/वर्षांत उपासना कशासाठी ? यावर मा. महेंद्रभाईंचे संघटन वृत्ती व व्यक्ती विकास कौशल्ये यावर आणि मा. सुभाषरावांनी 'सहविचार तंत्र' या विषयावर मार्गदर्शन केले. मनीषाताई शेटे यांनी 'परिस्थितीची मज आस्था' तर अनघाताईंनी वृत्त-निवेदन कौशल्ये विषयांवर सत्रे घेतली. नेहमीप्रमाणे गटशः नियोजन आणि वर्षांत उपासना झाली.

**समतोल :** ज्ञान प्रबोधिनीच्या स्त्री शक्ती प्रबोधन विभागातर्फे समतोल हे द्वैमासिक गेली पंधरा वर्षे प्रसिद्ध होते. या मासिकाच्या संपादनाची जबाबदारी संवादिनी सदस्यांकडे आहे. विविध सूत्र विषयांना धरून द्वैमासिकात लेखन समाविष्ट केलेले असते. संपूरक समानता, संतुलन, समन्वय, सहभाग अशा विविध प्रकारांचा विचार करून अंकातील साहित्य समाविष्ट होईल हे बघितले जाते.

| महिना | विषय |
|---|---|
| चैत्र-वैशाख | नातेसंबंध |
| ज्येष्ठ-आषाढ | संकीर्ण |
| श्रावण-भाद्रपद | तत्त्वसप्तक |
| आश्विन-कार्तिक | शोध (दिवाळी अंक) |
| मार्गशीर्ष-पौष | भाषा |
| माघ-फाल्गुन | चक्र |

दोन नवीन प्रयोग यावर्षी संपादनासाठी करून पाहिले. त्यात चैत्र वैशाख ह्या अंकाची जबाबदारी बोरीवलीच्या 'संवादिनी' गटाने घेतली होती. बोरीवली केंद्रातील अनेकांनी यात लेखन केले.

श्रावण-भाद्रपद चा अंक हा सुवर्ण महोत्सव विशेषांक म्हणून काढला होता. ज्ञान प्रबोधिनीच्या मार्गदर्शक ''तत्त्वसप्तक''ची मांडणी या अंकात केली होती. प्रबोधिनीतील ज्येष्ठ कार्यकर्ते मा. उषाताई खिरे, मा. यशवंतराव लेले, मा. रामभाऊ डिंबळे, मा. विवेक कुलकर्णी, मा. प्रसाद चिक्षे, मा. नलिनीताई गुजराथी, मा. विसुभाऊ गुर्जर यांनी एकेका तत्त्वाची मांडणी केली. त्यावर आधारित प्रबोधिनीत झालेले काम आणि याच तत्त्वांवर बाहेर चालणारे काम असे एकूण २५ लेख यात होते. या विशेषांकात ज्ञान प्रबोधिनीची एक महत्त्वाची कार्यदिशा ''स्त्री शक्ती प्रबोधन'' अशी मांडणी मा. अनघाताई लवळेकरांनी केली. यासाठी अतिथी संपादक म्हणून प्रा. सुनिलाताई गोंधळेकर यांनी काम केले.

आश्विन-कार्तिक ह्या दिवाळी अंकाचा यावर्षीचा विषय 'शोध' असा होता. यामध्ये अध्यात्म, गणित, शास्त्र, संस्कृती, मानसशास्त्र, वैद्यकशास्त्र अशा विविध विषयांमध्ये लावलेल्या/लागलेल्या शोधांवर लेख समाविष्ट होते. डॉ. वैजयंती खानविलकर यांचा 'आनंदाचा शोध', सौ. मनिषा शेटय़े यांचा 'कुर्मपुराण - कासव एक शोध' हे लेख विशेष होते. तर 'मागोवा म्हणींचा' हा डॉ. प्रदीप सेठिया यांचा लेख रंजक होता. ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ पद्मभूषण माधवराव गाडगीळ यांच्या हस्ते अंकाचे प्रकाशन झाले. या अंकाला सलग तिसऱ्या वर्षी ''लोकमान्य रोटरी पुरस्कार' मिळाला. तर सुखकर्ता सांस्कृतिक प्रतिष्ठानचे उत्कृष्ट विषयातील तृतीय पारितोषिकही मिळाले.

**उमलत्या वयाशी जुळवून घेताना :** ही कार्यशाळा संवादिनीतर्फे गेली दहा वर्षे घेतली जाते. पौंगडावस्थेत मुलांना पडणाऱ्या प्रश्नांवर सोपे पण शास्त्रोक्त पद्धतीने मार्गदर्शन करणे हा या उपक्रमाचा हेतू आहे. शरीर रचना, शास्त्राबरोबरच मैत्री, सौंदर्य, परस्परपूरकता, प्रसारमाध्यमे, व्यसने असे विषयही या कार्यशाळेत घेतले जातात. आतापर्यंत जवळ जवळ ३०, ००० मुलांपर्यंत आपण याद्वारे पोहोचलो आहोत.

या कार्यशाळा इ. ८वी व ९वी च्या वयोगटासाठी घेतल्या जातात. त्याच बरोबर पालकांसाठी ''बहर जोपासताना'' इ. ११वी ते पदवी पर्यंत ''तरुणाईची आव्हाने'' पदव्युत्तर गटासाठी ''सहजीवनाच्या उंबरठ्यावर'' तर या कार्यशाळांसाठी नव्याने प्रशिक्षक तयार होण्यासाठी प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यशाळाही घेतल्या.

| विद्यालय/महाविद्यालय | तारीख | उपस्थिती |
|---|---|---|
| १. सेवा सहयोगद्वारा पिरंगुट | २० मे | ३०० |
| २. परांजपे हायस्कूल, पुणे | ७/८ जून | १५० |
| ३. गंगाबेन फकीरभाई पाटील प्रशाला/कनिष्ठ महाविद्यालय शहादा (नंदुरबार) | २ जुलै | ३०० |
| ४. अक्षरनंदन | ९ व १० जुलै | ४१ |
| ५. ज्ञानदा गुरुकुल | १२, १७ व १८ सप्टें. | १४ |
| ६. बुट्टे पाटील विद्यालय | ५ डिसें. | ३५० |
| ७. उषाताई लोखंडे चॅरिटेबल ट्रस्ट (कामशेत) | १३ डिसें. | १०५ |
| ८. किर्लोस्कर वाडी | १८ डिसें. | ११० |
| ९. मा. आ. सुभाषअण्णा कुल माध्यमिक विद्यालय बोरीभडक, उरुळी कांचन | १९डिसे. | ६० |

याचबरोबर स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण) गटाबरोबर गुंजवणी/शिवगंगा खोऱ्यातल्या आंबवणे, मांगदरी, दापोडे, मनजाई आसनी, वाजेघर, साखर अशा एकूण १७ शाळांमध्ये 'उमलत्या वयाशी जुळवून घेताना'च्या कार्यशाळा घेतल्या.

**प्रशिक्षक प्रशिक्षण : १)** ग्रामीण भागात काम करून इच्छिणाऱ्या २२ जणांसाठी दि. ७ व ८ जुलै रोजी प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षणाचा आढावा व प्रत्यक्ष कामासाठी तयारी म्हणून प्रत्येक आठवड्याला हा गट जमत होता. यातील काही प्रशिक्षित सदस्य ग्रामीण भागातल्या कार्यशाळेसाठी गेले होते.

२) दि. १४ व १५ जुलैला संगमनेर येथे घेतलेल्या संपर्क शिबिरात उमलत्या वयाशी.... चे प्रशिक्षण घेतले. या कार्यशाळेत २८ जण सहभागी झाले होते.

३) दि. १२ व १३ जाने. ११ जणांसाठी प्रशिक्षक प्रशिक्षण घेतले.

**बहर जोपासताना :** (पालक कार्यशाळा)

| दि. | स्थान | उपस्थिती |
|---|---|---|
| २२ जुलै | पुणे (संवादिनी) | १८ |
| ४ सप्टें. | नवनगर विद्यालय,निगडी | ५४ |
| १६ सप्टें. | डोंबिवली | २९ |
| १० जाने. | सुयोग फाऊंडेशन (अहमदनगर) | ४३ |

**तरुणाईची आव्हाने :**

| दि. | स्थान | उपस्थिती |
|---|---|---|
| १४ जुलै | व्होरा ज्युनि. कॉलेज | १३० |
| ३ जाने. | आप्पासाहेब जेधे कॉलेज | १०० |
| ५ जाने. | कावेरी कॉलेज | ५० |
| ३० जाने. | व्होरा ज्युनि. कॉलेज | १०० |

**सहजीवनाच्या उंबरठ्यावर :**

| संस्था | उपस्थिती |
|---|---|
| १. रामकृष्ण मोटे कला व वाणिज्य महाविद्यालय (आकुर्डी) | ८५ |
| २. सरस्वती मंदिर रात्रशाळा | १०० मुले/२१ मुली |
| ३. अगरवाल समाज - रिश्ता वही सोच नयी | १५० |
| ४. स्वरूपवर्धिनी | ९५ |

**मैत्र समुपदेशन केंद्र :** संवादिनी सदस्यांच्या वतीने कौटुंबिक आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर समुपदेशन करण्यासाठी हे केंद्र सुरू करण्यात आले आहे. आठवड्यातून चार दिवस सायं. ४ ते ६ वेळात या मार्गदर्शिका उपस्थित असतात.

**विद्याव्रत संस्कार :** ज्ञानदा गुरुकुल यांच्या विनंतीवरून चार वर्षांपासून तिथे इ. ८वी च्या विद्यार्थ्यांसाठी संवादिनी गटातर्फे युवती गटाच्या मदतीने विद्याव्रत संस्कार केला जातो. गेल्या वर्षी नव्याने या गटात येऊ इच्छिणाऱ्या संवादिनींसाठी मा. यशवंतराव, मा. सुभाषराव, मा. महेंद्रभाई, मा. उमा बापट, मा. मिलिंद नाईक यांनी पूर्वतयारी व्याख्याने घेतली. तर मा. सुवर्णाताई, मा. प्रणिताताई, मेधाविनीताई यांनी गटचर्चेसाठी तयारी कशी करता येईल यासाठी विचार मांडले. अनिरुद्धदादा यांनी गटचर्चा घेतल्या. या गटातर्फे दि. १२ सप्टेंबर रोजी ज्ञानदा गुरुकुल , पुणे (उपस्थिती १६) व मा. सुभाषआण्णा कुल माध्यमिक विद्यालय, बोरीभडक, चंदनवाडी (उपस्थिती ३०) या दोन शाळांमध्ये विद्याव्रत संस्कार झाला.

**पालवी :** अभ्यासपूरक शिक्षणासाठी पालवी गट काम करतो. यावर्षी विषयाधिष्ठित शिबिरे घेतली गेली.

| | | |
|---|---|---|
| २२/२३ ऑगस्ट | ज्ञानदा हायस्कूल ५वी ते ७ वी | इंग्रजी |
| ५/६ सप्टें. | ज्ञानदा हायस्कूल ५वी ते ७वी | विज्ञान |
| ८ सप्टें. | पुणे विद्यार्थी गृहाची शिशु निकेतन | गणित |
| १० डिसें. | पुणे विद्यार्थी गृहाची शिशु निकेतन | विज्ञान |

# विस्तार केंद्रे

## अंबाजोगाई विस्तार केंद्र

**कोलकता सहल :** सौर ज्येष्ठ ६ ते १५ (२७ मे ते दि.५ जून २०१२) या कालावधीमध्ये ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांची अभ्यास सहल पश्चिम बंगालमधील कोलकता येथे जाऊन आली. या सहलीमध्ये बेलूर मठ, काशीपुर मठ, विवेकानंदांचे घर, सुभाषचंद्र बोसांचे घर, दक्षिणेश्वरी देवीचे मंदिर, इस्कॉनचे मंदिर, मायापुरी इ. ऐतिहासिक गोष्टी पाहून इतिहासाचे स्मरण करण्यात आले. या सहलीमध्ये एकूण २४ प्रबोधकांनी सहभाग घेतला होता.

**व्यक्तिमत्त्व विकास शिबिर :** सौर ज्येष्ठ २१ ते २३ (११ ते १३ जू)न या दिवशी गोविंद केंद्रावर १२ ते १४ वयोगटातील मुलांसाठी व्यक्तिमत्व विकास शिबिर झाले. या शिबिरामध्ये ऐतिहासिक विषयांवर चर्चा, वैज्ञानिक आणि परिसर पाहणी इ. गोष्टी प्रामुख्याने घेण्यात आल्या.शिबिरात विज्ञान व एकग्रता या विषयावर मा.गुंडाळेदादा यांचे व्याख्यान झाले. तसेच बाबा आमटे यांच्या जीवनावरचे चरित्र दत्तप्रसाद दादाने सांगितले. शेवटच्या दिवशी हेमंतदादाने अंबाजोगाईतील वेगवेगळ्या ठिकाणांविषयी ऐतिहासिक माहिती, पक्षी निरीक्षण याबद्दल मार्गदर्शन केले.

**शिशुविहार :** सौर ज्येष्ठ २५ (१५ जून) रोजी बालगोपालांच्या शिशुविहाराला सुरुवात झाली. या कार्यक्रमासाठी रामकृष्ण विभागावर सौ. जयश्री धारूरकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तर गोविंद विभागावर प्रमुख पाहुण्या म्हणून मीराताई हस्तक उपस्थित होत्या. दोन्ही कार्यक्रमांची सुरुवात दीपप्रज्वलन करून झाली. पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता झाली.

यावर्षी प्रत्येक महिन्यात नाविन्यपूर्ण पद्धतीने एका रंगाची ओळख करून देण्यात आली. तसेच सहलींमधून शेते, फळबागा अशा विविध गोष्टींचा परिचय करून देण्यात आला. शिशुविहारामध्ये सर्व सण आणि उत्सव वेगवेगळ्या वेशभूषा करून साजरे केले गेले.

सौर अग्रहायण २८ (१९ डिसें.) रोजी मयूर गटाची ४० पालकांसहित हराळी येथे सहल नेण्यात आली होती. सहलीमध्ये पालकांचे लताताईंसोबत बोलणे झाले.

**माँ शारदा गट :** या वर्षीच्या संकल्पानुसार सौर श्रावण १७ (८ ऑगस्ट) रोजी माँ शारदा गटातर्फे महिलांसाठी वाचनालय सुरू करण्यात आले. याचे नाव माँ शारदा अक्षरवाटिका असे ठेवण्यात आले. या कार्यक्रमाला प्रा. सौ. बरूरे व प्रा. संगीता ठोंबरे उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्यांनी उपस्थित प्रबोधकांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला ५० महिलांची उपस्थिती होती. या वाचनालयासाठी १५ सभासदांची नोंदणी झाली.

**दीपोत्सव :** सौर कार्तिक १४ (५ नोव्हें.) या दिवशी सामुहिक दिवाळी तसेच छात्र प्रबोधन या अंकाचे प्रकाशन असा कार्यक्रम झाला. श्री व्यास यांच्या हस्ते छात्र प्रबोधन (मराठी अंक), श्री. बन्सी पवार यांच्या हस्ते छात्र प्रबोधन (ग्रामीण अंक) , श्री मुन्ना सोमाणी यांच्या हस्ते युवोन्मेष तर सौ. बरूरे यांच्या हस्ते छात्र प्रबोधन (इंग्रजी )असे प्रकाशन झाले. कार्यक्रमाच्या शेवटी मुलांनी फुलबाज्या उडवून सामुहिक दिवाळीचा आनंद घेतला.

### विवेकवाडी

सौर पौष २२ (१२ जाने.) रोजी विवेकानंद जयंतीच्या निमित्ताने प्रबोधिनीच्या पहिल्या वास्तूचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमप्रसंगी विवेकवाडी येथे मातृभूमी पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी कार्यकर्ते, प्रबोधक, प्रबोधिका, हितचिंतक, प्रबोध कुटुंबीय उपस्थित होते.

सौर फाल्गुन ११ व १२ (२ व ३ मार्च ) या दोन दिवशी विवेकवाडी येथे निवासी शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात युवक गटाचे १० सदस्य ९ शिशुविहारताई, विवेकवाडी विभागाचे चार, स्फुर्ती गटाचे तीन व इतर चार जणांची उपस्थिती होती.

### उपासना केंद्र शेपवाडी

सौर पौष २२ (१२ जाने.) विवेकानंद जयंतीनिमित्त शेपवाडी येथील उपासना केंद्रातर्फे वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी ३० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. प्रत्येकी ३ स्पर्धकांना शाळेच्या मुख्याध्यापकांच्या हस्ते बक्षीस देण्यात आली.

सौर पौष २३ (१३ जाने.) रोजी हनुमान मंदीर सभागृह शेपवाडी या ठिकाणी युवकांसाठी कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. अभिजित जोंधळे उपस्थित होते. तसेच गावातील सर्व प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या. या कार्यक्रमाप्रसंगी श्री अभिजित जोंधळे यांनी आपले विचार मांडले. त्यानंतर डॉ. बाबाराव शेप, तुकाराम शेप, कप्तान माणिकराव शेप, पांडुरंग शेप व राम शेप यांनी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी १५० जणांची उपस्थिती होती.

### अभिव्यक्ती २०१३ : ३ फेब्रुवारी, आद्यकवी मुकुंदराज सभागृह

चिमणी गट व मयुर गटातील मुलांची भाषणे आणि नृत्ये यांचे सादरीकरण झाले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सौ. प्रिया पाटील, सौ. महोरकर, सौ. अपर्णाताई कुलकर्णी व सौ. निर्मळेताई उपस्थित होत्या.

प्रबोधिका गट, युवती गट, उपासना केंद्र यांनी सायंकाळच्या सत्रामध्ये आपले कलाविष्कार सादर केले.या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या श्रीमती संजीवनी मुळे(प्राचार्या, शासकीय अध्यापक महाविद्यालय, अंबाजोगाई), तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती अपर्णा पोपडे (माँ शारदा गटाच्या सदस्या) या होत्या.

प्रबोधक गटात युवक विभाग, उपासना केंद्र आणि दल यातील मुलांनी आपले कलाविष्कार सादर केले. या कार्यक्रमासाठी श्री. विजय भालेराव, श्री. कौस्तुभ कोदरकर व श्री. मोरेश्वर देशपांडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावर्षीच्या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे पालकांचा, उपासना केंद्रावरील मुलांचा, युवक गटाचा आणि युवती विभागाचा सहभाग.

अभिव्यक्ती २०१३ या कार्यक्रमांतर्गत सौर माघ ११ (३१ जाने.) रोजी आनंद नगरीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला पालकांनी उत्तम प्रतिसाद दिला. या उपक्रामध्ये १५ गटांनी सहभाग नोंदवला. यात पाककला स्पर्धाही घेतली होती.

### स्वराविष्कार

सौर पौष ६ (२७ डिसें. २०१२) रोजी स्वराविष्कार हा माजी विद्यार्थ्यांचा संगीताचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. दत्तात्रय कुलकर्णी उपस्थित होते. तबला साथसंगत श्री. संकेत जोशी यांची होती. या कार्यक्रमाला ३५ पालकांची उपस्थिती होती.

### अंबाजोगाई व प्रबोधिनी परिचय शिबिर

सौर पौष ४ (२५ डिसें.) रोजी अंबाजोगाई व प्रबोधिनी परिचय शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. श्री. रत्नाकर निकम यांनी प्राचीन अंबाजोगाईचा मुलांना फोटोसह परिचय करून दिला. त्यानंतर खेळाचे सत्र झाले. प्रसाददादाने प्रबोधिनीचा परिचय करून दिला. या शिबिरासाठी ३५ मुलांची उपस्थिती होती.

फेब्रुवारी मध्ये पूस येथे युवक गटाचे एकत्रिकरण घेण्यात आले. या एकत्रीकरणामध्ये २० जणांची उपस्थिती होती. या बैठकीमध्ये अभ्यासगटाच्या नियोजनासंबंधी चर्चा झाली. श्री.बन्सी पवार, श्री. अभिजित दादा यांचे मार्गदर्शन झाले.

'पत्रसंवाद' या मा. गिरीशरावांनी पाठवलेल्या पत्रांच्या पुस्तकाचे वैयक्तिक वाचन व त्यावरील चर्चा व प्रश्नोत्तरे अशी सत्रांची रचना होती. या निमित्ताने या पत्रांचा सखोल अभ्यास व चर्चा झाली. एकूणच अंबाजोगाई मधील १२ वर्षांचे काम, विविध उपक्रम, घेतलेले निर्णय, केलेल्या रचना व यामागील भूमिका समजून घेता आली.

# बोरीवली विस्तार केंद्र

ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त बोरीवली केंद्राने पुढील कार्यक्रम केले.

**१) १५ ऑगस्ट २०१२ आजी माजी कार्यकर्ता मेळावा** : उपस्थिती ५५ होती. प्रा. महेंद्रभाई सेठिया मार्गदर्शक म्हणून आले होते. त्यांनी कार्यकर्ता कधीच माजी होत नसतो, काही वैयक्तिक कारणांमुळे काही काळासाठी त्याने काम थांबवले असते इतकेच! संधी मिळताच तो पुन्हा कामाला लागतोच. हा मत्त्वाचा मुद्दा मांडला आणि खरोखरच अनेक कार्यकर्ते पुन्हा आपल्या बरोबर काम करू लागले आहेत.

**२) १७ ऑगस्ट-गीत गांधार** : ज्ञान प्रबोधिनीच्या पद्यांची गीत गायन स्पर्धा ! ही स्पर्धा २ गटांत ठेवली होती. यासाठी मुंबईतील आर वॉर्ड मधील ४० शाळांमध्ये प्रबोधिनी गीतांच्या सी.डी. नेऊन दिल्या पण प्रतिसाद अत्यल्प होता. फक्त  शाळांनी भाग घेतला.त्यांना ज्ञान प्रबोधिनीची पुस्तके भेट दिली. गोखले विद्यालयाची तयारी खूप चांगली होती. त्यांचे गीत गायन ३ फेब्रुवारीच्या भव्य मेळाव्यात आवर्जून ठेवले होते. उपस्थितांना ते फार आवडले.

**३) ९ सप्टेंबर-प्रबोधक मेळावा** : आजवर निरनिराळ्या शिबिरात सहभागी झालेल्यांना पुन्हा एकदा एकत्र आणण्याचा प्रयत्न होता. यात ४० जण सहभागी झाले होते.

**४) ७ ऑक्टोबर-पालक मेळावा** : विकासिकांच्या पालकांबरोबर इतर पालकांनाही लाभ मिळावा म्हणून जाहीर कार्यक्रम होता. वा. अनघाताई लवळेकर मार्गदर्शनासाठी आल्या होत्या. उत्तम प्रतिसाद होता. १२५ पालक हजर होते. अनघाताईंचे मार्गदर्शन खूपच छान झाले. आजकालच्या दिवसात पालकत्व फक्त मुलांपुरते मर्यादित राहिले नसून आपल्या मातापित्यांचे पालकत्वही पार पाडावे लागते हा महत्त्वाचा मुद्दा त्यांनी मांडला.

**५) ८ जानेवारी २०१३** : गुजरात राज्यातील सलाटवाडा बडोदा येथील महाराणी चिमणाबाई हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. विजय कुलकर्णी यांच्या सहकार्याने त्यांच्या शाळेत ज्ञान प्रबोधिनीची आणि छात्र प्रबोधनची माहिती दिली. इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांना स्वयं.अध्ययनाची तोंड ओळख करून दिली.

**६)** ज्ञान प्रबोधिनी सुवर्ण महोत्सवानिमित्त ५५ ठिकाणी मातृभूमी पूजने झाली.

**७) ३ फेब्रुवारी :** आबालवृद्धांसाठी ''आपली सर्वांची ज्ञान प्रबोधिनी'' हा भव्य मेळावा! प्रचंड प्रतिसाद! वय वर्षे ७ ते ८४ मधील ७५० जणांचा सहभाग ! वयोमानानुसार १५ विषयांची व्याख्याने, कार्यशाळा इत्यादींची आखणी केली होती. पुणे प्रदर्शनातील २१ फ्लेक्स व बोरीवलीतील ९ फ्लेक्स यांचे प्रदर्शन मांडण्यात आले होते.

सर्व कार्यशाळांनंतर गोखले शाळेच्या मुलांच्या पद्याने संध्याकाळच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. बीमा नगर शाळेच्या मुलींचे बरची नृत्य झाले. स्थानिक आमदार श्री. गोपाल शेट्टी यांनीही मार्गदर्शन केले. मा. वा.गिरीश रावांचे मार्गदर्शन झाले. परंपरेप्रमाणे प्रार्थनेने समारोप झाला.

# डोंबिवली विस्तार केंद्र

**नित्य-नियमित उपक्रम :**

**प्रबोधक मंडळ :** प्रबोधक मंडळाच्या दोन्ही गटांनी (लचीत बडफुकन व हरिसिंह नलुआ गट) छात्र प्रबोधन विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या 'सृजनाला पंख नवे' या सादरीकरण स्पर्धेत सहभाग घेतला आणि अनुक्रमे प्रथम व तृतीय पारितोषिक पटकावून घवघवीत यश मिळवले. याशिवाय वर्षभर दर रविवारी (दोन तास) होणाऱ्या बैठकीत विविध सत्रे झाली. ह्या वर्षी मंडळाची अभ्यास सहल म्हणून मुलांना भारतीय रिझर्व्ह बँकेचे नाणे संग्रहालय पहायला नेले होते.

**विद्याव्रत संस्कार :** सौर २७ चैत्र ते १ वैशाख (१६ ते २१ एप्रिल) या कालावधीत केंद्राने विद्याव्रत संस्काराचे आयोजन केले. सौर २ वैशाख (२२ एप्रिल)रोजी मंगलमय वातावरणात मुंबई विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विषयाच्या विभागप्रमुख असलेल्या आ. शुभदाताई जोशी यांनी ४६ व्रतार्थी विद्यार्थ्यांना दीक्षा दिली व मार्गदर्शन केले.

**विद्याव्रत पाठपुरावा** : नोंदणी केलेल्या ३० विद्यार्थ्यांनी डोंबिवली ते वज्रेश्वरी सायकल सहल, विक्री कौशल्य म्हणून छात्र प्रबोधन दिवाळी अंकाची प्रकाशन पूर्व नोंदणी, पणत्या-आकाशकंदील बनवणे, अलिबागच्या कोर्लाई गडावर सहल, दादा-ताई यांच्याबरोबर निर्माल्य प्रकल्पात प्रत्यक्ष सहभाग व सत्कर्म श्रद्धाश्रय या सामाजिक संस्थेला भेट असे विविध अनुभव घेतले.

**कल चाचणी :** प्रज्ञा मानस संशोधिकेच्या सहकार्याने केंद्राने सौर १२ १९ व २६ चैत्र रोजी (१, ८ व १५ एप्रिल) १०वी/१२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी अनुक्रमे कल चाचणी, प्रा. विवेक वेलणकर यांचे करिअर निवड यावर व्याख्यान व समुपदेशन याचे आयोजन केले. एकूण ११८ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

**रात्र शिबिर :** मानवी मनोरे, जाहिरात सादरीकरण, खजिना खेळ, मैदानी खेळ, चित्रपट रसग्रहण, भेळ बनवणे अशा विविध सत्रांनी नटलेल्या यंदाच्या रात्र शिबिराचे संपूर्ण नियोजन केंद्राच्या २० युवक-युवतींनी यशस्वीपणे सौर ३ पौष (२४ डिसेंबर) रोजी केले. एकूण ८० शालेय विद्यार्थी या शिबिरात सहभागी झाले.

**युवक-युवती विभाग** : या वर्षी अभ्यास मंडळाच्या मासिक बैठकांमध्ये पू. विनोबाजींच्या 'मधुकर' या पुस्तकातील प्रकरणे वाचून त्यावर चर्चा झाली. या विभागातर्फे सौर ७ ते १३ ज्येष्ठ ( २८ मे ते ३ जून) या

कालावधीत १३ विद्याव्रती युवकांसाठी 'नेतृत्व संवर्धन' शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरानंतर या युवकांनी ५ वी ते ७ वीच्या मुलांचे सौर ११ ते १३ ज्येष्ठ (१, २ व ३ जून) या कालावधीत अर्धनिवासी शिबिर आयोजित करण्याचा अनुभव घेतला.

यंदा गणेशोत्सवात या विभागातर्फे विसर्जनाच्या ठिकाणी कार्यकर्त्यांनी निर्माल्यातून १६० किलो प्लास्टिक वेगळे काढून पुनर्वापरासाठी दिले.

**संवादिनी :** संवादिनीच्या मासिक बैठकांमध्ये ह्या वर्षी विविध विषयांवरील सत्रे झाली. या शिवाय ह्या वर्षी संवादिनी सदस्यांच्या तीन गटांनी स्त्रीभ्रूणहत्या यावरील पथनाट्य, ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या व चाळीशी नंतरचे आजार याविषयांवर प्रकल्प केले व सौर १० आश्विन रोजी (२ ऑक्टो.) मा. संचालकांसमोर त्याचे सादरीकरण झाले.

**पालक मंडळ :** पालक मंडळाची यंदाची वैशिष्ट्ये म्हणजे पुणे संवादिनीच्या केतकीताई पेंडसे व साधनाताई सेठिया यांनी पालकांसाठी घेतलेली कार्यशाळा, डॉ.संदीप केळकर व डॉ.अद्वैत पाध्ये यांनी दिलेली अनुक्रमे '२१ व्या शतकातील पालकत्व' व 'पालकांच्या ताणतणावामुळे मुलांवर होणारे परिणाम' या विषयावरील व्याख्याने, आश्वासक पालकत्व व समतोल मधील लेखांचे गटश: वाचन व चर्चा, चित्रपटांमधील पालकत्व विषयाशी निगडीत निवडक दृश्ये दाखवून त्यावर चर्चा तसेच कार्यकर्त्यांनी स्वत: अभ्यास करून सुट्टीचे नियोजन या विषयावर पालकांना केलेले मार्गदर्शन !

**पौरोहित्य विभाग** : सौ.आर्याताई जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या पौरोहित्य विभागातील सदस्यांनी यावर्षी हरितालिका, वेदपूजन व श्राद्ध हे संस्कार शिकून त्यांचा सराव केला. याशिवाय गणेशप्रतिष्ठापना व लक्ष्मी पूजन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यकर्त्यांनी ठाकुर्ली येथे जाऊन तेथील महिलांना वटसावित्रीची पूजा सांगितली. एकूण ७२ महिलांनी याचा लाभ घेतला.

**छात्र प्रबोधन नोंदणी, ग्रामीण मेळावे :** ह्या वर्षी छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकांची नोंदणी पुढीलप्रमाणे झाली. मराठी-७४१, इंग्रजी-६३७, युवोन्मेष - १७४, ग्रामीण-३७६, बोलका अंक - १२, पी. डी. एफ - ५०, एकूण २०००. छात्र प्रबोधन दिवाळी अंकांसाठी केंद्राकडून ४५,७००/- रु. चे अर्थसहाय्य करण्यात आले.

या वर्षात छात्र प्रबोधनचे ११२ नवीन सभासद झाले व एकूण ३०,४३९/- रुपयाची प्रकाशन विक्री झाली.

दरवर्षी प्रमाणे यंदाही केंद्राने कसाऱ्याजवळ चिंधीची वाडी व बाळे वाकळण येथे ग्रामीण दिवाळी अंकावर व डोंबिवलीतील प्रबोधकांसाठी मराठी अंकावर वाचक मेळावे घेतले. यंदा प्रथमच केंद्राने विद्या निकेतन शाळेत इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी दिवाळी अंकावर आधारित वाचक मेळावा यशस्वीपणे आयोजित केला.(उपस्थिती सरासरी ५०).

**कार्यकर्ता प्रशिक्षण व अभ्यास शिबिर :** डोंबिवली, कल्याण, बदलापूर व ठाणे येथील नवीन १८ कार्यकर्त्यांसाठी केंद्राने सौर १३ अग्रहायण, २, १३ व २१ पौष रोजी संयोजक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले.

या वर्षी केंद्राचे अभ्यास शिबिर सौर १६-१७ आषाढ व २३-२४ आषाढ रोजी (७-८, १४-१५ जुलै) दोन टप्प्यात अनुक्रमे शिक्षण व संघटन यावरील स्वामी विवेकानंदांचे विचार समजून घेणे या उद्देशाने आयोजित करण्यात आले. आ. लताताई, हर्षाताई, अभयाताई व शिवराजदादा यांचे मार्गदर्शन लाभले. एकूण २२ कार्यकर्त्यांनी याचा लाभ घेतला.

याशिवाय नियमित उपक्रमांबरोबर ठाणे, कल्याण व डोंबिवलीत येथे पाच मातृभूमी पूजनाचे कार्यक्रम उत्साहात पार पडले.

### सुवर्णमहोत्सवानिमित्त झालेले कार्यक्रम

**वर्षारंभ उपासना :** सौर श्रावण १४ (५ ऑगस्ट) रोजी वैशाली वैशंपायन यांच्या निवासस्थानी कार्यकर्त्यांची वर्षारंभ उपासना झाली. दीपाली गोडसे हिने पोथी वाचन केले. उपस्थित असलेल्या २८ कार्यकर्त्यांनी उपस्थितांसमोर वैयक्तिक संकल्प केले. त्यानंतर सुवर्ण महोत्सवाची सुरवात म्हणून श्री. भाई फडके यांनी आ. कै. आप्पा पेंडसे यांच्या आठवणींचे कथन केले.

गांधी जयंतीचे औचित्य साधून सौर आश्विन ८ ते १० (३० सप्टें. व १ व २ ऑक्टो.) रोजी 'महात्मा गांधी-आयडॉल नव्हे रोल मॉडेल' या विषयावर मा. संचालक वा. गिरीश बापट यांची व्याख्यानमाला आयोजित केली होती.

**कुमार संमेलन :** दि. २८ नोव्हेंबर रोजी कुमार संमेलन आयोजित केले होते. युवक-युवती कार्यकर्त्यांनी कार्यकर्त्यांनी आयोजित केलेली गंमत जत्रा, पुणे व निगडी केंद्राच्या ताई-दादांचे अनुभव कथन, गटचर्चा, प्रमुख पाहुणे प्रा. महेंद्रभाई सेठिया यांच्या हस्ते बक्षीस समारंभ व त्यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान अशी मुख्य सत्रे झाली. या संमेलनात एकूण १९० विद्यार्थी व १०० पालक उपस्थित होते.

विवेकानंद केंद्र, डोंबिवलीला ज्ञान प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ३० डिसें. रोजी दिवसभराच्या युवक-युवती संमेलनाचे आयोजन केले होते. पूर्वार्धात आ. श्री. विवेक घळसासी यांचे 'युवकांचे विवेकानंद' हे व्याख्यान तर उत्तरार्धात ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे यांनी दिलेले 'सामाजिक उद्योजकता' यावरील व्याख्यान व त्यानंतर पुण्याच्या सामाजिक उद्योजिका मा. निर्मलाताई कांदळगावकर यांची रंगलेली प्रकट मुलाखत ही या संमेलनाची प्रमुख वैशिष्ट्ये होती.

### सामाजिक संस्था परस्पर परिचय मेळावा

डोंबिवलीमध्ये सामाजिक काम करणाऱ्या विविध २० संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. ज्ञान प्रबोधिनी सहित प्रत्येकाने आपल्या संस्थेच्या कामाचा परिचय एकमेकांना करून दिला. मा. रामभाऊ डिंबळे यांनी 'संघटना हे सूत्र बनावे' या विषयावर मार्गदर्शन केले. याप्रकारे अशा संस्था पहिल्यांदाच एकत्र आल्या. एकत्र येण्याचा उपयोग होऊ शकतो, असे सगळ्यांना जाणवले.

शहापूर, जि. ठाणे - डोंबिवली विस्तार केंद्राने येथे नव्याने संपर्क साधून तेथील पी. एस. देशमुख विद्यालयातील इ. ७ वी च्या ५० विद्यार्थ्यांचा वाचक मेळावा सौर अग्रहायण २३ (१४ डिसें.) रोजी घेतला.

# नागरी वस्ती अभ्यास गट

**अभ्यासगट :** ज्ञान प्रबोधिनीमध्ये दर गुरुवारी या अभ्यासगटाची बैठक होते. ज्यांना वस्तीपातळीवर काम करायचे आहे, असे प्रबोधिनीतील विविध विभागांतील व अन्य ठिकाणांहून येणारे लोक सदस्य म्हणून काम करतात. यावर्षी एकूण २५ जणांनी काम करण्याचा अनुभव घेतला. साप्ताहिक कामांच्या स्वरूपात युवतींनी किशोरींसाठी कामे केली. कु. दीपाली गोडसे (डोंबिवली केंद्र) हिने पूर्णवेळ कार्यकर्ती म्हणून सहा वस्त्यांमध्ये काम केले. त्याचबरोबर युवक विभागाने दोन वस्त्यांमध्ये काम केले. ग्राम विकसन विभागातून युवती प्रबोधन मंडळासाठी अश्विनीताई ठाकर व सुनीताताई गायकवाड यांनी दोन वस्त्यांमधून वर्षभर काम केले. अन्य विभागातील सदस्यांनीही प्रासंगिक सहभाग घेतला. मा. संचालकांनी वर्षभरात सहा बैठकांमध्ये मार्गदर्शन केले. वस्तीत काम करताना त्याचा सगळ्यांना उपयोग झाला. अभ्यासगट प्रमुख म्हणून प्रा. हर्षाताई किर्वे यांनी नियोजक व समन्वयक म्हणून काम केले.

बैठकीतील कार्यकर्ते विविध वस्त्यांमध्ये घरोघरी जाऊन लोकांना भेटले, संवाद करून लोकांची मने समजून घेण्याचा प्रयत्न केला. यावर्षी भेटींचा विशेष भर पुढील वस्त्यांवर होता. वडारवस्ती( फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मागे), काशीवाडी (भवानीपेठ), दांडेकर वस्ती (शास्त्री रस्ता), किष्किंधानगर (पौड रस्ता), मातंगवस्ती (सदाशिव पेठ), हडपसर-वैदूवाडी, रमाबाई आंबेडकर, इंदिरा वसाहत (बिबवेवाडी). या भेटीतील चर्चांमधून लोकांच्या अपेक्षेनुसार संस्कारक्षम वयातील किशोरींसाठी कार्यक्रम सुरू केले. स्थानिक मंडळांबरोबर सुरू केलेल्या कामाचे स्वरूप पुढील प्रमाणे आहे. ज्ञान प्रबोधिनीचे मुख्य काम मनुष्यघडणीचे शिक्षण देणे, हे आहे. शिक्षणातून प्रत्येकामध्ये असणाऱ्या मूळ क्षमतांचे विकसन व्हावे यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे अनुभव देण्याचा प्रयत्न केला जातो. त्यांच्यातील नेतृत्वगुण हेरून ते व्यक्त होण्याची संधी मुलांना गटकार्य, स्पर्धा, खेळ इ. माध्यमांतून दिली जाते. ज्ञान प्रबोधिनीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात सौर श्रावण २८ (१९ ऑगस्ट)ला अभ्यासगट कार्यकर्त्यांचा मेळावा झाला. त्यात ७० जण सहभागी झाले होते.

**साप्ताहिक किशोरी दले :** एप्रिल २०११ पासून सहा वस्त्यांमध्ये साप्ताहिक दलांमार्फत व शिबिरांमार्फत नियमितपणे काम सुरू झाले. एप्रिल व मे महिन्यात वडारवाडी, दांडेकरवस्ती, मातंगवस्ती, किष्किंधानगर, काशीवाडी, हडपसर (वैदूवाडी) या वस्त्यांमध्ये शिबिरे झाली. रांगोळी प्रशिक्षण, मेंदी प्रशिक्षण, वारली चित्रकला, वेगवेगळी हस्तकौशल्ये, विज्ञान प्रयोग, गाणी, खेळ अशी सत्रे या शिबिरांमध्ये झाली. शिबिरानंतर या सहा वस्त्यांमध्ये मुलींसाठी साप्ताहिक दले सुरू झाली. आठवड्यातून एक दिवस वस्तीतल्या मुली एकत्र जमतात. दलावर त्यांचे व्यायाम आणि खेळ घेतले जातात. त्यानंतरच्या वेळात टिशू पेपरची फुले, गिफ्टबॉक्स, बुकमार्क अशा अनेक वस्तू मुली बनवायला शिकल्या. खेळ आणि हस्तकौशल्यांबरोबरच वेगवेगळी गटकार्ये मुलींना दिली जातात. एखाद्या विषयावर वाचन करून नंतर त्यावर चर्चा केली जाते. यातून मुली विचार करायला आणि धीटपणे बोलायला, आपली मते मांडायला शिकत आहेत. या वस्त्यांमध्ये काही विशेष उपक्रम झाले.

**वडारवाडी :** सौर माघ १५ (४ फेब्रु.)ला वडारवाडीतील युवती मंडळात विज्ञानगीत व वारली चित्रकला प्रशिक्षण घेतले. ७ युवती यावेळी उपस्थित होत्या. नंतर वर्षभरात समाईक उपक्रम झाले.

**काशीवाडी :** दि. २२ जाने. २०१२ ला काशीवाडी जवळील अरूणकुमार वैद्य स्टेडियमवर झालेल्या युवक विभागाच्या प्रात्यक्षिकांच्या वेळी काशीवाडीतील २३ किशोरवयीन मुला - मुलींचा गट प्रात्यक्षिके बघण्यासाठी आला होता. त्यातील अनेकजण रविवारी होणाऱ्या साप्ताहिक दलांना येतात.

**दांडेकर वस्ती :** या वस्तीतील किशोरी दलांवर येणाऱ्या मुली आणि वीटभट्टी परिसरातील मुलींचे एकत्र शिबिर सौर वैशाख १४ व १५ (४ व ५ मे ) ला झाले. वीटभट्टी परिसरातील एका हॉलमध्ये दोन्ही ठिकाणच्या मुलींचे हे शिबिर झाले. शिबिराच्या पूर्वतयारीसाठी तीन-चार भेटी झाल्या. शिबिराच्या नियोजनात व पूर्वतयारीत दांडेकर वस्तीतील तीन युवतींचाही सहभाग होता. प्रत्यक्ष शिबिरातही अभ्यासगटातील युवतींबरोबर त्यांनीही मुलींना मार्गदर्शन केले. शिबिराच्या पहिल्या दिवशी कागदी पिशव्या तयार करून सजवणे, पुतळा सजवणे हे गटकार्य, तसेच पद्य, स्पर्धा, ओंजळीने बाटलीत पाणी भरणे अशी रंजक शैक्षणिक सत्रे झाली.

**रमाबाई आंबेडकरवस्ती व इंदिरा गांधी नगर वस्ती :** मार्च २०१२ मध्ये साप्ताहिक किशोरी दले ज्या वस्तीमध्ये झाली त्यापैकी २ वस्त्यांमध्ये (वडारवाडी व दांडेकर वस्ती) अभ्यासपूरक सत्रे दलांच्या वेळात घेतली गेली. अभ्यास करण्याच्या पद्धती, अभ्यास करताना येणाऱ्या अडचणी आणि त्या सोडवण्याचे मार्ग यावर किशोरींसोबत मोकळेपणाने चर्चा झाली. दि. ११ मार्च रोजी महात्मा फुले जयंतीच्या निमित्त गंजपेठ या भागातील वस्तीला भेट देण्यात आली. वस्तीमधील समाजमंदिरात उपस्थित असणाऱ्या स्थानिक लोकांशी ओळख व चर्चा झाली.

किशोर व युवक यांच्यासाठी संघटन व प्रबोधनाचे काम यावर्षी तीन वस्त्यांमधून झाले. वडारवाडी, काशीवाडी, हडपसर या वस्त्यांमध्ये युवकांद्वारे खेळ, अभ्यासिका, पथनाट्य इ. माध्यमांतून किशोर व युवकांशी संपर्क, संवाद झाला. काशीवाडीतील मुलांनी राखी विक्री उपक्रम राखी पौर्णिमेच्या दिवशी प्रथमच केला. त्यातून त्यांनी नफा मिळवला व तो सार्वजनिक मंडळाच्या कामासाठी वापरला. राखी विक्रीच्या निमित्ताने त्यांनी लोकांशी संवाद साधण्याचे कौशल्यही

शिकले. वडारवाडी परिसरातील ३०० युवकांच्या मुलाखती १० महाविद्यालयीन युवकांनी घेतल्या. त्यातून त्यांना वस्तीतील युवकांची मनस्थिती व सामाजिक – आर्थिक परिस्थितीची जाणीव झाली. युवकांनी व्यक्त केलेल्या अपेक्षांना प्रतिसाद म्हणून युवक जागृती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

**युवक जागृती मेळावा :** सौर भाद्रपद १८ (९ सप्टें.) रोजी वडारवाडीतील पांडवनगर हेल्थकॅम्प येथील डोंगरे हॉल मध्ये युवक जागृती मेळावा झाला. मेळाव्यात वस्ती परिसरातील युवक, भारती विद्यापीठ व टिळक महाराष्ट्र विद्यापीठामधील एम.एस.डब्ल्यू.चे विद्यार्थी, बी.एम.सी.सी. महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि ज्ञान प्रबोधिनीमधील युवक कार्यकर्ते सहभागी झाले होते. मेळाव्यात शैक्षणिक व सामाजिक विकास आणि राष्ट्रीय एकात्मता या संदर्भातील विषयांवर मार्गदर्शक सत्रे झाली. प्रारंभी ज्ञान प्रबोधिनीचे कार्यवाह मा. सुभाषराव देशपांडे यांनी युवकांचे सर्वांगीण विकसन व त्यासाठी स्वतःची ओळख याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर युवकांसाठी बचत गट व स्वयंरोजगार या विषयावर ज्ञान प्रबोधिनीच्या ग्राम विकसन कार्याशी संबंधित श्री. साबळे, अध्यक्ष शिवगंगा कृषी विकास मंडळ व सरपंच खोपी यांनी स्वतःचे अनुभव सांगितले व प्रेरणा दिली. महानगरपालिका घोले रोड प्रभागाचे नागर वस्ती विकास विभागाचे श्री. संदीप कोळपे यांनी यू.सी.डी. च्या योजना सांगून युवकांना त्याचा लाभ घ्यायला सांगितला.

सामाजिक उद्योजकता या विषयावर श्री. संतोष गोंधळेकर, कार्यकारी संचालक, गंगोत्री यांनी कचऱ्यापासून कोळसा बनविणे या बाबत माहिती दिली व यातील उद्योगसंधी बाबत जागृत केले. भारती विद्यापीठातील अध्यापक श्री. कुलकर्णी यांनी सामाजिक समस्यांच्या निवारणाबाबत खेळाद्वारे प्रबोधन केले व गटचर्चा घेतली. श्री. सागर डोईफोडे, स्पर्धा परीक्षा केंद्र, ज्ञान प्रबोधिनी यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी कशी व केव्हा करावी याबाबत माहिती दिली. स्वतःच्या अनुभवातून या विषयाबाबतचे महत्त्व सांगितले.

त्यानंतर मातृभूमी पूजन कार्यक्रम झाला. मेळाव्यासाठी एकूण ४५ जण सहभागी झाले होते. वर्षातून दोनवेळा अशाप्रकारचे कार्यक्रम व्हावेत अशी अपेक्षा स्थानिक सहभागी युवकांनी व्यक्त केली आहे. स्थानिक वीर बाजीप्रभू मंडळाने कार्यक्रमासाठी लागणाऱ्या साहित्याची व्यवस्था केली होती व त्या भागातील ज्येष्ठ नेते श्री. अण्णा अलगुडे यांनी सभागृहाची व्यवस्था केली होती. सगळ्यांच्या सहभागाने मेळावा चांगला झाला.

*आवाहन* – प्रबोधिनीच्या भवितव्य लेखातील नियोजनानुसार येत्या ३ वर्षात १० नागरी वस्त्यांमधील १००० कुटुंबांबरोबर काम करायचे ठरले आहे. आरोग्य, शिक्षण, उद्योजकता, स्त्री - पुरूष संपूरकता इ. विषयांबाबत जाणीव जागृती कार्यक्रम घेतले जाणार आहेत. वय वर्ष १५ ते २५ मधील युवक - युवतींबरोबर व्यक्तिमत्त्व विकसन, नेतृत्व विकसन यासाठी प्रशिक्षणे होणार आहेत. आपण स्वयंसेवक, विषयतज्ज्ञ, देणगीदार, इ. भूमिकांमधून सहभागी होऊ शकता. जरूर संपर्क करावा.

प्रा. हर्षा किर्वे : २४२०७१७२, २४२०७२२२, ९४०३८५२७७४

## राष्ट्रीय एकात्मता

मनामनांमध्ये, जनाजनांमध्ये
बांधुयात सेतू
राष्ट्रीय एकात्मता
हाच आपला हेतू ।।१।।

स्नेह वाटुनी, प्रेम वाढवूनी,
देश आपला बांधू, सांधू
राष्ट्र हेच दैवत आपुले
सेवाव्रते त्यांस पुजू ।।२।।

जनीजनार्दनी भाव ठेवूनी
चरणी त्यांच्या अर्पण होऊनी
त्यागी पराक्रमी नेते-सेवक
घडवू त्यांच्यामधुनी

जागवू
जागवू
जागवू

देशप्रेम साऱ्यांमधुनी ।।३।।

# संशोधन प्रभाग

## प्रज्ञा मानस संशोधिका

**विद्यावाचस्पती पदवीसाठी मार्गदर्शन, संशोधन**

संशोधकांची मासिक बैठक नियमितपणे चालू आहे. यामध्ये संशोधनासंबंधी विविध विषयांचे सादरीकरण व त्यावर चर्चा होत असते. वा. वनिता पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या चार व वा.अनघा लवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली एकूण तीन विद्यार्थिनी विद्यावाचस्पती दर्जाचे संशोधन करत आहेत.

**परिषदा, संशोधन निबंध**

वर्षभरात झालेल्या विविध परिषदांमध्ये येथील सर्व संशोधकांनी त्यांचे विविधांगी निबंध सादर केले. लोणावळा येथील कैवल्यधाम संस्थेची आंतरराष्ट्रीय परिषद तसेच इतर तीन राष्ट्रीय पातळीवरच्या महत्त्वाच्या परिषदा; ज्ञान प्रबोधिनी, निगडी आयोजित शिक्षण परिषद, प्रज्ञा मानस पुणे आयोजित 'बियाँड होरायझन्स' आणि फर्ग्युसन महाविद्यालयातर्फे आयोजित 'जीवनाची गुणवत्ता'; एस.एन.डी.टी. मधील संशोधन पद्धतींवरील कार्यशाळा व नाशिक येथील संख्या-शास्त्रावरील कार्यशाळा या दोन राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळांचा यात समावेश होता.

**बीम** (BEAM) **:**

अभिक्षमता मापन विभागाच्या मदतीने उद्योजकता गुणांच्या अभिमापनासाठी एक चाचणीसंच तयार केला आहे. ठकार फौंडेशनची या कामी आर्थिक मदत झाली.

हुबळी व विजापूर येथील उच्चमाध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी अगस्त्य आंतरराष्ट्रीय फौंडेशन यांनी विज्ञानाचे अभ्यासवर्ग घेतले. या वर्गांमुळे कुतुहल, सर्जनशीलता, समस्या निराकरण, नेतृत्व कौशल्ये व आत्मभान यामध्ये होणारी वाढ पाहण्यासाठी विशेष चाचणीसंच तयार केला गेला. अभ्यासवर्गाचा मुलांवर होणारा परिणाम याने अभ्यासला गेला. त्यायोगे बऱ्याच बाबतीत हा अभ्यासवर्ग मुलांना उपयुक्त ठरला हे सिद्ध झाले.

**मनोमापन विभाग**

हा प्रज्ञा मानसचा एक अतिशय प्रबळ विभाग आहे. बुद्धिमत्ता, बौद्धिकेतर सुप्तगुण/ मानवी क्षमता, इच्छा चाचण्या तयार करणे व त्यांचे प्रमाणीकरण करणे हे काम वर्षभर चालू असते. त्याचबरोबर राष्ट्रीय पर्यवेक्षक मानसतज्ज्ञांनी ( National Supervisory Psychologists) मेन्सा, पुणे, मुंबई, चेन्नई, गुरगांव येथील कामाचे पर्यवेक्षण केले. मेन्साच्या पुणे विभागाने भारताच्या विविध भागांमध्ये चाचणीकाम केले. जसे अरुणाचल प्रदेश, उडपी व पुण्याजवळील इतर काही ठिकाणे. जवळजवळ २,००० ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

**मानसपट**

या इयत्ता ५ वी ते ९वीतील मुलांच्या क्षमता, शक्तीस्थाने व दौर्बल्य मापन करणाऱ्या चाचणीचा साधारण दीडशे मुलांनी उपयोग करून घेतला. त्यांना चाचणीनंतरचे समुपदेशन/ मार्गदर्शनही दिले गेले.

**आय-ॲम** (I-AM)

बुद्धिमत्ता व अभिक्षमता मापन या चाचणीचे काम गरजू विद्यार्थ्यांसाठी अत्यल्प शुल्कामध्ये केले गेले. जवळ जवळ ४,००० विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला. सुमारे ७० शिक्षक व सामाजिक कार्यकर्त्यांनी या करिता समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शनाचे प्रशिक्षण घेतले. या कामात उस्मानाबाद रोटरीचे प्रमुख, रोटरीयन श्री. रविंद्र साळुंके (Director Governor RTD 3132) यांची खूप मदत झाली. त्यांना या उत्कृष्ट कामगिरीबद्दल रोटरी अध्यक्षांकडून विशेष पुरस्कार मिळाला.

**स्वयम् (Studies & Work related to Aptitudes in Youth-Advance Measurement )**

या चाचणी संचाचा वापर करून सुमारे २०० व्यक्तींचे चाचणीकाम झाले. स्वत:च्या क्षमतांचा शोध घेणाऱ्या युवकांना या चाचणीने मोलाची मदत मिळते.

संशोधनातून निर्माण होणाऱ्या सर्वच फलितांचे उत्तम, उपयुक्त व काळजीपूर्वक उपयोजन नेहमीच केले जाते. या वर्षातील असे उपयोजन खालील उपक्रमांमध्ये दिसते.

**क्षमता संवर्धन विभाग (PES)**

दरवर्षी ७ ते १२ वयोगटातील मुलांसाठी उन्हाळी सुट्टीत कार्यशाळा होते. याही वेळी साधारणत: तीनशे मुलांपर्यंत पोहोचता आले. याच पद्धतीचे कार्यक्रम कराड, शिरूर येथेही झाले. 'अपना घर' गोळेवाडी येथे मुलांसाठी कोणतेही शुल्क न घेता कार्यक्रम घेण्यात आले.

**'अभ्युदय शिक्षक प्रशिक्षण'**

तीन वर्षांच्या कार्यक्रमांतर्गत दीडशेहून अधिक शिक्षकांचे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण झाले. यामध्ये जवळपास जिल्हापरिषदेच्या २१ व इतर शाळांचे शिक्षक सहभागी होते. हे प्रशिक्षण पूर्व-प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक या तीन स्तरांमध्ये झाले. एकूण ३६ ते ४२ सत्रांमध्ये हे प्रशिक्षण विभागलेले असून वेळोवेळी पर्यवेक्षण व प्रत्यक्ष काम करतानाचे मार्गदर्शन ही या प्रशिक्षण कार्यक्रमाची वैशिष्टये होती. शिक्षकांना दिलेल्या प्रशिक्षणांचा मुलांवर चांगला परिणाम दिसून आला.

हा कार्यक्रम रोटरी फौंडेशनच्या साहाय्याने झाला. (Rotary Club, Parvati RID -3131, Rotary Club Culvercity, USA, RID-5280 Under 3H edu. Project No.67627 ). यात प्रामुख्याने रोटरी, पुणे व रोटरी कल्व्हरसिटी, अमेरिका यांचा सहभाग होता.

**व्याख्याने, कार्यशाळा**

याशिवाय चंदिगड, दिल्ली, बंगलोर इत्यादि ठिकाणच्या अनेक सुप्रसिद्ध संस्थांमध्ये प्रा.पटवर्धन व डॉ. लवळेकर यांना सर्जनशीलता, नेतृत्व विकास, भावनिक बुद्धिमत्ता या आणि अशा विविध विषयांवरील कार्यशाळांसाठी बोलावणे आले.

**ह्युमन रिसोर्स सर्व्हिसेस (प्रज्ञा मानस संशोधिका औद्योगिक विभाग):**

यांचे नेहमीप्रमाणे महिंद्र व्हेईकल्स, जॉन डिअर येथे काम झालेच तसेच इतर संस्थामध्येही कार्यशाळा व चाचणीकामांसाठी बोलावणे आले आहे.

**'मनस्वास्थ्यासाठी नातेसंबंधाची जोपासना'**

नव्याने सुरू झालेला हा कार्यक्रम वर्षात दोनदा घेतला गेला. यात जवळजवळ ६० प्रौढ व्यक्तींचा सहभाग होता. यापैकी काही आपल्या जोडीदारांसह उपस्थित होते.

इतर कार्यशाळांसोबत शैक्षणिक विभागाचे कायमस्वरूपी व उच्चशिक्षणासाठी तयार केलेले उपक्रमही चालू होते. सहा महिन्यांचा-बाल व किशोरांचे मानसशास्त्र: क्षमतासंवर्धन, तीन महिन्यांचा अर्धवेळ चालणारा मनस्वास्थ्यासाठी नातेसंबंधांची जोपासना, आनंदाची शोधयात्रा, पालक व शिक्षकांची विशेष कार्यशाळा, संशोधन पद्धतींची कार्यशाळा, मनोमापन चाचण्यांसंबंधी कार्यशाळा अशा विविध कार्यशाळा व उपक्रम यावर्षी घेतले गेले.

**पदव्युत्तर पदविका वर्ग**

पुणे विद्यापीठ व विद्यापीठ अनुदान आयोग यांच्याशी असलेली संलग्नता हा आपल्या संशोधिकेचा मानाचा शिरपेचच समजायला हवा.

पुणे विद्यापीठ मान्यताप्राप्त, शैक्षणिक मानसशास्त्राचा पदव्युत्तर पदवी हा दीड वर्षाचा अभ्यासक्रम, नवीन अभ्यासक्रम व गुणांकन पद्धतीसह पुन्हा सुरू होण्याचा निर्णय झाला. हा अभ्यासक्रम काही काळ बंद होता.

**'प्रतिभावंताचे शिक्षण : पद्धती व रचना**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहाव्या शैक्षणिक योजनेअंतर्गत एका नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रमाला मान्यता मिळाली. 'प्रतिभावंताचे शिक्षण : पद्धती व रचना' असे याचे नाव असून हा भारतातला या प्रकारचा एकमेव असा उपक्रम आहे. 'नावीन्यपूर्ण उपक्रम' या अंतर्गत असलेल्या या अभ्यासक्रमात विभागातील संशोधन पद्धती व इतर संशोधन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी मुभा मिळणार आहे.

**प्रज्ञावंतता परिषद**

'बियाँड होरायझन्स' (क्षितिजापलीकडे प्रतिभेच्या) एकविसाव्या शतकातील प्रज्ञावंततेची संकल्पना या राष्ट्रीय परिषदेमध्ये साधारणत: विविध पार्श्वभूमी असलेल्या २८८ व्यक्तींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यात ५५ संशोधन निबंध सादर केले गेले. परिषदेमुळे प्रज्ञावंतता या विषयात काम करणाऱ्या तज्ज्ञांना व्यासपीठ मिळाले. प्रज्ञावंत मुलांच्या विशेष गरजांना अनुसरून विविध वयोगटांप्रमाणे उपयुक्त अशा तीन-परिषदा पश्चात् कार्यशाळांचे/ प्रशिक्षण वर्गांचे आयोजन केले होते. दोन विविध वयोगटांसाठीच्या पालकत्व कार्यशाळा हे यातील वैशिष्ट्य. परिषदेला विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (पश्चिम विभाग) सक्रिय आर्थिक मदत मिळाली. यासोबत जनता सहकारी बँक, कॉसमॉस बँक, भारतीय स्टेट बँक, महाराष्ट्र बँक , भारतीय जीवन वीमा, राठी टेक्, प्रबोध उद्योग इत्यादींनीही मोलाची आर्थिक भर घातली. 'बहुविध बुद्धिमत्ता' (Multiple Intelligence) या विषयावरील '१०० भारतीय प्रतिभावंत ' या नावाने झालेले दर्शन हे परिषदेत सहभागी तज्ज्ञांनाच नव्हे तर इतर सर्व अभ्यागत व विशेषत: शालेय विद्यार्थ्यांना प्रेरक ठरले.

**पुस्तके प्रकाशन**

हे वर्ष पुस्तक प्रकाशन वर्षही होते.पी.एच.डी च्या संशोधन कार्यातून निर्माण झालेले 'Why Gifted Education ?' (प्रज्ञावंतांचे विशेष शिक्षण कशासाठी?) हे पुस्तक, तसेच चौदा ते एकोणीस वयोगटातील विद्यार्थ्यांच्या अभिवृत्तीत 'लैंगिकता प्रशिक्षण व संवेदनशीलता संगोपन ' या कार्यक्रमाने होणारे बदल या संशोधनाचा वृत्तांत (Report) या सर्वांचे प्रकाशन डॉ.सेल्वामूर्ती यांच्या हस्ते झाले. डॉ. सेल्वामूर्ती हे जैवविज्ञान व आंतरराष्ट्रीय सहकार्य विभागात संशोधक व विकास प्रभागाचे वरिष्ठ नियंत्रक आहेत.

सहा नवीन मानसशास्त्रीय कसोट्यांचा संचही मानसतज्ज्ञांच्या वापरासाठी खुला केला गेला. या संचात वाचन, स्मृती, तर्कविचार, बुद्धिमत्ता, गणिती व सांख्यिकी विचार इत्यादी चाचण्या आहेत. **'मानवी क्षमतांचा शोध: ५० वर्षांची संशोधन यात्रा' हा संशोधन खंडही प्रसिद्ध** झाला. यात गेल्या ५० वर्षांतील पूर्ण झालेल्या संशोधनाचे सारांश (Abstracts) आहेत. सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त प्रज्ञा मानसची ही सुवर्णमयी कामगिरीच होय.

सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त मागील २६ वर्षांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमांत सहभागी विद्यार्थ्यांचा मेळावा घेतला गेला. यात जवळपास १०० माजी विद्यार्थी उपस्थित होते. प्रबोधिनीचे कार्य व सद्यस्थिती याबद्दल विद्यार्थ्यांशी संवाद साधला गेला. तसेच यापुढील कार्यात सहकार्यासाठी आवाहनही करण्यात आले.

# संस्कृत संस्कृति संशोधिका

**१) पौरोहित्य विस्तारासाठी सामाजिक संपर्क–**

**१.१) सामूहिक वटपूजन कार्यक्रम –** वटपौर्णिमेच्या दिवशी दरवर्षी ग्रामीण व शहरी भागात महिलांकडून वडाचे पूजन केले जाते. बऱ्याच वेळेला वडाची फांदी आणून त्याची घरात पूजा करणे, वडाला सात प्रदक्षिणा घालून सूत गुंडाळणे अशा गोष्टी या दिवशी अनेक महिला करीत असतात. तथापि वटपूजेचे निमित्त साधून वटवृक्षाचे निसर्गातील महत्त्व जाणणे, सावित्रीच्या कथेतील वैज्ञानिक प्रतीकात्मता समजून घेऊन त्यानुसार आचरण करणे या संकल्पनांचा विचार होताना दिसत नाही. त्यामुळे वटवृक्षाचे पर्यावरणीय महत्त्व विविध गटातील महिलांपर्यत पोहोचावे या हेतूने ग्रामीण व शहरी भागात सामूहिक वटपूजन संपन्न झाले. सौर ज्येष्ठ १४ (४ जून) रोजी ज्ञान प्रबोधिनीच्या ग्रामविकसन विभागाच्या माध्यमातून पुण्याजवळील तीन गावांमध्ये जाऊन संत्रिकेच्या महिला पुरोहितांनी पूजा सांगितली, त्यामागील आशय समजावून सांगितला. एकूण १९० महिलांनी या सार्थ वटपूजनात सहभाग घेतला.

डोंबिवली येथील पौरोहित्य प्रशिक्षण वर्गातील महिला सदस्यांनी समाजप्रबोधनाच्या हेतूने डोंबिवलीजवळील ठाकुर्ली येथे सामूहिक वटपूजन कार्यक्रम आयोजित केला. तेथेही अर्थासहित पूजा समजावून सांगण्यात आली. डोंबिवली मधील प्रशिक्षण घेणाऱ्या महिला सदस्यांनी पौरोहित्य केले. वडाचे पर्यावरणीय महत्त्व सांगणारा एक तक्ताही तेथे लावण्यात आला होता. ७५ स्थानिक महिलांनी या पूजेत सहभाग घेतला.

**१.२) सुवर्णमहोत्सव संपर्क कार्यक्रम–** ज्ञान प्रबोधिनीच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त नगर जिल्ह्यातील कोपरगाव व शिर्डी येथे २ सप्टेंबर २०१२ रोजी गणेश प्रतिष्ठापना पोथी प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. सुमारे ३० सदस्यांनी या कार्यशाळेत प्रशिक्षण घेतले.

**१.३)** वेल्हा येथील ग्रामीण महिला मेळाव्यात आर्या जोशी यांनी महिला पौरोहित्याविषयी माहिती सांगितली. ग्राम विकसन विभागाच्या या मेळाव्यास ५० गावांमधून आलेल्या महिला उपस्थित होत्या. पुढील काळात या महिलांनी पौरोहित्य शिकून स्थानिक पातळीवर पौरोहित्य करावे असेही यानिमित्ताने सांगण्यात आले.

**१.४)** ज्ञान प्रबोधिनी पद्धतीचे विविध संस्कार, पूजा, शांती इ. सद्यः स्थितीत प्रामुख्याने शिक्षित मध्यमवर्गीय कुटुंबात मोठ्या प्रमाणावर होत असतात. तथापि, समाजातील विविध जाती-जमातींपर्यंत हे संस्कार पोहोचावेत असा मानस आहे. या हेतूने विविध जाती-जमातीतील पूजा-पद्धती, धार्मिक आचार, व्रत-वैकल्ये प्रारंभी समजावून घ्यावीत यासाठी एक प्रश्नावली तयार करण्यात आली आहे. नागरवस्ती अभ्यास गटाच्या साहाय्याने पुण्यातील वस्त्यांमध्ये फिरून विविध कुटुंबांकडून ही प्रश्नावली भरून घेण्यासाठी पुरूष पुरोहित जाणार आहेत अशी योजना आहे.

**१.५)** ज्ञान प्रबोधिनी व स्व-रूपवर्धिनी यांच्या संयुक्त प्रयत्नांतून गणेश प्रतिष्ठापना पोथी प्रशिक्षण कार्यशाळा दि. ८ व ९ सप्टेंबर २०१२ रोजी आयोजित करण्यात आल्या. पुण्यात ५ केंद्रांवर मिळून ४५० सदस्यांनी प्रशिक्षण घेतले. संत्रिकेच्या ५ महिला पुरोहितांनी प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन केले. सांगली येथे संवादिनीच्या सहकार्याने अशीच एक कार्यशाळा झाली. त्यामध्ये २६ महिलांनी प्रशिक्षण घेतले.

**१.६)** ज्ञान प्रबोधिनी जिजामाता दलाच्या वयोज्येष्ठ महिला सदस्यांनी २९ व ३१ ऑक्टो. १२ रोजी दीपावली लक्ष्मीपूजन पोथीचे प्रशिक्षण घेतले.

**१.७)** दिवाळीच्या दिवशी लक्ष्मीपूजन करण्याची प्रथा बहुसंख्य कुटुंबांमध्ये आहे. ही पूजा अर्थ समजून घेऊन सर्वांनी करावी तसेच पूजेसाठी पुरोहिताचेही मार्गदर्शन लाभावे या हेतूने झी २४ तास वाहिनीच्या माध्यमातून ज्ञा.प्र. प्रणीत दीपावली लक्ष्मीपूजन विधी प्रसारित करण्यात आला. सौ. चित्रा लेले यांनी या पूजेचे पौरोहित्य केले.

**२) व्याख्याने –**

१) सौर आषाढ ८ (२९ जून) रोजी स्वाधार या संस्थेमध्ये सौ. सुरेखा लिखिते यांचे 'पूजेमधील विज्ञान' या विषयावर व्याख्यान झाले. HIV बाधित मुले, मुली व स्त्रिया या व्याख्यानास उपस्थित होत्या.

२) सौर आषाढ १७ (८ जुलै) रोजी श्रीशारदा मठ, पुणे येथील आध्यात्मिक शिबिरात 'पूजा - मूर्ताकडून अमूर्ताकडे' या विषयावर सौ. आर्या जोशी यांचे व्याख्यान झाले.

३) सौर भाद्रपद २३ (१४ सप्टें.) रोजी ज्ञान प्रबोधिनीच्या संवादिनी गटात 'ज्ञान प्रबोधिनी पुणे प्रकाशित पोथ्यांमधील विज्ञान व तत्त्वे' या विषयावर सौ. आर्या जोशी यांचे व्याख्यान झाले.

४) सुवर्ण महोत्सवानिमित्त सौर श्रावण २५ (१६ऑगस्ट) रोजी युवक दल मेळाव्यानिमित्त सौ. मनीषा शेटे यांचे अनुभव-कथन झाले. 'पालक ते ज्ञान प्रबोधिनीची सदस्या' येथपर्यंतचा त्यांचा प्रवास त्यांनी मांडला. सौर श्रावण २८ (१९ ऑगस्ट) रोजी नागर वस्ती गट मेळाव्यात राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने जनतंत्र उद्बोधन मंचाचे काम या विषयावर सौ. मनीषा शेटे यांनी माहिती दिली.

**व्याख्याने – एकदिवसीय चर्चासत्र**

ज्ञान प्रबोधिनी संशोधन संस्थेने प्राचीन भारतीय विमानशास्त्र या विषयावर एक दिवसीय चर्चासत्र आयोजित केले होते. दि. १० मार्च १२ रोजी हे चर्चासत्र ज्ञान प्रबोधिनीच्या प्रबोध सभागृहात संपन्न झाले. संस्कृत पदव्युत्तर शाखेत शिकणाऱ्या तीन विद्यार्थिनींनी या विषयासंबंधी काही प्राथमिक माहितीचे संकलन केले होते. चर्चासत्रात पुढील अभ्यासकांनी आपले विचार मांडले.

१) प्राचीन भारतीय व्यवहार्य विमानशास्त्राच्या अस्तित्वाचे शास्त्रीय विश्लेषण – श्री. सतीश कुलकर्णी

२) भारतीय विमानशास्त्रावरील वाङ्मय -सर्वेक्षण-श्री. रामप्रसाद

३) भारतीय विमानशास्त्रावरील वैज्ञानिक संशोधन - पी.पी. होले.

**परिषदांमध्ये सहभाग -**

**१)** International Council for Cultural Studies यांच्या हरिद्वार येथील परिषदेस सौ. आर्या जोशी व सौ. मनीषा शेटे उपस्थित होत्या. दि. ३ ते ७ मार्च २०१२ रोजी ही परिषद संपन्न झाली. ज्ञान प्रबोधिनी पद्धतीच्या गणेश-स्थापना पूजेचे प्रात्यक्षिक परिषदेत दाखविले गेले. तसेच दोन शोधनिबंधही वाचले गेले. -

सौ. आर्या जोशी - Tribal Warli's Marriage Ceremony; Respect for nature and mankind.

सौ. मनीषा शेटे - The Role of Tortoise as Revealed in Hindu Scriptures.

**२)** Giftedness Beyond Horizons (7 th to 9 th Feb. 2013) या परिषदेत आर्या जोशी यांनी 'Role of Hindu Samskaras in Enhancing Human Abilities as discussed In Gruhysutras या विषयावर Poster Presentation केले.

**२) पौरोहित्य विस्तारासाठी संगणक तंत्रज्ञान -** गणेश चतुर्थीच्या दिवशी पुरोहितांची कमतरता अलीकडे विशेषत्वाने जाणवू लागली आहे. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे कामाच्या निमित्ताने पुष्कळसे भारतीय सदस्य परदेशात स्थायिक झाले आहेत; त्यांनाही या विशिष्ट दिवशी पूजेसाठी मार्गदर्शन मिळणे अवघड होते. तसेच संघटनेचा, सामूहिक पराक्रमाचा संदेश देणारा गणेशोत्सव विधायक पद्धतीने घराघरात पोहोचावा असाही हेतू मनात होता. या सर्वच संकल्पनांना एकत्रितपणे पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी ज्ञान प्रबोधिनी व Atclix Technologies यांच्या संयुक्त विद्यमाने दृक्-श्राव्य माध्यमातील मराठी सार्थ श्रीगणेश स्थापना पूजा उपलब्ध करून देण्यात आली. Windows आणि Android या systems वर असलेल्या तसेच Laptop, Tablet PC आणि Smart Phone या तीनही साधनांवर ही पूजा Download करून घेण्याची सोय असून ही सुविधा विनामूल्य सर्वांना उपलब्ध करून देण्यात आली. या संकल्पनेला मिळालेल्या प्रतिसादानुसार आणि समाजातून आलेल्या मागणीनुसार नोव्हेंबर २०१२ मध्ये दीपावलीतील लक्ष्मीपूजन पोथीही दृक्-श्राव्य माध्यमात उपलब्ध करून देण्यात आली. देशात तसेच परदेशातही या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

## 'जनतंत्र उद्‌बोधन मंच' २०१२-१३ मधील व्याख्याने व परिसंवाद

१) **१५ एप्रिल १२** :- समतेत दडलेल्या समतेतर गोष्टी - श्री. राजीव साने

२) **२ जून १२** :- जाति-अंताचे लढे; फुले विचार आणि आंबेडकर विचार यांतील फरक (मुस्लिम आरक्षण प्रश्नांच्या संदर्भात)- कॉ. विलास सोनावणे

३) **१ऑगस्ट १२** :- 'भारतीय कृषि अर्थव्यवस्थेच्या संदर्भात वर्तमान घटना आणि महत्त्वाचे मुद्दे '- डॉ. सतीश देवधर, अहमदाबाद

४) **९सप्टेंबर १२** :- 'हिग्ज बोसॉनच्या निमित्ताने भौतिकशास्त्राचा आढावा व तात्त्विक प्रश्नांची चर्चा ' - श्री नचिकेत नित्सुरे

५) **१४ ऑक्टोबर १२** :- 'जागतिक तापमानवाढीचे संकट - तीव्रता, कारणे व उपाय '- श्री राजीव साने

६) **२६ ऑक्टोबर १२** :- ज्ञान प्रबोधिनी व मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'ऊर्जा व पाणी याबाबत गुजरातची कामगिरी ' या विषयावर डॉ. दामोदर नेने (ज्येष्ठ पत्रकार, वडोदरा) यांचे व्याख्यान योजण्यात आले. श्री राजेंद्र माहुलकर आणि श्री सुभाष लेले यांचेही या विषयावरील उपप्रश्नांवर आधारित व्याख्यान झाले.

७) **१ नोव्हेंबर १२** :- रोजी प्रबोधन मंच व ज्ञान प्रबोधिनी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'राष्ट्रीय सौर दिनदर्शिका ' या विषयावर परिसंवाद झाला. श्री. मोहन आपटे व श्री. हेमन्त मोने यांनी सौर दिनदर्शिकेचा दैनंदिन जीवनातील वापर यावर आपले विचार मांडले. ज्येष्ठ जलतज्ज्ञ श्री माधवराव चितळे यांनी कार्यक्रमाचा समारोप केला.

८) **१८ डिसेंबर २०१२** :- 'नक्षलग्रस्त प्रदेशांसाठी विकासाचे मार्ग' या विषयावर जनतंत्र उद्‌बोधन मंच आणि स्पर्धा परीक्षा केंद्र ज्ञान प्रबोधिनी यांच्या वतीने परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. परिसंवादामध्ये श्री. देवेंद्र गावंडे (पत्रकार, चंद्रपूर), श्री. नीरजकुमार बनसोड (मुख्याधिकारी, जि.प. दंतेवाडा, छत्तीसगड) यांनी सहभाग घेतला. मा. माधवराव गाडगीळ (विकास व पर्यावरण तज्ज्ञ) यांनी अध्यक्षीय समारोप केला.

**जानेवारी व फेब्रुवारी २०१३** मध्ये ज्ञान प्रबोधिनीच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याच्या दृष्टीने जनतंत्र उद्‌बोधन मंचाची स्वतंत्र व्याख्याने घेतली गेली नाहीत.

जनतंत्र उद्‌बोधन मंचाच्या व्याख्यानांमध्ये व अभ्यासगटांमध्ये ज्ञान प्रबोधिनीच्या युवक-युवतींचा व अन्य सदस्यांचा सहभाग वाढावा या उद्देशाने युवती विभागातर्फे सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त घेण्यात आलेल्या माजी विद्यार्थिनी मेळाव्यात वैयक्तिक माहितीचे फॉर्म्स भरून घेण्यात आले. माजी युवतींची व्याख्यानामध्ये व अभ्यासगटात सहभागी होण्याची इच्छा याबद्दलचा कल घेण्यात आला. या विषयाचा पाठपुरावा सुरू आहे.

# ग्रामविकसन प्रभाग

## नैसर्गिक संसाधने विभाग

### वसुंधरा पाणलोट प्रशिक्षण कार्यक्रम :

राज्य शासनातर्फे पुणे जिल्ह्यात वसुंधरा पाणलोट प्रशिक्षण कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. या कार्यक्रमाअंतर्गत यशदातर्फे गावपातळीवरील प्रशिक्षणासाठी विविध स्वयंसेवी संस्थांची तालुकास्तरावर निवड करण्यात आली. त्यानुसार पुरंदर १२ तालुक्यातील गावांमधील प्रशिक्षणाची जबाबदारी ज्ञान प्रबोधिनीकडे देण्यात आली.

प्रशिक्षणाच्या पहिल्या टप्प्यात पुरंदर तालुक्यातील ११ गावांमध्ये जाणीवजागृती मेळावे घेण्यात आले. या मेळाव्यांत एकूण ७३५ पुरुष आणि २९७ महिला उपस्थित होत्या. प्रशिक्षणाच्या दुसऱ्या टप्प्यात एकूण २१ 'परिचय प्रशिक्षण' कार्यक्रम घेण्यात आले. वसुंधरा पाणलोट प्रशिक्षण कार्यक्रमाची रचना, पाणलोट संकल्पना, पाणलोटातील विविध प्रकारचे उपचार, पाणलोट समितीची भूमिका तसेच लोकवर्गणी व महिला सहभागाचा आग्रह याविषयी ग्रामस्थांना स्लाईड व चित्रफितीद्वारे माहिती देण्यात आली. या विविध कार्यक्रमांना ८९७ पुरुष आणि ४८९ महिला उपस्थित होत्या.

प्रशिक्षणाच्या तिसऱ्या टप्प्यात विविध गावांच्या अभ्याससहली राळेगण सिद्धी व हिवरेबाजार या पाणलोट क्षेत्र विकसित गावांना नेण्यात आल्या. या अभ्यास सहलींमधील ग्रामस्थांना मा. आण्णा हजारे व श्री. पोपटराव पवार यांनी मार्गदर्शन केले. पांगारे या गावाची अभ्यास सहल बारामती येथील कृषी प्रतिष्ठान व टेक्सटाईल पार्क येथे नेण्यात आली होती. या विविध सहलींमध्ये ३५१ पुरुष आणि १३८ महिला सहभागी झाल्या होत्या.

### झरे विकास प्रकल्प

या वर्षी वरोती बु.।।, डोपे खिंड, रायदांडवाडी, पळसगाणे, निवी व कोंढाळकरवस्ती या वेल्हे तालुक्यातील गावांमध्ये व कुसगाव या भोर तालुक्यातील गावामध्ये झरे विकास कार्यक्रम घेण्यात आला.

या उपक्रमासाठी माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील पर्सिस्टंट फौंडेशन या कंपनीने निधी देऊ केला. या उपक्रमात सुरुंग उडवल्यावर निघणारी दगडमाती ग्रामस्थांनी श्रमदानाने व वेळप्रसंगी मशीनद्वारे काढली. या श्रमदानामध्ये प्रबोधिनीच्या युवक विभागाचे कार्यकर्तेही यंदा मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. याशिवाय वरोती व कुसगाव येथे L&T इन्फोटेक या कंपनीचे ६७ कर्मचारी सहभागी झाले होते. या कर्मचाऱ्यांनी उत्फूर्तपणे रु. ५० हजारांची रक्कमही अशा स्वरूपाची अन्य गावातील कामांसाठी देणगी स्वरुपात दिली.

यंदा रायदांडवाडी या दुर्गम गावातील धनगरवस्तीमधील ग्रामस्थांनी श्रमदानाने रस्ता तयार केल्यामुळे तेथे प्रथमच सुरुंग उडवणारा ट्रॅक्टर पोहोचू शकला.

### विहीर खोदाई प्रकल्प

छोटे झरे विकसित झाल्यावर त्याची विहीर बांधण्याचे काम यंदा प्रथमच हाती घेण्यात आले. भोर तालुक्यातील कुसगाव येथील चोरमले वस्ती या ठिकाणी झरे विकासाचे काम गेली दोन वर्षे ग्रामस्थांनी श्रमदानातून केले. यासाठीचा सुरुंग उडविण्याचा खर्च प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थ्यांनी देऊ केलेल्या निधीतून करण्यात आला होता. यंदा या विहिरीचे उर्वरीत काम टाटा मोटर्सच्या सुमंत मुळगावकर फौंडेशनच्या निधीतून पूर्ण करण्यात आले. यात विहीर रुंद करून खोली दहा फुटाने वाढविण्यात आली. वेल्हे तालुक्यातील वरोती बु.।। येथील जुन्या वापरात नसलेल्या सार्वजनिक विहिरीच्या पुनरुज्जीवनाचे कामही या फौंडेशनच्या मदतीतून हाती घेण्यात आले. या विहिरीतील गाळ काढून खोली व रुंदी वाढविण्याचे काम पूर्ण झाले आहे. या गावाला गेले दशकभर टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. अशाच प्रकारे शेनवड व घेवंडे या गावात १९७०च्या दशकात बांधलेल्या जुन्या सरकारी विहिरींच्या पुनरुज्जीवनाचे काम पर्सिस्टंट फौंडेशन च्या मदतीतून घेण्यात आले. या गावांमधील जुन्या विहिरींचे न खोदकाम अंशतः पूर्ण झाले आहे.

### जमीन शेतबांधदुरुस्ती व सपाटीकरण

डोंगराळ भागातील शेतीच्या बांधांची पावसामुळे होणारी फुटाफूट लक्षात घेता त्याची अधूनमधून नीट बांधबंदिस्ती होणे गरजेचे असते. तसेच शेतजमिनीचा उंचसखलपणा काढून जमिनीचे सपाटीकरण केल्यास पिकांच्या उत्पादनात लक्षणीयरीत्या वाढ होते. हे लक्षात घेऊन वेल्हे तालुक्यातील पासली खोऱ्यातील गरजू शेतकऱ्यांकडे या स्वरूपाचे काम यंदा करण्यात आले. वेल्ह्यातील कोंढाळकर वस्ती, बालवड, शेनवड व धुमाळवस्ती या गावांमध्ये ३० शेतकऱ्यांकडे सुमारे ४० एकर जमिनीवर अशा स्वरूपाचे सपाटीकरण करण्यात आले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हे सर्व काम ५०% लोकवर्गणीतून करण्यात आले. उर्वरित ५० % रक्कम पर्सिस्टंट फौंडेशनने देऊ केलेल्या अर्थसाहाय्यातून खर्च करण्यात आली.

### शेततळ्यातील गाळ काढण्यासाठीचे श्रमकार्य

पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत मुरवून पर्यायाने भूगर्भातील पाणीपातळी वाढविण्याचे महत्वाचे काम शेततळ्याद्वारे केले जाते. या शेततळ्यांमध्ये वेळोवेळी साठणारा गाळ न काढल्यास त्याची उपयुक्तता कमीकमी होत जाते. म्हणून अधूनमधून शेततळ्यांमधील गाळ काढणे अत्यावश्यक असते. यंदा कुसगाव (ता. भोर) व कातवडी (ता. वेल्हे) येथील एकूण तीन शेततळ्यांमधील गाळ श्रमदानातून काढण्यात आला. यात के. पी.आय.टी. या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीतील ५५५ कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान केले. यात महिला कर्मचाऱ्यांचा सहभागही मोठा होता.

**सौर ऊर्जा प्रकल्प**

'सोलर लॅमिनेटर' या यंत्राच्या आधारे गेल्या वर्षात तीन प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले. यात सौर पॅनेल बनविण्याचे प्रशिक्षण श्री. ताजिमा तोशिओ यांनी प्रशिक्षण दिले. यात ३० व्यक्तींनी सहभाग घेतला. ज्येष्ठ सौर ऊर्जा तज्ज्ञ व ज्ञान प्रबोधिनी शिवप्रदेश न्यासाचे अध्यक्ष सुरेश रानडे यांनीही या वर्गास भेट दिली. या प्रकल्पा-अंतर्गत पुण्यातील लक्ष्मीनगर येथील नागरी वस्तीमधील ज्योती घोगरे व शारदा शिंदे या दोघींनी जपानला तीन आठवड्यांची भेट देऊन तेथील श्री. तोशिओ ताजिमा यांच्या सौर विषयक उपक्रमांची माहिती घेतली.

**महिला शिवणवर्ग**

वेल्हे येथील महिलांसाठी तीन महिने कालावधीचा शिवणवर्ग घेण्यात आला. प्राथमिक शिवण येत असणाऱ्या महिलांच्या मागणीवरून या वर्गाचे आयोजन करण्यात आले. या वर्गात ब्लाऊज शिवण्याचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले. शिवणाचे विशिष्ट नमुने शिकण्यासाठी प्राथमिक शिवण येणाऱ्यांसाठी मर्यादित कालावधीच्या प्रशिक्षणाची गरज यानिमित्ताने लक्षात आली.

**कृषि तांत्रिक विद्यालय**

कृषि तांत्रिक विद्यालयात यंदा २५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. शासनमान्य व्यावसायिक प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या ही १७वी तुकडी होती. त्यातील २३ जण परीक्षेला बसले आणि २१जण उत्तीर्ण झाले.याच तुकडीतील जुने १९ व ७ नवीन असे २३ विद्यार्थी सी. एन. सी. टर्निंग सेंटरच्या अभ्यासक्रमात सहभागी झाले.

# *स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण) विभाग*

## किशोरी विकास

**नित्य संपर्क** : किशोरींसाठी पाक्षिक तासिका आणि नैमित्तिक उपक्रमांद्वारे वर्षभर संपर्क केला जातो. वेल्हे, भोर व हवेली तालुक्यातील१४ शाळांबरोबर हे आपले काम चालू आहे. **याद्वारे** एकूण ७० गावांमधील ४५० विद्यार्थिनींपर्यंत आपण पोहोचतो.

पाक्षिक तासिकांपैकी एक तासिका ही व्यक्तिमत्त्व विकसनासंबंधीचा **आशय संपन्न करणारी** तर एक **हस्तकौशल्ये** व जीवनविषयक कौशल्ये शिकवणारी अशी असते.

या वर्षी आशयाच्या तासिकेत कथाकथनतंत्र, संवाद कौशल्ये व संभाषण कौशल्यांवर सत्रे झाली. तसेच अभ्यास कौशल्ये, अभ्यासाचे महत्त्व व नियोजन,थंडीतील आहार, प्रसंगनाट्य, विज्ञान प्रयोग यावर सत्रे झाली. व्यक्तिमत्त्व विकसन म्हणजे काय? चांगल्या सवयींचे महत्त्व व त्या कशा विकसित करायच्या यावर सत्रे झाली. हस्त कौशल्यामध्ये वारली चित्रकला, टिशू पेपर फुले, राखी बनविणे, परसबाग,शिवणाचा रुमाल, आकाशकंदील व पणत्या, भरतकाम, क्रेप कागदाची फुले, घडीचे निरांजन, मेंदी अशी कौशल्ये झाली.

**तंबूतील शिबिरे :** दि. २३ ते २५ नोव्हें. २०१२ या काळात झालेल्या शिबिरात ८ शाळांमधील ८वीच्या ५४ विद्यार्थिनी उपस्थित होत्या. दहावीच्या ६ विद्यार्थिनी सहभागी झाल्या. सौ. सुनिलाताई गोंधळेकर यांनी प्रसंगनाट्यावरचे प्रशिक्षण घेतले. यानंतर गावामध्ये जाऊन मुलींनी गटागटांनी प्रसंगनाट्ये सादर केली. सांगवी गावात दारूबंदी, अंधश्रद्धा, हुंडाबळी, मुलगी वाचवा या विषयांवरील प्रसंगनाट्ये केली. सौ. सुवर्णा गोखले यांचे सत्र झाले. *'वाईट गोष्टी आम्हाला चालणारच नाहीत'* असे आपण ठामपणाने म्हणायला शिकले पाहिजे, असा त्यांच्या बोलण्याचा विषय होता. सर्वसाधारण प्रबोधिनीपण म्हणजे काय हे पुस्तिकेच्या वाचनाच्या आधारे चर्चा होऊन मुलींनी समजावून घेतले. दिवाळीतील किल्ल्यांच्या प्रतिकृती करण्याची स्पर्धा झाली. राजगडावर सहल होऊन समारोप झाला.

**विद्याव्रत :** कल्याण व कुसगाव या गावांमध्ये गावकऱ्यांच्या मागणीतून विद्याव्रताचा कार्यक्रम शाळेत घेण्यात आला. ८वीच्या अनुक्रमे ६० व ५१ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विद्याव्रत घेतले. दोन्ही कार्यक्रमांना सरासरी १०० जणांची उपस्थिती होती.

**प्रशिक्षक प्रशिक्षण :** सोलापूर येथे प्रशिक्षक प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. किशोरी विकास उपक्रमाची आखणी, नियोजन, कार्यवाही, तासिकांमधील आशय व याबद्दलची सत्रे तसेच सोलापुरातील ज्ञानसागर विद्यालयातील १०० विद्यार्थिनींसोबत त्याची प्रात्यक्षिके असा कार्यक्रम होता. यात साहित्य निर्मितीही झाली व हस्तकौशल्यांवरचे सत्रही झाले. किशोरी विकास उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या ८ माजी विद्यार्थिनी व शिशु अध्यापिका वर्गाच्या ३२ विद्यार्थिनी अशा ४०जणी उपस्थित होत्या.

**ग्रंथालय योजना :** भोर आणि वेल्हे तालुक्यात यंदा नव्याने एकूण १० गावांमधून ग्रंथालय योजना राबविण्यात आली. प्रत्येक ग्रंथालय पेटीत साधारण २०० पुस्तके देऊन उद्घाटन करण्यात आले.

**गाव पातळीवर शिबिरे : विविध माध्यमांमधून** वेल्हे, भोर व हवेली तालुक्यांमधील ४५ गावांमध्ये शिबिरे झाली. ही शिबिरे घेण्यासाठी निगडीच्या ज्ञान प्रबोधिनीतून ९वीच्या किशोरी व किशोर गावांमध्ये आले होते. याच सोबत युवक विभाग, युवती विभाग आणि अग्रणी-प्राग्रणींच्या माध्यमातून गावपातळीवरील शिबिरे झाली. बचतगट

प्रमुखांनी त्यांच्या निवासाची योजना केली. गावपातळीवरील ७५० किशोर-किशोरींनी या शिबिरांचा लाभ घेतला.

**क्रीडाकुल चाचणी :** १० गावांमधील ४८ विद्यार्थिनींची क्रीडाकुल प्रवेशासाठीची चाचणी झाली. ५ जणी पुढील चाचणीसाठी निवडल्या गेल्या. वेल्हे तालुक्यातून आवर्जून क्रीडाक्षेत्रात मुली जाव्यात म्हणून गेल्या ३ वर्षांपासून आपण ही चाचणी तोरणा विद्यालय, वेल्हे येथे घेतो.

**किशोरी मेळावा :** २४ फेब्रुवारी रोजी घोरेपडळ येथे दहावीची परीक्षा झालेल्या तुकडीचा एका दिवसाचा मेळावा झाला. या मेळाव्यास ३० जणी उपस्थित होत्या. त्यात मुख्यतः 'दहावीनंतर काय'?या विषयावर विविध उपलब्ध पर्यायांवर सौ. मानसीताई बोडस यांचे सत्र झाले. प्रबोधिनी पातळीवरही दहावी नंतर किशोरी विकास तासिकेद्वारे जरी मुली जोडलेल्या राहील्या नाहीत तरी विविध प्रकारांनी युवती विभागामधून त्या कशा जोडलेल्या राहतील ,यावर चर्चा झाली व त्याचा निष्कर्ष म्हणून मुलींनी गावपातळीवरील दले सुरु केली. त्याचा निष्कर्ष म्हणून मुलींनी गावपातळीवरील दले सुरु केली.

**निवासी शिबिर :** किशोरी मेळाव्यास आलेल्या ३० जणींचे ज्ञान प्रबोधिनी पुणे येथे निवासी शिबिर झाले. ***'शिकाल तर टिकाल'*** शिक्षणाचे महत्व हा शिबिराचा विषय होता. शिबिरात मुलींनी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेस भेट देऊन स्त्रियांच्या शिक्षणाची महाविद्यालये व विभाग मिळून १४ उपक्रम पाहिले. सर्व मुलींची बुद्धिमत्ता व कल चाचणी अशा दोन चाचण्या प्रज्ञा मानस विभागातर्फे घेण्यात आल्या. मा. अनिलराव शहाणे यांच्याशी मुलींच्या गप्पा झाल्या. सुवर्णाताई गोखले, सिंधुताई जोशी आणि रोटरी क्लबच्या माधवीताई कुंटे यांचे मुलींशी अनुक्रमे नेतृत्व विकसन, पौगंडावस्थेतील आरोग्याचे प्रश्न व व्यसनाधीनता तसेच शिक्षणाचे महत्त्व या विषयावर सत्रे झाली.

**हिमोग्लोबीन तपासणी :** सिकोया या कंपनीसोबत जनकल्याण रक्तपेढीच्या साहाय्याने वेल्हे तालुक्यातील २९ गावांमधील १००० किशोरींची रक्त तपासणी करण्यात आली. मुलींच्या रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण तपासण्यात आले.

## युवती विकास

**जास्वंद वर्ग :** वेल्हे तालुक्यातील युवतींसाठी आठवड्यातून ४ दिवस असा ४ महिन्यांचा कौशल्य प्रशिक्षणाचा वर्ग घेतला जातो. औपचारिक शिक्षणाची दारे ज्यांच्यासाठी बंद झाली आहेत अशांसाठी व शिक्षण चालू असणाऱ्यांसाठीही असे ८ वर्ग आजपर्यंत घेतले गेले. १५ नोव्हेंबर २०१२ ते१५ मार्च २०१३ या काळात ६ गावांमधील १५ जणींसाठी जास्वंद वर्ग आंबवणे येथे झाला. या वर्गात शिवणकाम, विणकाम, आरोग्य इ. विषयांवरील सत्रे झाली.

**कौशल्य प्रशिक्षण वर्ग :** वाजेघर येथे ४ गावांमधून येणाऱ्या ८ युवतींनी शिवण कौशल्याच्या वर्गात सहभाग घेतला. वाखाच्या वेण्या बनविणे व मेंदी वर्गाचाही त्यांनी लाभ घेतला. वाजेघर येथे ९ विद्यार्थिनींनी ब्युटी पार्लरचा वर्ग पूर्ण केला.

**शिवरे मेळाव्यात सहभाग :-** शिवरे गावातील महिलांनी संक्रांतीनिमित्त आयोजित केलेल्या खोरे पातळीवरील मेळाव्यास जास्वंद वर्ग व वाजेघर मधील कौशल्य वर्गाच्या युवती उपस्थित होत्या.

**सोलापूर व हराळी सहल :** जास्वंद वर्गातील विद्यार्थिनींची सहल सोलापूर व हराळी प्रबोधिनीस गेली. सोलापूर येथे त्यांनी प्रबोधिनी परिचय, बालमानस व वर्तनशास्त्राचे पाठ, सायन्स सेंटरला भेट व तारांगण पाहणे तसेच पेट्रोल पंपाच्या व्यवसायातील विविध आयामां विषयी श्री. कुलकर्णी यांची मुलाखत असा कार्यक्रम होता तर हराळी येथे प्रबोधिनीचे उपक्रम पाहण्याबरोबर माकणी व जेवळी येथे युवतींची शिबिरे मुलींनी घेतली. या शिबिरास अनुक्रमे २५ व ३०जणी उपस्थित होत्या.

**गावपातळीवरील शिबिरे :** निगडी येथील इयत्ता ९वीतील अग्रणींबरोबर पाच गावांमधील किशोर-किशोरींची शिबिरे वांगणी, वांगणीवाडी, मांगदरी, चिरमोडी व वडगाव झांजे या गावांमध्ये झाली. २ दिवसांच्या शिबिरांमध्ये २५० मुला-मुलींनी भाग घेतला. जास्वंद वर्गाच्या युवतींनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.

**ग्रामसभांच्या आयोजनात सहभाग :** प्रबोधिनीतील स्पर्धा परीक्षा केंद्राचे विद्यार्थी व भावी प्रशासकांच्या सहकार्याने ४ गावांमध्ये युवतींच्या मदतीने गाववार महिला ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले. गेल्या ४ वर्षांपासून सातत्याने होणाऱ्या ग्रामसभांमुळे महिलांच्या सहभागा विषयी जाणीव जागृती वाढली आहे.

